
कथासंग्रह



# डोहाचे अंतरंग

अरविंद रा. बुधकर

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# डोहाचे अंतरंग-१

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# डोहाचे अंतरंग-१

(कथासंग्रह)

लेखक : श्री.अरविंद रा. बुधकर

# डोहाचे अंतरंग-१


## लेखक- श्री.अरविंद रा. बुधकर

मधुपुष्प बी विंग खोली नंबर २०१;

गोळे आळी, पिरंगुट ग्राम पंचायत

तालुका मुळशी जिल्हा पुणे

फोन संपर्क - अरविंद बुधकर ९८२०४०८५५३

९८२०३१९२३६(सौ संजीवनी बुधकर)

arvind_budhkar@yahoo.co.in



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकाच्या छापील आवृतीचे प्रकाशक मायबोली प्रकाशन यांनी या ई आवृत्तीला अनुमती दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

ई प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २८ ऑक्टोबर २०२२

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.




# अरविंद बुधकर


**जन्म -** 30 ऑगस्ट 1953 मुंबई
**शिक्षण -** मनुष्यबळ विकास मधील पदवीउत्तर पुणे विद्यापीठ, पदवी (तत्वज्ञान व मराठी)सोमय्या कॉलेज, मुंबई विद्यापीठ, मनुष्य विकास व औद्योगिक संबंध मधील डिप्लोमा(PGDPMIR), ट्रेनिंग मधील डिप्लोमा (ISTD),'**कोविद'** (संस्कृत) भारतीय विद्याभवन
**प्रकाशन** – ई-साहित्य प्रकाशनाने केलेली **"ध्यासंग, महाराष्ट्रातील तीन शिलेदार (दोन्ही मुलाखतींची पुस्तके)** – वसंत, कलामंच, रोहिणी, रणांगण, वसुधा, अनुराग,अलका, लव अंकुश, झाली पहाट झाली, सा. आघाडी ( मालवण ), रासायनी टाइम्स, पुरुष उवाच(मिळून साऱ्याजणी प्रकाशन), विश्वभ्रमंती, कल्पक निवड, कान्हेरी, आमची साहित्य सृष्टी, तारका, झेप, फिरकी, वल्ड सामना, गृहशोभा, कुसुमाकर, संयम, कविताश्री, मिळून साऱ्याजणी, अंकांमधून कविता,

गाणी, कथा, प्रवास वर्णन, विडंबन काव्ये, स्माईलिका (तात्कालिक राजकीय विषयावर) राजकीय प्रहसन लेखन प्रसिद्ध.

**विशेष -** मराठी दूरदर्शन अनेक मराठी मालिकेतून भूमिका करत आहे. 3 हिन्दी व २५ मराठी मालिकांमधून भूमिका. 1977 जुलै मुंबई आकाशवाणी युववाणी मध्ये काव्य वाचन.

अनेक व्यवस्थापन कॉलेज मधून Visiting Faculty. अनेक सामाजिक संस्थांशी निगडीत.




कव्हरवर क्लिक करताच पुस्तक उघडेल

*श्री अरविंद रा. बुधकर,*
*सल्लागार (एच आर) मुलाखतकार,वृत्तपत्रलेखक,व्याख्याता*

# ***मनोगत............***

व्यवसायाने व्यवस्थापन आणि कामगार क्षेत्रातील दुवा म्हणून अनेक पदांवर कार्यरत असताना अनेकांशी संबंध आला. अनेक संघर्षमय परिस्थितीतून वाटचाल तसेच भ्रमंती करताना अनेक मानवी मनांचे कंगोरे अनुभवायला मिळाले. काहीवेळा परिस्थिती हाताळताना पदाचे भान विसरून सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम करावे लागले. कामगार अपघातग्रस्त झाल्यावर मृत्यू काळ घोंगावत असताना जवळचे नातलग कोणी नाही. डॉक्टर म्हणतात कामगाराला दुसऱ्या हॉस्पिटल मध्ये न्या नाहीतर जगणार नाही. ह्या संवेदनक्षम परिस्थितीत निर्णय घेताना बरोबर असणारे व्यवस्थापन सहकारी, कामगारप्रतिंनिधी, जवळचे कामगार सुद्धा निर्णय घेण्याचे टाळायचे अशा वेळीस बिकट प्रसंग ओढवयाचा. परिस्थिती हाताळताना छुपे विरोधक कशाचे भांडवल करून अडचणीत आणतील ह्याचा भरवसा नसताना अचानक माझ्यावर निर्णय घेण्याची जबाबदारी यायची. अशावेळी खरच परमेश्वरी कृपा होऊन मार्ग निघायचा.. कधी कधी तर जवळचे कुणी नाही ज्ञातीतील कोणी पुढे येत नाही तेव्हा कामगारांना बरोबर घेऊन अग्नि देण्याचा प्रसंग आला. प्रसंगी कामगाराच्या दोन बायकाना कायदेशीर देणी मोठ्या कष्टाने राजी करून विभागून दिल्यानंतर कंपनीचे स्मृतिचिन्ह चांदीचे नाणे अर्धे अर्धे करून ध्या अशी मागणी झाल्यावर चुकीची प्रथा पडू नये म्हणुन विचार करताना खंबीर भूमिका घ्यावी लागली. कंपनीचा अधिकारी रेल्वे अपघातात गेला. घरी सांत्वन करण्यास गेलो तेव्हा माऊली दोन दिवस जेवली नाही कळले. मूल तिच्याकडे बघत आहे,

सासुसासरे आईवडील हतबल झालेले अशावेळी सर्व भान विसरून अंत:प्रेरणेची हाक ऐकून सर्वांसमोर तिला जेवायला घातले. माणसाला जीवदान, उभारी देण्याचे भाग्य लाभायचे तेव्हा जीवनाचे सार्थक झाल्याचे वाटायचे

सर्व घटना, प्रसंग मनाच्या कोपऱ्यात दडून बसले होते. ज्यावेळी नोकरी सोडून व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करू लागलो तेव्हा मोकळया वेळेत हे सर्व प्रसंग घटना मला कागदावर शब्दबद्ध करा म्हणून छळू लागल्या. त्यातून कथा आकार घेऊ लागल्या. मासिकांमधून कविता प्रसिद्ध होत होत्या. सहज म्हणून कथा मासिकांना पाठवित गेलो. कर्मधर्म संयोगाने मासिकांच्या संपादकांनी प्रसिद्धी दिली. असे प्रोत्साहन मिळत गेले. मराठी प्रतिलिपी संकेत स्थळावर कथा प्रसिद्ध केल्यावर अनेकांच्या चांगल्या प्रतिक्रिया मिळत गेल्या. त्यातून ऊर्जा मिळत गेली. सहज म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्याकडे विहित नमुन्यात कथा पाठवून दिल्या. आज पुस्तक रूपाने कथा वाचकांसमोर येत आहेत ह्याचा आनंद होत आहे. ह्यात मासिकांचे संपादक, संकेत स्थळांवरचे वाचक, कथा लिहून झाल्यावर प्रथम टीकात्मक वाचन करून सूचना करणारी माझी पत्नी सौ संजीवनी, साहित्य आणि संस्कृती मंडळ त्याचप्रमाणे पुस्तकाला गोंडस रूप देऊन वाचकांसमोर आणणारे मायबोली प्रकाशनाचे श्री प्रमोद भोगटे यांचे यांचे ऋण शब्दांच्या पलिकडचे आहेत. या पुस्तकाला सगळयांचे कौतुकांचे आशीर्वाद मिळतील आणि वाचक उचलून धरतील अशी आशा आहे.

*अरविंद बुधकर*

***अर्पण पत्रिका***

*परिस्थिचीचे घाव झेलत*
*अब्रूच्या उंबरठ्या बाहेर*
*पडणारे आयुष्य सांभाळतानाही*
*वेळ मारून नेत*
*आम्ही आहोत पाठीवरील हात*
*अर्ध्या घासातील घास गरजूंना देणारे*
*जन्मदाते **स्वर्गीय नाना आणि आई**.........*
*आणि*
*कुठलीच माहिती नसताना*
*महाविद्यालयीन शिक्षणात घडविणारे*
*आकाशात भरारी घे म्हणत*
*पंखांस आर्थिक बळ देणारे*
*ज्यांच्यामुळे आयुष्यात हे दिवस बघत आहे*
*ते **स्वर्गीय प्राध्यापक वसंत कोकजे सर***
*आणि*
*पुस्तकांचे दालन व प्रोहोत्साहित करणारे*
***प्रा श्री अनंत भावे***

*यांना*
***समर्पित..........................................***

# कथानुक्रम

1. वळण

2. स्मृतिचिन्ह

3. रिंकू

4. आव्हान

5. उतराई

6. कोंडी

7. गरुडझेप

रणांगण दिवाळी अंक २०१८

# वळण

सुरेश घराच्या पायरीवर बसून तुळशीवर पडलेले संध्याकाळचे कलते उन्ह आणि चिमणा चिमणी चोचीतून आणून तुळशीच्या वृंदावनाच्या पणती ठेवण्याच्या ठिकाणी घरटे बांधत असलेले पाहत होता. स्वत:शी पुटपुटला "पाखरांचे बरे आहे. माणसांना कळत नाहीत त्यांची नातीगोती. वेळ झाली की संध्याकाळी येतात घरट्यात एकत्र. माणसांचे तसे नसते. अनोळखी एकत्र दिसली की लगेच आजूबाजूला कुजबूज करू लागतात. आधार देऊन उभे मात्र करीत नाहीत."

आश्रम शाळेतील निवासी विध्यार्थी गोपाळ धावत येऊन म्हणाला, "सर, सर! सुलभा काकी पाय घसरून नळावर पडल्या" . सुरेश झटकन उठला आणि पळत गेला. सुलभा आणि सुरेश आपले आयुष्य आश्रम शाळेत मुलांची व्यवस्था, शिक्षण इ बघत एकत्र राहून व्यतीत करीत होते.

"अग, तरी तुला म्हणालो तू बादली भरून आणू नको. मी किंवा मुलांनी भरून आणली असती. झाडांना पाणी मी घालणारच होतो."सुरेश सुलभा बाबतीत

हळवा होता. त्याच्या आयुष्याच्या वाळवंटात तिच स्थान चैतन्य निर्माण करणारे होते.तिचे असणेच काय पण नुसती आठवण नवीन उर्मी निर्माण करीत असे.सुरेश तिच्या पडत्या काळात उभे करता करता तिच्यात गुंतत गेला. परिस्थितीने दोघे एकत्र येऊन राहू लागले ते कायमचे.

“अरे गोपाळ! जा डॉक्टरकाका आहेत का बघ.”

“कशाला डॉक्टर? एव्हढे काही झालेले नाही. जरा शेकले की बरे वाटेल. फारच तू हळवा आहेस. ”

सुरेशने सुलभाला घरात आणून ठेवले. पाणी घालण्यासाठी बाहेर आला. चालता चालता डोळ्यासमोर भूतकाळातील घटनांची पाखरे किलबिलाट करू लागली.

“ए सुलभा! अग तुझी मुंजेची खरेदी कधी करायची? मी आता मोकळी आहे. चल जाऊ बाजारात आणि घेऊन येऊ. दुपारला आमच्याकडे पाहुणे येऊन राहिले बग. त्ये आमच्याकडे दोन तीन दिस राहतील असे वाटत्ये आणि तुझे तर कार्य 4 दिसांवर येऊन राहिले न? .”

“हो ना! अग अजून घरातले काही आवरून नाही राहिले बग.सगळे एकटे करायले लागते. हयो माझा लेक हट्ट धरून राहिला बघ. मुंजेच्या येळेला त्येचे काका

काकुच्या मांडीवर बसून मुंज करणार नाये म्हणून राहिला. मला समजत नाही आता काय करायचे ‘‘सुलभा

“का बर! तू त्येले काय सांगितलं की काय? “- राधा

“काय नाय. ‘‘सुलभा

राधा काकू आणि सुलभा एकाच वयाच्या, ब्राह्मण कुटुंबातील. दोघीही मूळच्या शहरातून कारंज्याजवळ लागून असलेले खेड्यात,लग्न होऊन आलेल्या आणि चांगल्या शिकलेल्या.दोघीही जवळच्या कॉलेजमध्ये मराठी शिकवणाऱ्या. त्यातून घरेही समोरासमोर. त्यामुळे चांगलीच मैत्री जमली. प्रसंगी एकमेकांच्या सुखदु:खाच्या गोष्टी सांगणाऱ्या, आधार देणाऱ्या. राधाची सासू जुन्या वळणाची.जाच करणारी. सोवळे ओवळे पाळणारी, देवदेव करणारी. नवरा नोकरी निमित्त मध्यप्रदेशात राहणारा. त्यातून नोकरीची अट होती, म्हणून सोडून बरोबर जाता येत नव्हते.दोघीही शहरातील चांगल्या शिकलेल्या घरातून आलेल्या. विदर्भात येऊन येथील बोली नकळत बऱ्यापैकी शिकलेल्या. घरी एकत्र कुटुंब. स्त्री म्हणून पुरुषांशी बोलता येत नाही ही रीत. इतर बाहेरून कोणी आले तर बिकट प्रसंग ऊभा राही. घरातील मोठ्या स्त्रीने बोलायचे. बाकी घरी अशिक्षित. शेती करणारे. घरातील अति सोवळे पटत नव्हते तरी जबरदस्तीने करावे लागत होते. माहेरी आता कोणी नसल्यामुळे सासरी जमवून घ्यावे लागत होते.

“तू त्येला सांगितले का त्येला तू दत्तक घेतला आहे म्हणून? ‘‘राधा

"मी नाही बोलल्ये. त्येला कळून राहिले कुठून तरी. म्हणून तो बोलत नाय. सारखा चीड चीड करून राहिला बग. शाळेतील मुले बोलता बोलता बोलून गेली काय कळून नाय राहिले. मला घरी आल्यावर सांग सांग म्हणत हट्ट धरून राहिला. मी टाळले आणि विचारले "तुला असे वाटते का?"तेवढ्यात राधेला घरातून हाक मारली म्हणून निघून गेली.

जाता जाता हळू कानात म्हणून गेली """काय ग! सुरेश आलेले आहेत न? "सुलभा लाजून ओठावर हसू घेऊन हळूच घरात गेली.

सुरेश दोघींचे संवाद घराच्या पायरीवर बसून ऐकत होता. तो सुलभाच्या लहान बहिणी सुरेखाचा नवरा.खडतर उध्वस्त आयुष्य जगलेला. विद्यार्थी चळवळीतून दुसऱ्याच्या पैशाच्या मदतीने शिकलेला, एकत्र गरीब अशिक्षित लहान घरात वाढलेला पण भावंडात मोठा असलेला. अवेळी अंगावर जबाबदारी आल्यामुळे धीर गंभीर प्रकृतीचा प्रेमळ, पण कुणाचे प्रेम न मिळालेला. मुंबईला खाजगी कंपनीत मोठ्या पदावर काम करणारा. लहानपणापासून दुसऱ्यासाठी काही करावे ह्या विचाराचा. घरातील जबाबदारीमुळे सर्व निर्णय एकटाच स्वतंत्र घेत असे. सुलभाची बहीण सुरेखाशी वेगळ्याच परिस्थितीत नात्यात लग्न झालेले. घराण्यात नात्यातील मुलीचा अचानक मृत्यू झालेला. त्यामुळे स्थळ पाहण्यातील आणि चांगले मध्यम वर्गीय म्हणून लग्न जमून गेले. सुरेखा अबोल,आत्मविश्वासाचा अभाव, एकलकोंडी, साधी परंतु हुशार, मोठ्या घरात राहणारी. कुणाशी स्वत:हून बोलणे नाही की

कोणाला मैत्री म्हणू बोलावणे नाही. सुरेशचे घर सुरवातीचे एकत्रित लहान. त्यामुळे एकत्रित राहण्यात तिच्यात नात्याचा ओलावा नव्हता. सुरेशच्या लहान घरात सर्व लोकांचा राबता. कधी दोघांना एकांत मिळे ना. कालांतराने दुसरे घर घेऊनही ते वेगळे राहू लागले तरी काही फरक झाला नाही. निसर्ग बदलतो पण माणसाचा स्वभाव काही बदलत नाही. सुरेश आणि सुरेखा यांच्या नात्यात कटुता नसली तरी परस्परांविषयी विचार जुळत नव्हते, तरी चालले होते. सुरेश दिवसभर नोकरी निमित्त बाहेर रहात असल्यामुळे, तो ताण जरी असला, तरी तो आईवडिलांचे आणि स्वत:चे घर चालवायचे असल्यामुळे सर्व निभावून नेत होता. परंतु त्याला कोणी प्रेमाने पाठीवर हात फिरवणारे किंवा समजून घेणारे कोणी नव्हते. स्वप्नांची फुले कोमजून गेली होती. सुरेखा बायको म्हणून जबाबदारी घेऊन पुढाकार घेणारी नव्हती. ह्यात सर्व सुरेशची घालमेल होत होती. भावंडे मार्गाला लागली नव्हती. सुरेखा अल्प पगारात नोकरी करीत होती. नोकरी हा तिचा स्वभाव नव्हता. प्राध्यापकी पेशाला लागणारा आत्मविश्वास आणि छाप पाडणारे वक्तृत्व नव्हते. अंश कालीन लागल्यामुळे, कुठेच कायम नोकरी नव्हती. सुरेशच्या पगारात समाधान मानून जमवत होती. सुरेशनेही तिच्या नोकरी कडे पाहिले नाही. मुलगी मोठी होऊ लागली तसे दोघेही तिच्यात एकमेकाला समजून घेत संसार चालवू लागले.

सुलभा सुद्धा गोरी गोमटी, रेखीव बांध्याची, उत्साही, चार लोकांची आवड असणारी आणि शिकलेली परंतु बहिणीपेक्षा वेगळी. जाईल तिथे आपलेपणा जपणारी, मिळून मिसळून उत्साहीत नेहमी सकारात्मक विचाराची. महाराष्ट्र

मध्यप्रदेशच्या सरहद्दी जवळील खेड्यात सासर लाभलेली, कापूस संत्रांची एकत्रित कुटुंबातील शेती असलेली. परंतु सासू अकाली नवरा गेल्यानंतर अकोट जवळील हॉस्पिटलमध्ये नोकरी करू लागली आणि तेथेच भाड्याचे घर घेऊन वेगळे राहू लागली. मुले चार. दोन नंबर आणि शेवटचा काकांजवळ राहून शेती करत होते आणि तिसरा पुण्याला नोकरी करू लागला. सुलभाचा नवरा घरात मोठा मात्र मावशीकडे राहून आयुर्वेदिक डॉक्टर झाला. पडेल ती कामे करून त्याने शिक्षण पूर्ण केले. मनाने दिलदार, मितभाषी, काळा सावळा, चेहरा बोलणे विदर्भाची झाक. सुलभाचे त्याच्याशी लग्न ओळखीने जमून गेले.सासू नवरा आणि ती असे राहू लागली. सासू विचाराने जुन्या वळणाची आणि घर सर्व तीच बघत होती. नवऱ्याचा पगार बेतास बात. पण कधी वेळेवर होणे नाही.नवऱ्याच्या ओळखीने कालांतराने महाविद्यालयीन शाळेत नोकरी लागून गेली. हिचा पगार ही नवऱ्यामार्फत सासुकडे जात असे. त्यामुळे स्वत:ला काही घेऊ म्हटले तर काही निर्णय घेता येत नव्हते. कालांतराने दोघांनी लोन घेऊन गावाबाहेर कारंज्याजवलीळ खेड्यात, सासूने आणि नवऱ्याने घेतलेल्या जागेवर, बंगले बजा घर बांधले. पगार हफ्ते भरण्यात जाई. नवरा घरी अवेळी येई आणि आला तरी मित्रांमध्ये रमून जाई. सुलभाला मन मारून घरात बसून राहावे लागे, नाही तर टी.व्ही. बघत बसणे. पुस्तकांसाठी गाव लहान असल्यामुळे लायब्ररी प्रगत नव्हती.बायकांनी बाहेर बाजारात एकट्याने जाऊन काही आणायचे नाही. हा रिवाज. कधी तरी दीर जाऊ येऊन राहत. त्यामुळे एकांत मिळणे हा भाग दूरच.

सुलभाला लग्न होऊन १५ वर्षे झाली तरी मूल नव्हते. एकदा कहरच झाला. दिराने आईच्या सांगण्यावरून गावाहून ज्योतिषी आणला आणि त्याने सुलभा आणि तिच्या नवऱ्याची पत्रिका पाहून होम आणि कडक सोमवार नवस करायला सांगून 10 जोडप्यांना जेवण घालण्यास सांगितले. कारण काय तर मुलीत दोष आहे आणि हे केल्याने टळून जाईल. इच्छा फलद्रूप होईल.

सुलभाला हे काही पटत नव्हते. सासूने पूर्वी ही केव्हा तरी असे करण्यासाठी सांगितले होते. हे तिने ऐकले नव्हते. सासूने ज्योतिषी गेल्यावर सर्वांसमोर सुलभाचे वाभाडे काढण्यास सुरवात केली. काय बाय बोलू लागली. सुलभा ही माझा छळ करते, लक्ष देत नाही इ. तोल सोडून बोलू लागली. नवरा समोर बसलेला तरी काही बोलला नाही. दीर ही आईची बाजू घेऊन सुलभाला बोलू लागला. तसे पाहिले तर त्याचा काही हक्क नव्हता. तो वयाने सुलभाचा धाकटा दीर होता आणि तिच्या पेक्षा ही वयाने लहान होता. सुलभाचा हे सर्व, जे कधी घडण्याचे शक्य नव्हते, ऐकून तोलच सुटला.ती दिरांवर कडाडली ",

"तुम्ही काय बोलून रायले. तुम्हाला काय हक्क पोचतो.? "

"वयनी तुम्ही आईला बोलून रायले मग आम्हाला राग येणार नाई का?"दीर

"मी कधी काय बोलले. माझा तर मी पगार सर्व देऊन टाकते. मला माझे मना प्रमाणे कधी काय मिळून रायले.? (नवऱ्याकडे बघून) अहो तुम्ही बोला ना. माझा सर्व पैसा तुम्ही शेतीला यांना देऊन रायले. कधी माझ्या कडे बघितले काय? हे जे बोलून रायले ते तुम्ही ऐकून रायले "

“वयनी! आम्ही घरामध्ये तुम्हाला लागेल तेव्हा शेतावरचे सामान आणून टाकतो. त्येला खर्च नाय लागत? भाऊ किती देऊन राहतो. त्येचा पगार काय? केव्हा भी वेळेवर मिळतो काय? “दीर. दिराला एक मुलगी आणि मुलगा. सर्व एकत्र गावाकडे असल्यामुळे खर्च जास्त नव्हता. आता त्याची बायको तिसऱ्या वेळी गर्भार राहिली. शेतामध्ये अविनाशचाही वाटा होता. त्याने कधी हा विचार डोक्यात ठेवून मदत केली नाही. सर्व आपले आहेत आणि शेवटी सारे आपलेच आहे.

“अग! तू काय बोलून रायली? तुला काय माहिती हाय? मी काय केले ते? माझ्या मुलाला काही सुख आहे की नाय. लग्नाला १५ वर्षे झाली. घरी वंशवेल कधी वाढणार. तू शिकलेली. तुला देव धर्माचे सांगितले ते काय पटत नाय. “सासू म्हणाली

“ते काय माझ्या हातात हाय काय? मी नेहमी हयाना सांगते मुंबईला जाऊन डॉक्टरला दाखवू. पण ऐकत नाही.” सुलभाला दिराचे बोलणे हे हिश्शाचा हक्क सांगण्यासारखे वाटू लागले.

“पैसे कोण आणणार? कुठे राहणार? “

“त्येचे काय! माझी बहीण आहे तिथे राहता येईल. “पण असले काय नाय करणार. खर्चाची सोय होईल. माझे मेव्हणे तसे चांगले आहेत. करतील मदत.”

असे बरेच दिवस चालले. शेवटी एकदा कोणाला न सांगता दोघांनी मुंबईला, फिरण्याचे कारण काढून, डॉक्टरकडे दाखविले. मूल होणार नव्हते. दोष सुलभाचा नवरा अविनाशमध्ये होता. घरी कोणाला सांगता येत नव्हते. सासू नेहमी टोचून बोलत होती. पण काय बोलणार? आपलेच ओठ आपलेच दात. शेवटी दोघांमध्ये मुलगा दत्तक घ्यायचा निर्णय झाला. कुठल्याही निराधार संस्थेतून घेण्याऐवजी घरातला घेतला तर चांगले असे दोघांनी ठरवले. माहेरहून असे काही होऊन शकत नव्हते. तेव्हा लहान दिराचा मुलगा घ्यावा असे दोघांमध्ये ठरले. सुलभाला काळजी वाटू लागली. आताच घरामध्ये त्यांचेच वर्चस्व. पुढे काय होईल. पण एव्हढा विचार करण्यास अविनाश राजी नव्हता. घरातील गोंधळ त्यामुळे कमी होऊ शकेल असे त्याला वाटत होते. अविनाशने लहान दीर आणि त्याची बायको ह्यांच्याशी बोलणे केले. आईला ही सांगितले. ते सर्व राजी झाले. सुरेश अविनाश आणि सुलभा व सुरेखा यांचेही एकमत झाले. बाहेरून घेण्यापेक्ष्या घरातील असलेला नेहमी चांगला. सर्व माहीत तरी असते. धाकटी जाऊही तयार झाली. बाळंतपण झाल्यावर घरी दत्तक समारंभ विधिपूर्वक झाला.मुलगा मांडीवर आल्यावर सुलभाचा आनंद गगनात मावेनासा झाला. वेलीवरील फुलाकडे पहात दिवस जाऊ लागले. सासूचे वय झाले. नोकरीतून निवृत्त झाल्या. घरात शांतता होती परंतु दीर वाहिनी आल्या की वेगळे काहीबाही पाठी बोलणे चाले. परंतु नीट कळू देत नव्हते. ना सुलभा लक्ष देत होती. मुलगा मोठा होऊन शाळेत जाऊ लागला. अविनाश हॉस्पिटल मधून आला की मित्रा समवेत तंबाखू आणि सिगरेट, पान तर काही वेळा मद्यपान ही करू लागला. एकदा अचानक किड्निस्टोन आजार उद्भवला. पैसे उधारीने घेऊन ऑपरेशन झाले.

पैसे खर्च झाले. थोड्याच दिवसात, हृदयविकारांचा तीव्र झटका येऊन त्याचा अकस्मात मृत्यू झाला. सुलभा वर आभाळ कोसळले. तिला जो आधार वाटत होता तोच गेला. घर दोघांच्या नावावर होते म्हणून छप्पराची चिंता नव्हती. असे असले तरी हा प्लॉटचा एक भाग त्याच्या आईच्या नावावर होता. आईने तोंडी त्याचे 4 भाग करून हिस्से वाटून दिले होते. दोघांना पैसे दिलेत आणि पुण्याच्या भावाला अविनाशने त्याचा हिस्सा पैशाच्या स्वरुपात दिला. तरी त्याचे कागद पत्रे कायदेशीर करारपत्र झाले किंवा नाही ह्याची सुलभाला कल्पना नव्हती. सर्व व्यवहार सुलभा समोर झाले होते. अविनाशचे व्यवहार, कायदेशीर देणी ह्या बद्दल काहीच कल्पना नाही. त्याची देणी किती, कोणाला काय द्यायचे ह्याचे काहीच माहीत नाही. अविनाशने कधीच ही गोष्ट खुलेपणाने सांगितली नाही. आई आणि दिराचा मात्र घरावर डोळा होता. मुलगा दिराचा होता. पुढे मागे घर आपलेच होईल ही भावना रूजली. सुलभाने मात्र दिराशी काही न बोलता सुरेशशी आता काय करायचे हे ठरवून पुढील वाटचाल करायची हे पक्के ठरविले.

सुरेश सुलभाची अवस्था पाहून तिने सांगण्या आधी लगेच धावला आणि सर्व पत्र व्यवहार पाहून कायदेशीर काय देणी मिळू शकतील ह्याचा अंदाज घेऊ लागला. सुरेश तिच्यामागे खंबीरपणे उभा राहिला. परंतु मुंबईहून दररोज जाणे येणे शक्य नव्हते. त्याने सुलभाचे मंनोधैर्य वाढविले. तिला काय करायचे ह्याच्या सूचना देऊ लागला. सुलभाची आता खरी आयुष्याची लढाई सुरू झाली. त्यात विदर्भातील रितिरिवाज ह्यामुळे फार कठीण वाटून राहिले. त्यातील मोठी लढाई होती ती ज्या

हॉस्पिटल मध्ये अविनाश कामाला होता त्याचे संस्थापक वजनदार मंत्री महदोया होत्या, त्यांच्याशी होती. त्यांचे सबंध, लागेबंधे आणि नातेवाईक याचे वर्चस्व साऱ्या पंचक्रोशीत होते. मुंबई पुणे नासिक अशी मोठी शहरे सोडली तर इतर ठिकाणी कोणीच कायदे कानून पाळत नाही. तीच गोष्ट ह्या ठिकाणी होती.संस्थापकांनी फंडाचे पैसे वेळेवर भरले नव्हते. LIC चे हफ्ते कापूनही वेळेवर भरले नाहीत. परिणामता LIC ने पैसे देण्यास नकार दिला. सुरेशने प्रत्येकठिकाणी पाठपुरावा करून प्रसंगी वजन/कायदेशीर कारवाईचा बडगा दाखवत ते मिळवून अर्धी लढाई जिंकली होती. पेंशन ही बँकेत जमा होऊन लागले. ह्यामुळे सुलभाच्या मनात धैर्य निर्माण झाले. नेहमीच जाण्या येण्याने सुरेशला सुलभाविषयी आकर्षण वाटू लागले. तिचे बरोबर असणे हे जीवनाला उभारी देऊ लागले. त्या उर्मीत त्याचे जगणे सुखकारक होऊ लागले. परंतु हे बोलण्याचे धारिष्ट होत नव्हते. असेच एके दिवशी तो आणि ती प्राचाऱ्यांच्या घरी gratuityची रक्कम मागण्यासाठी गेलेत.परंतु मुख्याध्यापकांनी कानावर हात ठेवले. आम्हाला कायदा लागू नाही. सुरेश संतप्त झाला आणि त्यांच्या बायको समोरच त्यांना म्हणाला,”ह्या ठिकाणी तुमची बायको आहे आणि तुमच्या ठिकाणी मी आहे असे समजा. तुम्ही काय म्हणाल? “ह्या प्रश्नाने ते पुरते गोंधळून गेले. त्यांनी कानावर हात ठेवले आणि संस्थापकांना भेटावयास सांगितले.सुरेश मुंबईला निघून आला.

सुलभा आता सारखी संस्थापकांच्या घरी जाऊन जाऊन कंटाळली. तिच्या एकटेपणाचा, हतबलतेचा संस्थापकीय कुटुंब गैरफायदा उठवू लागले. एकदा संस्थापकांच्या घरी गेली तेव्हा “तुम्हाला सांगितले ना, सरकार ग्रँट देत नाही, DAची

रक्कम मान्य करीत नाही त्यामुळे संस्था तुम्हाला ग्रॅच्युटी देणे लागत नाही.''मंत्रीमहोदया बाईंच्या नवऱ्याने सुनावले.

"तुम्ही काय आम्हाला सारखे त्रास देऊन रायले. कळत नाही? "

"अहो असे काय करता ही कायदेशीर देणे आहे. तुम्ही कसे नाकारता?" सुलभा.

"ओ! तुम्ही काय आम्हा कायदा शिकवून राहिले काय? जा देत नाही. हे बघ आता परुत बरेच ऐकून घेतले. तुम्ही एक स्त्री हाय आणि ती बी एकटी. म्हणून शांत होतो. तुम्ही आमच्या बायकोला बोलून राहिले?"

सुलभा खिन्न होऊन घरी आली. सासुनी "काय झाले असे विचारले."सासूला झालेला प्रकार सांगितला. सासूने सांगितले, "अग सोडून दे. कुठे मोठ्या लोकांच्या नादी लागून रायली. आपण दोघी येथे एकट्या राहतो. तुझा दीर लांब गावाकडे रायला. दे सोडून. त्याच्या कानावर घाल. तो बघ काय करू शकतो का."सासुलाही सुरेशने वरचेवर येऊन घरात लक्ष घालणे पसंत नव्हते.

"का म्हणून? ह्यांनी नोकरी केली. ते कायद्याप्रमाणे देऊ लागतात."सुलभा. इतक्यात दिलीप शाळेतून घरी आला. दिलीप आता सहावीला होता. आला, आला नी रागाने त्याने पायातील चप्पल भिरकावून दिली. दफ्तर दुसरीकडे टाकून दिले."सासू आणि सुलभाला काय झाले काही कळेच ना.

“अरे राजू काय झाले बाबा? असा का बरे करून राहिला.”तिने जवळ घेतले आणि कुरवाळू लागली. दिलीपने रागाने झिडकारले.

“आये! मला सारखे शाळेतील मुले टोमणे मारून बोलतात. तुझे वडील नाहीत. तुझे काका वडील की आणि कोणी? मला खरे काय ते सांग ना.”सुलभा हे ऐकून हबकून गेली. काय बोलावे हे कळे ना. मुलांचे बोलणे हे त्यांचे नव्हते तर घरातील कोणी काही बाही बोलत असतील म्हणून त्यांचे विचार हे सर्व ऐकून झाले असतील आणि नकळत ते दिलीपला बोलून गेले असतील. आपल्या मागे कोण काय बोलत असतील ह्याची तिला कल्पना आली. ती ही भांबाऊन गेली. आता खरा तिला कुणाचा तरी आधार हवा असे वाटले. तिने दिलीपची समजूत काढली आणि रात्री तुला सांगते असे म्हणून वेळ मारून नेली. त्याला आईस्क्रीम केलेले देऊन त्याचे लक्ष त्या गोष्टीवरून दूर करू लागली. सुलभा सैरभैर झाली. आता काय सांगावे, कसे सांगावे हे तिला कळेना. घर जरी दोघांच्या नावावर होते तरी कागदोपत्री सर्व तिच्या नावावर झाले नव्हते.ते फक्त अविनाशच्या नावावर होते.हे कुणाला ही माहीत नव्हते. दिराला तर कळून द्यायचे नव्हते कारण दिलीप त्याचाच मुलगा आहे. त्याचे मन जर कलुषित झाले तर तिला कोणाचाच आधार राहणार नाही. हे ही कळून चुकले. तिने सासूच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

सुलभा राधाकडे आली. झालेला वृतांत तिच्या कानावर घातला. सासूचे सुरेशबद्दलचे मत ही तिच्या कानावर घातले. राधाने तिला धीर दिला, “सुरेश खरच

चांगला आहे. त्याचा कसलाही स्वार्थ नाही. त्याचा संबंध नसताना धावून येतो. तुला त्याने मदत केली. पैसे मिळवून दिले. “

“हो ग. पण सासू वेगळे अर्थ काढू लागली ना. ते कसे घ्यायचे. दिलीपला कळले तर त्याला काय वाटेल. तो माझ्या कडे कसा बघेल. दिराने जर दिलीपच्या मनात काही भरवले तर काय होईल. “सुलभा

“अजून तरी काही नाही ना. मग उगाच का काळजी करते.”राधा

“दिलीपची मुंज करायची आहे. कोण बसेल त्याचे आई वडील बनून? सासू तर पहिले दिराला बसव असेच सांगेल आणि रीतीप्रमाणे ते ही बरोबर आहे. “सुलभा

“अग. जरा हळू हळू तू दिलीपच्या मनाचा ठाव घे.”राधा

“चल निघते. अंधार पडला. “

सुलभा घरी आली. रात्री जेवण झाल्यावर ती दिलीपला जवळ घेऊन गोष्ट सांगत झोपवू लागली. त्याला कॉलेज मधील मुलांच्या गमती जमती सांगू लागली. दिलीपने तरी तिला छेडले,

“आई तू सांगणार होतीस माझे वडील कोण आहेत. “

“हो रे सांगते ना. ए! तुझा माझ्यावर विश्वास आहे ना.? मी तुला कधी काही कमी पडू दिले का? “

“नाही”

"तुला कधी परके वाटले का? "

"नाही. अग पण मुले सारखी छेडतात. मी काय करू. मी राधाकाकुच्या घरी गेलो होतो तेव्हा एकदा आजी कुठल्या तरी बाईला सांगत होत्या मी तुझा मुलगा नाही. काकांचा आहे. मग मी काय करू? "

"अरे तुझे वडील तू लहान असताना देवा घरी गेले. आपण इथे नवीन राहायला आलो ना. कुणाला हे माहीत नाही. ते काही बाई बोलतात. तू लक्ष देऊ नको तिकडे. ए राजा! सांग पुन्हा असा गोंधळ नाही ना घालणार. "ती थोपटत थोपटत डोळ्यात अश्रु, हुंदके देत म्हणाली. तिच्या डोळ्यातील अश्रु दिलीपच्या गालावर पडले. तसा दिलीप ताडकन उठला."ए आई तू रडू नको, तूच माझी आई आहे."तिच्या गळ्यात पडून तिचे डोळे पुसू लागला.

"अरे तुझी आता मुंज करायची आहे. तुला मुंजेला आई बाबा म्हणून कुणाला तरी बसवावे लागेल."

"आई मग तूच बस ना. "

"अरे पण बाबा कोण होणार "प्रश्न तसाच राहिला. सुलभाला ही हा प्रश्न कसा सोडवायचा हा प्रश्न पडला. सकाळी सासूने चहा पिता पिता दिलीप समोर हा प्रश्न छेडला.

"अग! आपला प्रकाश आणि रागिणी दोघे बसतील."

सुलभाला सासू तिच्या धाकट्या दिराला आणि जावेला बसायला सांगतील असा अंदाज होताच. तो खरा ठरला. असे केले तर दिलीपला त्याचेच आई वडील विधिप्रमाणे मिळतील पण त्यातून नात्यातील माणसे पुन्हा दिलीपचे मन कलुषित करतील अशी भीती वाटू लागली.

"ए आये! मी नाही बसणार ते जर बसणार असतील तर."दिलीप

"अरे मग कोण बसणार?"सुलभा आणि तिच्या सासू एकदम म्हणाल्या.

"ए आये! तू सुरेखा मावशी आणि सुरेश काका यांना बसव. मी त्यांच्या मांडीवर बसेन. नाही तर तू बस. सुलभाला, दिलीप तिच्या मनातील बोलला हे ऐकून बरे वाटले. तिलाही हेच हवे होते. सासुला हे काही पटले नाही. तिने विरोध केला. त्यातून परत दोघींमध्ये जोरदार वाद झाला.

"आपले सक्खे असताना त्यांना का बसवायचे. अग दुसरे काका काकू आहेत. त्यांना बसू दे. अरे तुझी आई कशी बसल. लोक शेण घालतील वाळीत टाकतील. कसे तोंड दाखवायचे गावात. "

"मी कुठे काय म्हणते. हे त्याला पटून राहिले पाहिजे ना "सुलभा

"तो लहान आहे. त्याला काय कळते रीतीभाती? लोक काय म्हणतील? "सासू

"ए आजी मी नाय बसणार त्यांच्या जवळ. नाही तर मुंज करू नको."दिलीप

दिलीप शाळेची वेळ झाली म्हणून निघून गेला. घरामध्ये मात्र वादळ निर्माण झाले. काय करावे हेच सुलभाला कळेनासे झाले. ती कॉलेजला जायला निघाली. सासूने सुलभा शाळेत गेल्यावर सर्व गोष्ट प्रकाश आणि रागिणी आणि इतर मुले ह्यांच्या कानावर घातली. त्यांनाही दिलीपचे म्हणणे पटले नाही. त्याला काय कळते तो लहान आहे. सक्खे असताना हा मान सुरेश आणि सुरेखाला का द्यायचा. आपल्या घरचे कार्य आहे. ह्याचा जाब सुलभाला विचारायचा असा पक्का निश्चयं सासू आणि सर्वांनी केला.

सुलभाने फोनवर कॉलेजच्या व्यवस्थापनाने काय भूमिका घेतली ही सुरेशच्या कानावर घातली. सुरेशने पुन्हा सुलभा लढण्यास खंबीर आहे की नाही ह्याची खात्री करून घेतली. तिची तयारी पाहून त्याने घरी यायचे कबूल केले. तो त्याप्रमाणे सुट्टी घेऊन कारंजाला पोहचला.कॉलेज मध्ये या आधी जे लोक निवृत्त झालेत त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांना gratuity मिळाली की नाही हे जाणून घेतले. कुणालाही मिळाली नव्हती. परंतु कोणीही लढण्यास पुढे येत नव्हते. त्यांच्यातील काही मुलांना सेवेत सामावून घेतले होते त्यामुळे ग्रॅच्युटी दिलेली नव्हती. सुरेशने त्या सर्वांना ग्रॅच्युटी आणि मुलांची नोकरी ह्याचा काही संबंध नाही. लोकांनी साथ द्यायची नाकारले तेव्हा सुरेश समोर कायदेशीर लढाई लढण्याशिवाय पर्याय नाही हे जाणले. सुलभाने मनाची सर्व तयारी केली. तिचा सुरेशवर आणि त्याच्या जिद्धीवर संपूर्ण विश्वास होता. परंतु शेवटचा पर्याय म्हणून दिलीपला घेऊन मंत्रीमहोदयांच्या घरी जायचे ठरविले. तसे सुलभा, दिलीप आणि सुरेश घरी सकाळी सकाळी धडकले

यजमान आणि महोदया घरीच होते. यजमान पुन्हा सुलभावर खेकसले, “आता का पुन्हा आलीस? एकदा सांगितले ते कळले नाय का? “

सुरेश संतापला पण रागावर आवर घालून तो संयम बाळवून शांतपणे म्हणाला. “काय चूक आहे तिची.? ती हक्कासाठी लढते. “

“आम्ही अजून जे सोडून गेले त्या कुणाला ग्रॅच्युटी दिली नाही. आम्ही त्यांच्या मुलाला नोकरी दिली. तसे आम्ही ह्यांच्या मुलालाही देऊ.”यजमान

“तुम्ही हे कसे म्हणू शकता? काय कायदेशीर आधार आहे? ह्यांच्या मुलाचे आता वय काय? किती वर्षे थांबायचे “सुरेश

“आम्ही ते काय जाणत नाही. आम्ही मंत्रालयात ग्रँट मिळावी म्हणून अर्ज केला आहे आणि त्यात डीए + ग्रॅच्युटी धरून अनुदान मागितले आहे. ते जोपर्यंत मान्य होत नाही तो पर्यन्त आम्ही देणार नाही. “

“साहेब, हे घ्या पत्र मी सचिवालयातून आणले आहे. त्यांनी ही जबाबदारी संस्थेची आहे आणि शासनाची नाही. तुम्हाला सरकारकडून ग्रँट मिळते त्यात सर्व येते असे लिहिले आहे. हे सर्व कायदेशीर देणी संस्था देऊ लागते असे स्पष्टपणे सांगितले आहे.”सुरेश मॅडमकडे पाहत म्हणाला, “मॅडम हिचा मुलगा किती लहान आहे. तो तुमच्या नातवा सारखा आहे हा विचार करा. कशाला त्रास देता. आपण ज्या पक्षाच्या आहात त्या पक्षात आमची तरुणाई गेली. कृपया झाकली मूठ बंद ठेवा. ह्याची प्रसिद्धी केली तर तुमची अब्रू जाईल.”सुरेशचे हे वाक्य ऐकून यजमान

संतापाने लालेलाल झाले. त्यांनी सुरेशला धमकी दिली, "जा देत नाही काय बी कर. भीत नाही. माझ्या घरी येऊन मला धमकी देऊन राहिला? "

सुरेश आणि सुलभा दोघेही दिलीपला घेऊन बाहेर पडले. पुढे काय करायचे हे ठरविण्यासाठी जवळच्या देवळात आलेत. दर्शन घेऊन सुरेशच्या मनात तिच्याविषयी आकर्षण आहे हे देवा समोर सांगावे असे वाटू लागले. बराचवेळ देवळात बसून राहिले. सुरेशने सुलभाच्या पाठीवरून हात फिरविला आणि हातात हात घेऊन धीर दिला. हात तसाच हातात धरून ठेवला.सुलभाला स्पर्श हवाहवासा वाटला तरी मनात भीती निर्माण झाली.तशी ती ही तरुण होती. आणि सुरेश फक्त तीन वर्षांनी मोठा. सुरेशच खऱ्या अर्थाने तिच्या मागे सर्वस्व लावून उभा होता. तरी तिचे मन आतून,आपण हे काय करीत आहोत, आपल्याच बहिणीच्या संसारात मिठाचा खडा टाकीत आहोत, असे सांगत होते.तिची पुन्हा घालमेल सुरू झाली.

ती म्हणाली,"अहो मी तुमच्या बायकोची बहीण आहे. असे काय करता."

"खरे आहे. अग मी ही माणूस आहे. मला ही आयुष्यात या क्षणाला आधार हवा आहे. मी माझ्या आयुष्यात लग्न होऊनही एकटा. मला तुझी साथ हवी आहे. तुझ्यामुळे मला जगण्याची नवी उर्मी मिळाली. ज्या ज्या वेळी आपण भेटत असतो तेव्हा आपण खरे एकमेकांचे आहोत असेच वाटते. आतले मन नवीन ऊर्जा घेऊन काम करू लागते "

"हे कसे शक्य आहे. लोक काय म्हणतील. मी जिथे राहते तेथील लोक मला बहिष्कृत तर करतीलच पण घरात विरोधाचा वणवा वाढून मला जगणे अशक्य होईल. "

"हे बघ. तू काळजी करू नको. मी तो वणवा अंगावर घेईन. अग मला ही कळते पण मी काय करू. सर्वांचे करत आलो पण कोणी मायेने तू कसा करतोस, कसा आहेस हे कुणी विचारत नाही."

"सुरेखा आहे ना. तिला नाही सांगत."सुलभा

"अग तुला माहीत आहे सर्व गोष्टी. कस नात जुळून आले आहे. ती कधी बोलत नाही ना कुणाशी संबंध ठेवत. कधी कधी वाटत तिच्यावर नात लादले गेले आहे की काय. "

"म्हणजे काय? आता वयाच्या कुठल्या वळणावर हा विचार "

"हो मी ही तो विचार केला. इतकी वर्षे झाली काही बदल होईल या आशेने सहन करीत आलो. काहीच बदल नाही. ती तशी वाईट नाही. जस स्त्रीला पुरुषापासुन काही अपेक्षा असतात तश्या पुरूषांना नसतात का?"

"ह्या गोष्टी आताशा का येऊ लागल्या. ह्याचे परिणाम मुलीवर काय होतील. ती ही आता लग्नाला येईल."

“मी ही तेच म्हणतो. मलाही वाईट वाटते. अग कुठलीच गोष्ट ती जबाबदारीने आणि आपुलकीने करीत नाही. नाते संबंध किंवा शेजारी संबंध ठेवायचे कुणी मी की तिने? मला हिला काय अडचण येईल,काय हवे नको हे पाहून शेजारील स्त्रीशी बोलावे लागते. तिला हवे असलेले आणून ध्यावे लागते. ही जबाबदारी कुणाची? “

“माझ्यामुळे अजून ताण वाढणार नाही? आणि मला स्थान काय राहील? तुमच्या संसारात माझा वाटा काय राहील? “

“त्याची काळजी करू नको. दोघांनाही समान हक्क राहील.”

सुरेशला आशेचा किरण दिसू लागला. हो जास्त न बोलता विषय बदलत म्हणाला “हे बघ तू आता जास्त विचार करू नकोस. आपल्याला अविनाशची ग्रॅच्युटी रक्कम वसूल करायची आहे. त्याची नोटिस घरी जाऊन तयार करू.”देवळात गर्दी जमू लागली. तसे ते घरी जाण्यासाठी उठले. सुलभाने मुंजीविषयी रिक्षात विषय काढला. सुरेखा आणि तुम्ही मुंजेसाठी बसा असा आग्रह करू लागली. दिलीप सुद्धा ह्या गोष्टीला राजी आहे. त्यानेच हे सुचवले असे सांगितले.

“अग पण तुझ्या सासरचे काय म्हणतील. त्यांना चालेल का? “

“मी सगळ्यांचे ऐकून कंटाळली आहे. सासरचे स्वार्थाने सगळे बघतात. माझा पैसा आणि घर त्यांना हवे आहे. मला तुझ्याशिवाय कुणाचाच आधार नाही. धाकटा भाऊ त्याच्या संसारात रमला. तरी जगात राहायचे म्हटले तरी माझ्या हिताचा विचार करायला हवा. कुठेतरी मार्ग काढायला हवा.”

रिक्षा घरासमोर थांबली तसे दोघेही उतरून घरात जाऊ लागले. सासूच्या चेहऱ्यावर आठी होती. सुलभाने सासुला सांगितले की मुंजीला सुरेश आणि सुरेखा बसतील. हे वाक्य ऐकून सासू खवळली,"मला हे चालणार नाही"

सुरेशला काय करावे कळे ना. दोघांच्या मध्ये आपण कसे बोलावे हे कळेना. तसा सुरेश सुधारक विचाराचा होता. त्याच्या मनात सुलभाने एकटीने का बसू नये हा विचार आला. पण बोलावे कसे हे कळे ना. दिलीपने मध्येच पुन्हा म्हटले,"आये असे जर होत नसेल तर तू एकटी बस आणि मुंज लाव. नाहीतरी तूच माझे करीत आलीस ना ". सुलभा हे वाक्य ऐकून गोंधळली. ह्याला हे कुठून सुचले असे बोलायला. सासू ह्या वाक्याचा काय अर्थ काढील? तिला वाटेल सुरेश आणि माझे काही बोलणे झाले का? म्हणून तर हा बोलला नाही? हा नवा गोंधळ निर्माण केला.

"ए तू गप्प बस. तुला काय कळते यातले?"सुलभा.

सुरेशने हाच धागा पकडून हळूच म्हटले,"आई, सुलभा हयातून तर मार्ग काढायला हवा. काळ बदलला आहे.सुलभा तू बसून सगळे विधी करायला हरकत नाही.सुधारणा आपल्या पासून करायची असते.तुझा ही मान आहे की नाही. तुला मिळालाच पाहिजे."

"अवो सुरेशराव! समाज काय म्हणेल? असे कुठे चालते का? "सासू

"मग काय करायचे? हे जर चालत नसेल तर मी आणि सुलभा बसलो तर चालेल का? तिचा मान मिळेल तिला मिळेल आणि दिलीप पण शांत होतील."

“तुम्ही काय बोलून राहिलाय तुम्हाला कळते काय? असे तुमच्या बाबतीत घडले तर तुम्ही राजी व्हाल?”सासू.

“अहो मग करायचे काय? माझ्या बाबतीत हे घडले तर मी नक्की विचार करीन. वेळ आल्यास सुलभाला तो मान देईन. तिनेही माझ्या मुलीचे केले आहे. समाज काय आपल्याला मदत करीत नाही. आपणच जगायचे असते. काळा प्रमाणे बदलायाचे असते.”

सुलभाही हे वाक्य ऐकून कावरी बावरी झाली. तिलाही सुरेशचे बोलणे आवडले नाही. तरी तिने सुरेश आणि सुरेखा मुंजीला बसतील हा ठाम निर्णय सांगितला. मुंज ठरल्या प्रमाणे धुसपूस होऊन पार पडली.

त्या गडबडीत सुरेशने अविनाशच्या ग्रॅच्युटीसाठी संस्थेवर नोटिस महिन्याची मुदत देऊन पाठवली. त्याची प्रत कामगार अधिकारी ह्यांच्या कार्यालात पाठवली. व्याजासहित संस्थेवर दावा लावला.कामगार कार्यालयात चकरा सुरू झाल्या. कामगार खात्याने सबब बाब आता सरकारने त्यांच्या कडून काढून लेबर कोर्टाकडे न्यायासाठी वर्ग केली आहे असे कळविले. संस्था निर्णय ऐकून सुखावली. सुलभाही आता निवृतीच्या वयाजवळ येऊ लागली आणि सुरेशहीसाठीकडे. तरी सुरेश तिला न्याय मिळावा म्हणून धावत होता. दोघांनीही कोर्टात न्यायासाठी लढा देण्याचा निश्चय केला. सुरेशला खात्री होती आपल्या बाजूने निर्णय लागणार. परंतु त्यासाठी ठाम निश्चय, सहनशीलता हवी. त्याच्या जवळ होती.सुलभा मात्र अस्वस्थ होत होती. ती घरात एकटी पडत चालली होती. घरी सर्व तिला बोलत होते. सासूबाई आजारी

पडून स्वर्गवासी झाल्या. दीरजावा ही आता बोलू लागल्या. त्यांची पावले दिलीपला आईपासून तोडण्याच्या दिशिने पडू लागली. ते वारंवार घरी येऊन राहू लागले. त्याचे आपुलकीने करू लागले. ते ही सुरेश आणि सुलभाने केस लढविणे बरोबर नाही ह्यावर बोलू लागले. आड मार्गाने नावे ठेवू लागले. दिलीप आता चांगले टक्के मार्क मिळवून पदवी परीक्षा पास झाला. त्याच्या मनात अमेरिकेला जाऊन शिकावे असे वाटू लागले. त्यासाठी पैसे कुठून आणायचे. हा विचार सुलभाला सताऊ लागला. दिलीप काही हट्ट सोडत नव्हता. सुलभालाही त्याला शिकवायचे होते. सुलभाच्या भावाने आणि सुरेशने पैशाची व्यवस्था करून दिलीपला अमेरिकेत शिक्षणासाठी पाठविले. त्यामुळे तो तरी या वातावरणातून लांब राहील आणि त्याच्या मनावर परिणाम होणार नाही असे वाटले.

सुरेश सुलभा बऱ्यापैकी जवळ येत चालले होते. सुरेशने स्वत: पैसे खर्च करून कोर्टात केस टाकली. प्रत्येक तारखेला तो आणि ती शहरात जाऊ लागली. धाकट्या दिराने घरावर हक्क सांगण्यासाठी भांडण उकरून काढले. सुरेश त्यावेळी तिथे होता. सुलभाची आईसुद्धा म्हातारी होती. तिने आईला सासू गेल्यावर एक आधार म्हणून घरी राहण्यासाठी बोलावले. सुलभाचा धाकटा भाऊ मुंबईत होता. तो आणि भावजय ही व्यवहारापुरता कधी कधी येऊन जात असे. धाकटा दीर आणि त्याची बायको, दोन्ही भाऊ व त्यांच्या बायका घरी आल्या. त्यांनी घरातील वाटा मागण्यास सुरवात केली. सुरेशने पुढाकार घेऊन सुलभाची पाठराखण केली.

“तुम्ही हिचे कोण होऊन रायले? तुम्ही आमच्या घरच्या बाबतीत मध्ये पडायचे नाही.”धाकटा दीर.”

“मी हिचा कोण आहे हे तुम्हाला माहीत आहे.”सुरेशने सुलभाला हाताला धरून जवळ ओढले.”बोला तुमचे काय म्हणणे आहे.? मी हिला उभे राहण्यासाठी बळ देत आहे. मी हे माणूस म्हणून करीत आहे.काही नाते आहे.हिला कधी अंतर देणार नाही.कुठेलेही संकट आले तर मी माझ्या छातीवर घेईन.”सुलभाही दिरावर संतापली आणि म्हणाली,”तुम्ही काय करून राहिले माझ्यासाठी? आधी नवऱ्याकडून पैसे उकळले. मुलाला माझ्यापासून तोडत आहात.आता घरावर हक्क सांगत आहात.घर माझ्या नावावर आहे. तुम्हाला सर्वांना पैसे देऊन मोकळे केले आहे. त्यापेक्षा सुरेश बरे. त्यांनी काही न मागता माझ्या बाजूने खंबीर उभे राहून बळ दिले. पैसे वसूल करून दिले. आता ही कोर्टात तेच लढत आहेत. दिलीपला माझ्या भावाने आणि यांनीच अमेरिकेला पाठविले. तुम्ही काय केले?”

“मी त्याचा बाप आहे. तुम्हीच मला मुलगा मिळावा म्हणून गळ घातली. मी नाय आलो तुमच्याकडे.”

“हो ना. मी कुठे नाही म्हणते. ह्याचा अर्थ असा होत नाही तुम्ही आता हक्क सांगायचा. अजून मी जीवंत आहे. त्याचे लग्न व्हायचे आहे. माझे आई म्हणून सर्व कर्तव्य करीत आहे.”सुलभा.

“त्याच्या लग्नाला आम्ही यांना बसवून देणार नाही. आम्हाला विरोध केला आणि लग्न आम्हाला न सांगता केले तर आम्ही गोंधळ घालू. सांगून ठेवतो. “दीर

“अभी दिल्ली बहोत दूर है. पुढचं पुढे बघू.काळ बदललेला आहे. मी आणि सुलभा बसेन. बघू काय होते ते. आम्ही याच नात्याने बसू. तिची सर्व जबाबदारी

माझी आहे.''सुरेश सर्व, सुरेखाला जरी देहबोलीतून किंवा सुरेशच्या कधी कधी सुलभाच्या बाबतीत अतिजवळकीच्या शब्दातून कळत होते, तरी सांगितले नव्हते, ह्याची कल्पना न देता बोलून गेला.

सर्वजण शिव्या देत निघून गेलीत. समोरच्या घरातून राधा हे सर्व ऐकत होती. तिची सासूही बघत होती. सुलभाला सुरेशचा ठाम निर्णय सुखावून गेला पण ती काहीच निर्णय घेऊ शकत नव्हती. ती एकाकी होती. आई सुद्धा वय झाल्यामुळे हतबल होती. परंतु सुलभा आणि सुरेखा बाबतीत हे काय घडत आहे हे तिला अनाकलणीय पण विचित्र वाटत होते. तिने सर्व गोष्ट सुरेखाच्या कानावर घातल्या.

कोर्टाची तारीख महिन्याभराने असल्यामुळे सुरेश मुंबईला आला. सुरेशने सर्व वृतांत सुरेखाला सांगितला.

सुरेखाने टोचून म्हणाली ''तुम्ही अति बोललात असे नाही वाटले? ह्या वयात हे शोभते का? ''

''तिच्या बाजूने कोण बोलणार? तिच्यावर काय प्रसंग आहे हे तुला माहीत आहे ना? ती तुझीच बहीण आहे ना? तुझ्या नात्यांमधील कोणी पुढे झाले? ''सुरेश

''पण आई समोर असे बोलायचे का? तिला काय वाटेल? माझा विचार केला?''सुरेखा

''काय विचार करायचा. मला आयुष्यात घर पडले, घराची नाते संबंध जपताना तू खंबीर साथ करतेस? आपण घरात राहतो पण कधी पुढाकार घेऊन कुठले

निर्णय घेतेस? मला काही मन, भावना आहेत की नाहीत? आपण कृत्रिम नाती ठेऊन राहत आहोत असे नाही वाटत? “

“तुम्ही किती घरी असता? “

“म्हणजे काय? माझा व्यवसाय काय, त्यात धोके ताणतणाव किती आहेत हे तुला दिसते ना? आईवडिलांची जबाबदारी आहे? मी तुला काही कमी केले का? तुझ्या नात्यातील तसेच माझ्या नात्यातील संबंध मी जपतो. तू जरी माझ्या घरातील लोकांशी आपलेपणाने वागत नाहीस तसे मी करीत नाही ना. तुला काही टाकत नाही तिची साथ मला जगण्याची उर्मी देऊन जाते. मला जगायचे आहे आणि जगवायचे आहे. मला ऊर्जा देणाऱ्या साथीची आवश्यकता आहे. ती आपली घरातील आहे.”सुरेश

“म्हणून काय तुम्ही काहीही निर्णय घेणार. मुलगी लग्नाची आहे. जग काय म्हणेल?”

“काय म्हणणार? मी काय लग्न करीत आहे का? ती आपल्याकडे येऊन राहिली तर काय बिघडले? माझा निर्णय पक्का आहे. कुणी काही म्हणो मला पर्वा नाही.”सुरेश

कोर्टाचा निर्णय सुलभाच्या बाजूने लागला. ती अति आनंदित झाली. लढ्याला यश आले. पैसे मिळाले. कॉलेजचे सर्व लोक घरी भेटून अभिनंदन करू लागले. तुमच्यामुळे आम्हाला एक मार्ग सापडला. एक बळ मिळाले. आई, सुरेश आणि

सुलभाने घरी दिवाळी सारखा आनंद साजरा केला. सुलभा राधेच्या घरी पेढा देण्यास गेली. तिच्या घरी कुणी नव्हते हे पाहून सुलभाला हायसे वाटले.

“काय ग आज अति आनंदित आहेस. तुझ्या लढ्याचे सार्थक झाले. बरे वाटले.”राधा

“हे सर्व श्रेय सुरेशला आहे. त्याची साथ होती म्हणून शक्य झाले. कुणी तरी पाठीशी आहे. म्हणून अजून उभी आहे. आता कंटाळले ह्या सर्व त्रासाला. दिलीपचे शिक्षण आणि लग्न झाले की सुटले “सुलभा.

“मी तुझ्या घरातील तुझे दीर जावा ह्याच्याशी झालेले भांडण आमच्या घरी ऐकू येत होते.सुरेशने तुला भक्कम साथ केली. मला बरे वाटले. तू त्याच्या साथीत रहा. त्यालाही साथ दे. जगाची काळजी करू नको. “राधा

सुलभा घरी आली. तेव्हा आईने दिलीपचे आलेले पत्र दाखवले. त्यात त्याला पैसे हवे होते असे कळवले होते. तो डॉक्टरेट करायचे म्हणत होता. सुलभाने ते पत्र सुरेशला दाखविले. सुरेश मुंबईला निघून आला. काळ धावत होता. सुरेशच्या मुलीचे लग्न झाले. सुलभाची आई थकली होती. सुरेशने तिला घरी राहण्यास बोलविले परंतु तिने मुलाकडे राहणे पसंत केले. आईनेही वास्तव स्वीकारले होते. त्यांच्या नात्यातील माणसांना समजावले होते त्यामुळे तिथे विरोध झाला नाही. सुलभा ठाम होती. सुरेशने सुलभाला शब्द दिल्याप्रमाणे मुलीच्या लग्नात तिचा मान दिला. तिलाही लग्नात बाजूला बसविले. सुरेखाची समजूत काढली होती. सुरेखाने ही सुलभा-सुरेशचे नाते स्वीकारले होते. सुरेशने स्वत:ला आदिवासी कामात आधीच

झोकून दिले होते. तो कधी कधी वस्तीत राहण्यास जात असे. सुरेखा मुलीची गरज म्हणून मुलीकडे जाऊन राहत असे. मुलीच्या सासरी कुणी नव्हते. अचानक सुलभाचा फोन आला. तिने सुरेशला घरी तातडीने बोलावून घेतले. कोणे तरी सारखे ब्लॅक कॉल करीत आहे आणि धमकावण्या देत आहे.कोण आणि कशासाठी हे करत आहे हे कळत नाही. दिलीपला पैसे हवे आहेत आणि ती तर काही करू शकत नाही. त्याचे दुसरे आलेले पत्र दाखविले, भाऊ तर आता काही देऊन शकणार नाही. कसा मार्ग काढायचा हा विचार करीत असताना, घर विकण्यापलीकडे दूसरा पर्याय नव्हता. सुरेशने व तिने कुणालाही न कळविता घर सर्व सामना सकट विकले. सुलभाने सुरेशच्या घरी किवा त्याच्या बरोबर आदिवासी पाड्यावर राहण्याचा निर्णय घेतला. घर विक्रीतुन आलेल्या पैशातून दिलीपला पैसे पाठविले. बाकी सर्व सुलभाच्या नावावर ठेवले. सुलभाला पेंशन सुरू झाले होते. सुलभा सुरेशबरोबर मुंबईला आली. तिने दिलीपला पैसे कसे उभे केले आणि ती कुठे आहे हे कळविले. अचानक पाड्यावर दिलीपचा सुलभाला फोन आला. त्याने तिथे अमेरिकन मुलीशी विवाह केला. तो तिथेच तिच्याबरोबर स्थायिक होणार असा निर्णय कळवण्यासाठी फोन केला. सुलभाला हे ऐकून धक्का बसला. त्या धक्क्यामुळे तिचा पाय घसरला.

गोपाळने हाक मारल्या बरोबर तो धावला आणि तिला सावरले. ती सुरेशच्या कुशीत शिरून रडू लागली. "मी काय स्वप्न बघून रोप लावले.पाटाचे पाणी पाटाकडे वाहून गेले.मी बांध घालून बाग फुलवावी म्हटले आणि रोपच मुळाशी बेइमान झाले."सुरेशने तिला शांत केले. तिला घरात सोडून तो आजूबाजूला लावलेल्या झाडांना पाणी घालण्यासाठी वळला आणि पाणी घालू लागला. तो काही अंतर लांब

गेला. त्यालाही हुंदका अनावर झाला. सुरेशच्या मनावर दिलीपने घेतलेला निर्णय आघात करून गेला. सुलभाने त्याचा हुंदका ऐकला

“अरे काय झाले? तिथे का बसून आहेस. मला घरात सोडून तू कुठे गेलास?“

“काही नाही.सारे सारे आठवून राहिले.दैवगती खरच अजब आहे. आपण कशासाठी घर विकले. किती दिलीप बदलला. आरती प्रभुंच्या कवितेची आठवण झाली,”कोण मेले कोणासाठी रक्त ओकून “काय फळ मिळाले.?”

“असे का म्हणतोस? अरे म्हणून तर तू, मी आणि सुरेखा एक झालो. त्रिकोण पूर्ण झाला. नेहमीच होते हे चांगले असे स्वीकारून पुढे चालू. सुलभाने सुरेशला घट्ट धरले आणि पाठीवर हात ठेऊन घराकडे चालू लागली. अरे ही पाडयावरची मुले आपलीच आहेत ”

************************

लव अंकुश दिवाळी अंक २०१४

# स्मृतिचिन्ह

वसंत आठवड्यापूर्वी मनुष्यबळ आणि औद्योगिक संबंध व्यवस्थापक म्हणून बहुराष्ट्रीय औषधाच्या कंपनीत रुजू झाला होता. काळ साधारणता 1988 चा होता. कंपनी रसायनी ग्रामीण भागातील इंडस्ट्रियल झोन मध्ये होती. मुख्य शहरापासून दोन तासाच्या अंतरावर आणि तो डोंबिविलीस राहत होता. कंपनीच्या बस शिवाय दूसरा मार्ग नव्हता. फोनची सुविधा नीट नव्हती. औषधाच्या कंपनीत नोकरी मिळणे म्हणजे स्थिरता, सुख, शांतता आणि वेगळे कल्चर अशी समजूत म्हणून समज. त्याचे अजून इंडक्शन पूर्ण झालेले नव्हते. कंपनीच्या पॉलिसी आणि कंपनीत काम करणारी सर्व अधिकारी आणि कामगार यांचा संपूर्ण परिचय झालेला नव्हता. युंनियन कमिटी यांची जुजबी ओोळख झाली होती. कामगारांची ओळख व्हावी, एक नाते प्रस्थापित व्हावे म्हणून त्यांनी स्वत: ज्यांचा वाढदिवस असेल त्यांची नावे बघून त्यांना अभिष्टचिंतन केबिन मध्ये बोलावून करीत असे. त्यांना स्वत: पैसे खर्च करून चांगली कॅडबरी देत असे. त्यामुळे त्याच्याविषयी एक चांगली प्रतिमा तयार होत होती. त्याचे बोलावणे आले की आज कुणाचा तरी वाढदिवस आहे अशी चर्चा सुरू व्हायची.अजून अशी प्रथा कुठल्याही HR प्रमुखाने केली नव्हती ती फक्त

कार्यालयीन स्टाफ पुरती मर्यादित होती. वसंत त्याच्या सवयी प्रमाणे फॅक्टरी राऊंडवर जाऊन आला. केबिन मध्ये आज कुणाचा वाढदिवस आहे हे पाहत असताना,"मॉर्निंग सर ssss……..! "शेरिन, मध्यम ४५ वर्षीय सावळी, मराठी चांगले बोलणारी त्याची सेक्रेटरी, प्रथेप्रमाणे संपूर्ण मेल आणि दिवसभरातील कामाचा अजेंडा घेऊन टक टक करीत केबिन मध्ये आली. तिची केबिन ही पहिली होती आणि वसंतच्या केबिनमध्ये येण्यासाठी सर्वांना तिच्या केबिनमधून प्रवेश करावा लागत होता. शेरिनने कंपनीच्या बसमधून येताना काही लोक मागे रोड्रिक्क्स विषयी काहीतरी बडबडत होते बहुतेक ते आजारपणाविषयी असावे असे सांगितले. सारे समजून घेत असतानाच, केबिन बाहेर कामगारांचा घोळका आला. त्यामुळे कोणत्या कामगारांचा वाढदिवस आहे हे पाहण्याचे राहून गेले. केबिनवर टक टक आवाज आला. वसंत लगेच बाहेर आला. बाहेर कामगार घोळक्याने जमा झालेले होते. सर्व कामगार काहीबाही जोरजोरात बोलत होते.

"ये क्या है! इतनी बडी फॅक्टरी कामगाराओंका ख्याल नाही रखती. कंपनीका डॉक्टर कभी टाईमपे नही आता."

"बहोत पैसा देकर मॅनेजर लाते है मगर कामगारोंको अच्छी मेडिकल सुविधा नही देते. "

"ये गप्प! रोड्रिक्क्सच्या परिस्थितीचा फायदा घेऊन काही तरी वाद निर्माण करू नको. तुमची दुसरी युंनियन आहे हे माहीत आहे. त्याचा झेंडा वर करण्यासाठी

काही तरी करू नको.''कोणी चांगला बेडर कामगार हे वाक्य बोलला. वसंतचे त्याकडे लक्ष नव्हते.

वसंत सर्वांना बाजूला करीत कमिटी बरोबर बाहेर प्रॉडक्शनच्या इमारती जवळ आला. कमिटी कडून काय खरी भानगड आहे हे समजून घेत मेडिकल सेंटर मध्ये येऊन पाहतो तर ''रोड्रिक्सच्या नाकातून जोरदार रक्तप्रवाह सुरू झाला होता. त्याला धाप लागत होती. वसंताने लगेच कमिटीला आणि त्याचे जवळचे दोन मित्र ह्यांना बरोबर घेऊन, ॲम्ब्युलेन्समध्ये घालून जवळच्या MGM हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. वसंतला ही केस म्हणजे एक आव्हान होते. कोणाचे कुठे संबध आहेत,कोण कुठल्या ग्रुप मधील आहेत हे ही कळाले नव्हते.

डॉक्टर रोड्रिक्सला तपासू लागले. बाहेर वसंता कमिटीला त्याच्या घरी कोण आहेत, कुणाला बोलावू शकू याचा अंदाज घेऊ लागला. त्यावेळी जे सत्य समोर आले त्याने तो ही गोंधळून गेला. श्री सीताराम कमिटी मेंबर आणि सेक्रेटरी म्हणाला, ''साहेब गोष्ट थोडी वेगळी किचकट आहे. तिला समजायला वेळ लागेल.''श्री सीताराम हा मोठा समजूतदार कंपनीच्या बाहेर एक सामाजिक चांगला कार्यकर्ता होता.त्याचे बोलणे फक्त तोतरे असल्यामुळे नगरसेवक म्हणून निवडणूक येऊ शकत नव्हता. प्रत्येक चांगल्या कामात पुढे राहून, पदरचे पैसे खर्च करून लोकांना मदत करणारा.

''अरे पण त्याच्या घरी कळवायला हवे की नको.? ''वसंता

“हो हो! पण ती मुंबईत नसतात. एक बायको बिहारात आहे आणि दुसरी केरळ. इथे तो एकटा राहतो.”

“त्याची मुले? ”

“त्याची एक ख्रिश्चन बायको केरळात आहे. तिला दोन मुले आणि दुसरी मुसलमान तिला एक मुलगी.ती नुकतीच तिच्या आईवडिलांकडे गेली आहे. 15 वर्षापूर्वी पहिल्या ख्रिश्चन बायको बरोबर विवाह झाला आणि नंतर त्याने धर्म बदलून 7 वर्षापूर्वी मुसलमान मुली बरोबर लग्न केले तिच्या पासून मुलगी शाळेत जाणारी लहान आहे. “सीताराम

“त्याच्या घराजवळ कोण रहातो. त्याचा भाऊ इतर? ”

“तो रामचंद्र सांगू शकेल. त्याच्या शेजारी काही अंतरावर रहातो. ते दोघे एका ग्रुपचे. दररोज संध्याकाळी त्यांची मैफल असते.”

इतर कमिटीला जवळ बोलावून त्याला संपर्क साधण्यास सांगितले. तो दुसऱ्या पाळीत होता. त्याला हॉस्पिटल मध्ये बोलावून घेतले.

“त्याचा भाऊ बहीण आहे ती गोव्यात असतात. त्यांनी ह्याच्या बरोबर संबंध तोडले आहेत. “रामचंद्र सांगू लागला.

“का? “बाकी सर्व कमिटी एकमेकाकडे बघत हसू लागतात.

"काय आहे. त्यांनी आताच 7 वर्षापूर्वी जेव्हा दुसरे लग्न केले ते पहिलीला मान्य नव्हतं. दोघांचे वाद व्हायचे. भावांनाही हे पसंत नव्हते ते ही येत नव्हते. दोन मुले मोठी आहेत, कॉलेज मध्ये शिकतात.ती आई वडिलांची एकुलती एक आहे. घरी शेती आहे. ती ह्याला सोडून गेली."

"आता कुणाला तरी बोलावले पाहिजे. "

तितक्यात डॉक्टर बाहेर आलेत. त्यांनी वसंताला बाजूला रूममध्ये बोलावले. वसंता निवडक कमिटी मेंबर आणि श्री रामचंद्राला बरोबर आत घेऊन गेला.

"केस गंभीर आहे. त्याच्या नात्यातील कोण आहेत. निर्णय घेण्यासाठी घरचे हवेत? "डॉक्टर

"कोण नाही. आता मी आणि माझे कमिटी मेंबर आहोत. काय झाले आहे त्याला? "वसंता

"छाती आणि नाकाजवळील रक्त वाहिनी फुटली आहे. त्याला ब्लडप्रेशर आहे आणि ते अचानक वाढले. कदाचित त्याने गोळी घेतली नसेल. त्याला शुगर ही आहे. त्यामुळे केस अधिक गंभीर झाली आहे."

"ह्यावर आता काय उपाय? "वसंता

"आमच्या हॉस्पिटल मध्ये ह्यावर उपचार करण्यासाठी औषध व साधनसामुग्री नाही. त्याला केईएम मध्येच ताबडतोब हलवावे लागेल तर वाचेल. त्याच्यावर तात्पुरता इलाज केला आहे. त्याला न्यायचे असेल तर ॲम्ब्युलेन्स मध्ये

ब्लड आणि ऑक्सिजन सिलेंडर हवे. नाही तर नेता येणार नाही. धोका आहे.''इति डॉक्टर.

"आपण ॲम्ब्युलेन्स देऊ शकाल का?"

"करता येईल. तुम्ही बाहेर बोलून घ्या. काही पैसे भरावे लागतील. पण निर्णय लवकर घ्या."

"सर केईएम तर लांब आहे. जाइस्तोवर दोन तास जातील. तिथे पुन्हा ॲडमिशन मिळेल किंवा नाही हे सांगता येत नाही. दुसरे कुठले जवळचे हॉस्पिटल? "

"तुम्ही रिलायन्सचे बघा. खर्च जास्त होईल परंतु त्याला इलाज करण्यासाठी औषध आणि साधनसामुग्री असेल की नाही माहीत नाही."

वसंतापुढे काय निर्णय घ्यावा हा पेच उभा राहिला.टेलिफोन यंत्रणा फक्त कशीबशी चालू असे. त्यांनी कमिटीला बाजूला घेऊन प्रसंगाची जाणीव करून दिली. निर्णय कसा घ्यायचा ते ठरवा. त्याचे नातेवाईक नाहीत कमिटी आपासात चर्चा करत उभी राहिली हे पाहून त्यांनी टेलिफोन वर साहेबांशी संपर्क साधला. त्यांना परिस्थितीची कल्पना दिली. त्यांनी कंपनी मेडिक्लेमच्या व्यतिरिक्त पैसे देऊ शकत नाही. त्याला फंडातून पैसे काढता येतील. फंडातून काढण्यासाठी कामगार शुद्धीवर हवा त्याच्याशी बोलता येत नव्हते. त्याचे नातेवाईक ही नव्हते. वसंताने कंपनी आकौंट्स मधून 10,000/- सीतारामला घ्यायला सांगितले होते. ते लगेच वळते

करावे लागणार होते आणि ते मेडिक्लेमच्या कामगाराच्या बिलातून वळते होणार होते. रोजच्या औषधाला नातेवाईक जो पर्यन्त येत नाहीत तोपर्यंत कोण खर्च करणार हा प्रश्न होता.

श्री रामचंद्र त्याच्यापरीने नाते संबंधातील कोणी भेटतात का हे शोधत होता. त्याचा मार्ग म्हणजे मैफिलीतील दोस्त आणि त्या माध्यमातून शेजारी यांची ओळख काढणे. कमिटी कुठलाच निर्णय घेत नव्हती. वसंताचे साहेब ही काही निर्णय सांगत नव्हते. कंपनीतील इतर त्याचे साहेब कुणीच आले नाहीत आणि निर्णय सांगत नव्हते. वेळ तर निघून चालली होती. कंपनीतील कामगार ओळखीच्या मित्रांना पाठवून चौकशी करत होते. कंपनीतील ह्या घटनेचा कामावर परिणाम होत होता. वसंतापुढे मानवी मूल्ये, माणुसकी आणि व्यवसाय ह्यातील मूल्ये हा संघर्ष डोक्यात थैमान घालू लागला. दुसरीकडे कामगारांचा दुसरा ग्रुप ह्या गोष्टीचे भांडवल करून कंपनीत वाद निर्माण करीत होता. निर्णय मात्र कोणीच घेत नव्हते. खरच एक गोष्ट खरी कुणाच्या मरणावर कुणाचे जगणे हेच जीवनाचे सूत्र आहे का? उत्तर काही सापडत नव्हते. मानवी मन अथांग आहे. त्याचा ठाव काही लागत नाही.

कमिटीला त्यातल्या त्यात श्री सीताराम आणि रामचंद्र इतर ह्यांना बाजूला बोलावून विचारले,"काय करायचे? वेळ निघून चालली आहे. ह्या घडीला दोनच पर्याय आहेत एक दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये न्यायचे नाही आणि जे होईल ते पहायचे. दुसरे त्याला केईएम ला स्थलांतर करून मरण पुढे ढकलायचे. केईएमला नेले तर जीव तरी वाचेल आणि मधल्या काळात त्याच्या नातेवाईकांना कळविता येईल.

“त्याचा नवीन बायकोवर जीव आहे. तिने ह्याला मधे आजारी झाला असताना सर्व तऱ्हेने सांभाळ केला. त्याच्यासाठी घरची धुणीभांडी करून, बियर बार मध्ये काम करून पैसे मिळविले. ती भावाचे लग्न म्हणून बिहारला गेली आहे. तिला कळविले पाहिजे. ती ज्या बार मध्ये होती तेथून नंबर मिळतो का हे पाहिले पाहिजे. “रामचंद्र

“अरे आता काय करू या? तू तो शामको जायगा तेरे टाईमपे. अभी कया करना है “इतर कामगार

सर्वांनी वसंताला निर्णय घ्यायला सांगून त्याला साथ करण्याचे वचन दिले. आपल्या हातात जे आहे ते करायचे असे ठरवून त्याने लगेच केईएमला शिफ्ट करण्याचे ठरवून डॉक्टरला तसे सांगितले. हा निर्णय म्हणजे एक धोकादायक खेळ होता, अस्तित्व आणि मरण ह्यांच्या दरीतील प्रवास होता. ॲम्ब्युलेन्स करिता पैसे भरले. ताबडतोब केईएमला निघाले. रोड्रिक्सला ग्लानी होती. त्याला काही समजत नव्हते. वसंता मनातल्या मनात तो शुद्धीवर यावा म्हणून प्रार्थना करीत होता.

“ह्यानी स्वत:ची बरबादी करून घेतली. पहिली बायको खरच चांगली आहे. ह्याला सर्व तऱ्हेचे छंद. तिची नोकरी होती म्हणून घर चालत होते. ती दुसऱ्या औषधाच्या कंपनीत पॅकिंग ला होती. “सीताराम

“हा साब. ये हर घडी पत्ता और dance बार इसमे डुबा हूआ. पुरा पगार इसमे डालता है” रामचंद्र

एकेक कामगार त्याचे छंद वर्णन करू लागले.

“अबे रामचंद्र! तू अभीभी सुधर जा. छोड दे सारा बकवास. नही तो तेरी भी ऐसी हालत होगी. “गोविंद दूसरा कामगार प्रतिनिधी

रामचंद्र आणि रोड्रिक्स हे दुसऱ्या ग्रुपचे होते. त्यांनीच पुढाकार घेऊन दुसरी यूनियन आणायचा प्रयत्न चालवला होता.

दूसरा कामगार बोलू लागला, ”त्याची पहिली बायको सुंदर होती. हा ही उत्कृष्ट पैलवान होता. कुस्ती जिंकायचा. दोघे ही एकाच सोसायटी मध्ये राहायचे. जमून गेले. सुरवातीला चांगले होते. आपल्या कंपनीने ह्याला स्पॉन्सर केले होते आणि त्यांनी बक्षीस मिळविले. डोक्यात हवा गेली आणि साथ संगत खराब मिळाली.”

“बायकोकडे पैसे मागायचा. ती तरी किती देणार. मित्रांकडून घेऊ लागला. बायकोला मारू लागला. ती कंटाळली. तिचे वडिलांचे घर श्रीमंत चांगले होते. मुले लहान होती. घरी सुख नाही म्हणून तिचे प्रेम दुसऱ्या बरोबर बसले आणि ती केरळ ला गेली. लग्न झाले की नाही माहीत नाही.”रामचंद्र बोलू लागला, “हा परेशान झाला आणि बार मध्ये जाऊ लागला आणि ह्या बाईशी लग्न केले का तसाच राहतो हे माहीत नाही. तिच्याच घरी कुर्ल्याला बैठ्या चाळीत रहातो. मुलगी आहे. घर विकून टाकले हिच्यासाठी.”

औषधाच्या कंपनीत कामगारांना त्यांच्या क्षमतेपेक्षा पगार चांगले होते. शनिवार रविवार सुट्टी. कंपनीत सर्व सुखसोयी त्यामुळे त्यांनी काही जीवनात करावे हे फार कमी कामगारांना कळत होते. श्रम कमी आणि पैसे भरपूर. औषध म्हणजे ही

महत्वाची गोष्ट सर्वांनाच हवी असते. व्यवस्थापन कंपनीत शांती नांदावी ह्या हेतूने करार करीत होते.शांतता विकत घेत होते. कामगार गैरफायदा घेत होते.

रोड्रिक्क्सला शुद्ध आली. सर्वांना हायसे वाटले. श्री सीतारामने हळूच कानाजवळ जाऊन बायकोचा पत्ता आणि फोन नंबर विचारला. त्याच्यापुढे कागद पेन दिले. त्यांनी कसेबसे नाव आणि नंबर लिहिला. हॉस्पिटल जवळ आले. रोड्रिक्क्सला तातडी म्हणून “emergency”मध्ये नेले. डॉक्टरांनी कुठलाही वॉर्ड खाली नाही. ॲडमिट केले तर त्याला सध्यातरी खाली झोपावे लागेल असे सांगितले. श्री सीताराम आणि श्री रामचंद्र बाहेर जाऊन रोड्रिक्क्सच्या बायकोला फोन करू लागले. परंतु फोन काही लागे ना. शेवटी त्यांना टेलिग्राम पाठवायला सांगितला. कंपनीतले कामगार संध्याकाळी येऊ लागले. त्यांनाही रोड्रिक्क्सला खाली झोपायला सांगितले हे ऐकून त्यांचा संताप अनावर झाला. त्यांची प्रतिक्रिया वसंताला शिव्या घालण्यापर्यंत गेली.वसंताला शिव्या दिल्या म्हणून दोन ग्रुप हॉस्पिटलमध्ये वादविवाद करू लागले. प्रसंग हातघाईवर येत होते. डॉक्टरने मध्ये पडून पोलिसांना बोलवावे लागेल अशी तंबी दिली. वसंता त्याच्या ओळखीतून डिनपर्यन्त पोहचला. काही व्यवस्था करावी अशी विनंती केली. सकाळपर्यंत तरी व्यवस्था होऊ शकणार नाही परंतु त्यांची चांगली देखभाल ठेवली जाईल असे आश्वाशन दिले.

वसंता दोन्ही ग्रुपला बाहेर घेऊन आला. त्यांना खरा प्रकार आणि रोग काय आहे हे सांगितले. त्याचे दिवस थोडे आहेत. मरण फक्त पुढे ढकलले आहे. दूसरा ग्रुप ऐकत नव्हता. काही संधी साधून प्रश्न कसे निर्माण होतील हे पाहत होते. शेवटी

वसंताने त्याच्या साहेबाच्या कानावर ही गोष्ट सांगितली. नवीन ग्रुप प्रश्न निर्माण करून परिस्थिती बिकट करीत आहेत आणि काहीतरी कृती करणे आवश्यक आहे. त्याचे नातेवाईक येईस्तोवर कुणी तरी आळीपाळीने हॉस्पिटल मधे झोपावे लागणार आहे. अजून त्याच्या डिपार्टमेंटच्या साहेबांनी साधी चौकशी केली नाही ना कुणी अजून आले. रात्र खूप झाली वसंताने केव्हा येणार हे अजून घरी कळविले नव्हते. त्याला आपल्या प्रॉफेशनविषयी उबक येऊ लागला. अवस्था ना घरका ना घाटका. युंनियनचे कामगार, त्यांचे प्रतिंनिधी जबाबदारीचे भान ठेवत नाहीत. उच्च व्यवस्थापन निर्णय घेत नाही. उच्च अधिकारी फक्त बोलताना मोठे मोठे शब्द वापरुन वेळ मारून नेतात. वसंताने शेवटी कामगारांबरोबर चर्चा करून कोणी तरी तिथे राहण्यासाठी आग्रह केला. कशी तरी सोय करून वेळ मारून नेली. फॅक्टरीतून कोणीच कामगार येत नव्हता ना दुसऱ्या ग्रुपच्या यूनियनचे लोक पुढे येत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी वसंता फॅक्टरी मध्ये आला. त्याच्या साहेबा बरोबर चर्चा करून त्यांच्या पैकी कोण अधिकारी तिथे राहील ह्याचा अंदाज घेता “हे काम HR चे आहे. आमचा काय संबंध? आम्ही फक्त प्रॉडक्शन बघणार. प्रॉडक्शनच्या मोठ्या साहेबाचे हे बेजबाबदारपणाचे शब्द ऐकून चाट पडला. शेवटी वसंताने “तो तुमचा कोणी नाही का?”हे शब्द उच्चारताच “तुम्ही जास्त बोलत आहात. तुम्ही नवीन आहात हे ध्यानात ठेवा.”वसंता थेट उठून बाहेर पडला.

रोड्रिक्क्सच्या घरचे जो पर्यन्त येत नाहीत तो पर्यन्त हे काम कसे तरी करावे लागणार ह्या शिवाय पर्याय नव्हता. वसंताने श्री सीताराम बरोबर चर्चा करून मार्ग

काढण्याचे ठरविले. त्याने आपल्या साहेबाला ही घटना सांगितली. त्याच्या कडून फक्त, "तू manage कर "एव्हढेच दिशा दर्शक शब्द ऐकू आले. तो ऑफिसमध्ये आला आणि काही महत्वाचे पेपर चाळून पुन्हा हॉस्पिटल मध्ये जायचे असे ठरविले. शेरिनने आल्यावर लगेच चहाची व्यवस्था केली. केबीन मध्ये येऊन, "सर तुम्ही थकलेले आहात. घरी उशिरा गेला असाल ना.?"

"होय. कुणीच जबाबदारी घ्यायला मागत नाही. यूनियन मधील दोन व्यक्ती वगळता कोणीच जबाबदारी घेऊन धावत नाही. सगळे हॉस्पिटलच्या नावाखाली भेट देऊन घरी लवकर पाळतात."

"खरेच तुम्ही ज्या माणुसकीने हे हाताळीत आहात तसे पूर्वी कुणी केले नाही. तुमच्या आधी जे होते ते नुसते साहेब सांगतील ते करायचे."शेरिनचे उत्साहवर्धक वाक्य धीर देऊन गेले.

श्री सीताराम आणि श्री रामचंद्र केबिनमध्ये आलेत. त्यांनी त्याची दुसरी बायको बिहारमधून निघाली आहे. सोबत सासरे आहेत. ते आज रात्री पोहचतील असे कळविले आहे. कोणी तरी त्याच्याकडील येणार महणून सर्वांनी सुस्कारा सोडला.

श्री सीतारामने कंपनीला 25 वर्षे झाली म्हणून कामगार कंपनी जे 100 ग्रॅम चांदीचे नाणे आणि ½ किलो मिठाई देत आहे ते मान्य नाही. काही तरी वाढवून मिळावे यासाठी कमिटी भेटू इच्छिते. म्हणून आता सगळे येतील. श्री रामचंद्र ही वेळ साधून म्हणाला,"साहेब आमची माणसे ही तुम्हाला भेटू इच्छितात."कामगारांना सुद्धा प्रसंग काय आणि कुठली मागणी पुढे रेटावी याचे भान नसते.

“रामचंद्र तुम्हाला मी रोड्रिक्क्सच्या केसमध्ये साथीला घेतले म्हणजे तुमच्या यूनियनचे घटनामत्क अधिकार आणि अस्तित्व मान्य केले असे होत नाही. तुम्ही त्याचे शेजारी आहात आणि मित्र आहात म्हणून बोलावले. यूनियनच्या बाबतीत सदस्यसंख्या कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करा. मग काय ते बघता येईल.”वसंता. श्री रामचंद्र त्याचा अपमान झाला असे समजून जाता जाता, “बघून घेईन. “म्हणून ताडकन उठून गेला.

कमिटीचे सर्व लोक आत आले. श्री गोविंदने सुरवात केली, “साहेब काय करायचे? कामगार 150 ग्रॅमचे नाणे मागत आहेत.”

“तुम्ही कुठल्या आधारावर हे मागत आहात? “

“कामगार कंपनीसाठी योगदान करतात. “कामगार

“कुठे कोण नाकारत आहे? म्हणून तर कंपनी स्वत:हून देत आहे. हा कायदेशीर हक्क होऊ शकत नाही. तुम्ही जास्त ताणू नका. जागतिक परिस्थिती सध्या औषधाच्या कंपन्या take over च्या परिस्थितीतून जात आहेत आणि तुम्हाला ही माहीत आहे आपली कंपनी त्यात आहे. व्यवस्थापन ह्यात तडजोड करणार नाही. जर घेतले नाही तर देणार नाही आणि मिठाई कुठल्यातरी अनाथालयाला देईल. “वसंता

कामगार ही काही बोलले नाहीत. सर्व निघून गेलेत. श्री सीताराम जाता जाता म्हणाला,”तुम्ही बरोबर बोललात. मी कमिटी मेंबर म्हणून बोलू शकत नाही. जे जुने

कामगार आहेत ते समंजस आहेत. काही नवीन आणि दुसऱ्या यूनियनचे कामगार ही गडबड करीत आहेत.''ह्या प्रश्नावर व्यवस्थापन ठाम राहून वसंताने तशी भेट वस्तु आणि मिठाई कंपनी पुजा झाल्यावर कशी मिळणार या संदर्भात नोटिस लावली. हा प्रश्न सुटेल की नाही ह्याची शाश्वती नव्हती. जर कोणी मिठाई घेतली नाही तर ती खरच अनाथालयाला द्यावी लागेल आणि पुन्हा कामगारांची नाराजी ओढवून घ्यावी लागेल ह्या स्थितीत तो प्रश्न राहिला. तो श्री सीतारामला बरोबर घेऊन हॉस्पिटलमध्ये पोहचला. त्याने गोविंदला घरी जाण्यास सांगितले. त्याची बायको रात्री येत आहे. आधार म्हणून पुन्हा रात्रो पोहचण्यास सांगितले.रोड्रिक्सला वरांडयामधून जनरल वार्ड मध्ये शिफ्ट केले होते. रोड्रिक्स शुद्धीवर होता. चांगला बोलूही लागला होता. त्यालाही घरून कोण येत आहे याची ओढ लागली होती. त्यालाही त्याची बायको येत आहे हे कळविले हे ऐकून त्याच्या चेहरा खुलला. उधाणल्या सागरात काही आधार मिळावा हे शेवटी प्रत्येकाला वाटते. किती जरी वाहत गेला तरी आपले असल्याशिवाय शांती मिळत नाही ते सत्य असते ते शेवटी काळाची पाने झडून गेल्यावर कळते.

तो म्हणाला ''साहेब तुम्ही बरेच धावलात आणि जोखीम पत्करून मला येथे आणले. खरच तुमचे कसे आभार मानू हे कळत नाही.''

''अरे पण तुझी केरळला असणारी बायको तिला नको कळवायला? तिचा पत्ता आहे का? ''वसंता

''नही नही उसको मत बुलावो. मेरे घरका सबकुछ लेके वो चली गई ''

“असे काय म्हणतो? ती तुझी बायको आहे. ती आम्हाला नावे ठेवील. “

वसंताने तो विषय बंद केला.नसते लचांड मागे लागेल.उगीच त्रास झाला तर सर्वांना त्रास होईल. डॉक्टरचे रिपोर्ट पाहून त्याने डॉक्टर कडे तब्येतीविषयी चौकशी केली. धोका टळलेला नाही. कधी काही होऊ शकते असे त्यांनी सांगितले. सीतारामला तिथे बसण्यास विनंती करून तो पुन्हा संध्याकाळी येतो असे सांगून फॅक्टरीत येण्यास निघाला. संध्याकाळी तो पुन्हा आला तेव्हा त्याची बायको, सासरे पोहचले होते. श्री सीताराम तिथे होताच. तो काही बोलला नाही याचा अंदाज घेऊन तो डॉक्टरचे रीपोर्ट पाहून त्याच्या बायकोला तेथेच बसवून सासऱ्यांना बाजूला घेऊन डॉक्टरकडे आला. त्याचे निदान डॉक्टरने सांगावे या हेतूने त्यांनी डॉक्टरची ओळख करून दिली. डॉक्टरने त्याची सर्व माहिती देऊन मनाची तयारी करायला सांगितली. सासऱ्याच्या डोळयात पाणी आले. स्वर गदगदित होऊन म्हणाले, “अब क्या होगा बेटीका? मै तो मजुरी करके दिन गुजार रहा हू. और दो बेटीया है. बिहारमे हमारी खेती है. उसमे सब भाईयोंका हिस्सा है. कुछ नही मिलता हमे. यह बेटी मुझे मदत करने केलीये बंबई आयी. बताया भी नही वो क्या काम करती है. दूर के रिश्तेदार ऊनके घर कुर्ला मे रहने लगी. कभी शादी किई यह भी मालूम नही. हमे बुलाया नही. बच्चा होनेके बाद पताया सब कुछ. खाली पैसे भेजा करती थी ”

वसंताने आणि सीतारामने धीर दिला. त्याच्या जवळील पैसे सासऱ्याकडे देऊ केले. बायकोला ही धीर देऊन ते घरी जाण्यास निघाले. कोणी तरी घरचे आले हेच समाधान.

दुसऱ्या दिवशी फॅक्टरीत आता तरी शांतपणे काम करता येईल असे वाटून तो शेरिन बरोबर चर्चा करू लागला. दोन दिवस तो स्वता:चे घरही विसरला होता इतका ह्या केसमध्ये जीव ओतून काम करीत होता. तिने रोड्रिक्क्सची फाइल काढून ठेवली होती. तसेच अक्कौंट्स मधून त्याचे लोन किती, फंड ट्रस्ट असल्यामुळे किती मिळेल ह्याचा तपशील काढला होता. डिपार्टमेंटमध्ये त्याच्या लग्नाविषयी काही पुरावा किंवा अन्य माहिती काय मिळेल म्हणून त्यांनी मीटिंग घेतली. लग्नाची अधिकृत माहिती फक्त पहिल्या बायकोची होती. परंतु तिचा केरळचा पत्ता नव्हता. कंपनीच्या सर्व रेकॉर्डवर पहिल्या बायकोचे नाव होते.

दुपारी अचानक रोड्रिक्क्स गेल्याची खबर फॅक्टरीत पोहचली. शेरिन आणि वसंता केबिनमध्ये मागण्यासबंधी गोळा केलेली माहिती एकत्र करून प्रेझेंटेशन बनवीत होते. वसंताने आता कायदेशीर देणी कुणाला ध्यायची याचा विचार करू लागला. शेरिन ही ख्रिश्चन होती. ती म्हणाली त्यांच्या धर्मात घटस्फोट मिळत नाही. दुसरे लग्न करता येत नाही.

"ह्याने दुसरे लग्न कसे केले? "ह्याचा काही शोध लागे ना. वसंता आणि काही कामगार अंत्यविधीला जाऊन आले. परत येताना कामगार वसंताला म्हणू लागले,"साहब सब पैसा उसके दुसरे औरत को दो. वो गरीब है. उसका सबकुछ उसनेही किया है. बेटिपर उसका प्यार था."

काही दिवस गेल्यानंतर दोन्ही बायकांनी रोड्रिक्क्सची कायदेशीर देणी त्यांनाच मिळावी म्हणून पत्रे पाठविली. सोबत दोघांनी लग्नाचे पुरावे जोडले. त्याच सर्व

कायदेशीर रक्कम मिळण्यास पात्र आहेत असा दावा सांगू लागल्यात. पहिल्या बायकोने त्यांच्या रिती प्रमाणे चर्चचा दाखला जोडला. दुसरीने रोड्रिक्सने बांद्राच्या मशिदीत मुस्लिम धर्म स्वीकारून लग्न केल्याचा दाखला जोडला. इथे कंपनीच्या 25 वर्षाचा प्रश्न हयागोष्टीमुळे न वाढता सुटून गेला. खरी गोम होती त्याने पहिल्या बायको पासून घटस्फोट न घेता दुसरे लग्न केले कसे? दोघांनीही कंपनीने 100 ग्रॅमचे स्मृतिचिन्ह मिळावे ह्याचाही उल्लेख केला.त्याने सर्व बाब वरिष्ठांना सांगितली. वरिष्ठांनी कोर्टातून “succession”सर्टिफिकेट घेऊन येण्यास सांगितले. तो पर्यन्त पैसे कुणालाच द्यायचे नाहीत असा आदेश दिला. स्मृतिचिन्हाबाबत कंपनी दोघांना देऊ शकत नाही. असे धोरणात्मक निर्णय दिलेत. वसंताने दोघांनाही पत्राव्दारे कळवून त्याची प्रत यूनियनला दिली. कायद्याप्रमाणे “succession”सर्टिफिकेट मिळण्यास बराच अवधी जातो. कधी कधी 5 वर्षे जातात. पहिल्या बायकोला पैशाची चिंता नव्हती. दुसरी मात्र परिस्थितीने गांजली होती. आता तर तिला कुठे राहावे. मुलीचे कसे होणार, घर कसे चालवायचे? इ प्रश्न आsssवाचून उभे होते. वसंतालाही दुसऱ्या बायकोला पैसे मिळावेत असे वाटत होते. परंतु कायदा आणि धोरण याच्या कात्रीतून कसे सुटायचे हा गंभीर प्रश्न होता. दोघांचे नातेवाईक त्या बाईकांबरोबर कंपनीत वरच्यावर येऊ लागलेत. श्री रामचंद्र आणि इतर दुसऱ्या यूनियनचे कामगार ह्या गोष्टीवरुन कामगारांमध्ये गोंधळ निर्माण करून लागले. वसंताला हा प्रश्न सोडवायचा नाही असा उलटा प्रचार करू लागले. सर्व कामगारांना दुसऱ्या बायको विषयी सहानुभूती होती आणि तिला पैसे मिळावेत असे आग्रही

प्रतिपादन होते. परंतु कायदा तिच्या बाजूने नव्हता. तिचे नाव वारस म्हणून जोडले गेले नव्हते. ही चूक रोड्रिक्सची होती.

शेवटी हा प्रश्न माणुसकीने तडजोडीतून सोडवला पाहिजे. ह्यासाठी वसंताने व्यवस्थापनाला दोघींनाही 50/50% रक्कम तडजोडीचे affidavit notarization करून द्यावे आणि स्मृतिचिन्ह कोणालाही मिळणार नाही कारण त्यात कंपनीच्या भावनेचा प्रश्न आहे. ते चिन्ह 50/50% करता येणार नाही. ही जर अट मान्य झाली तर हा प्रश्न सोडवायला हवा असा प्रस्ताव मांडला. व्यवस्थापनाने तो मान्य करून सर्व अधिकार वसंताला दिले. कमिटी जेव्हा ह्या प्रश्नावर भेटायला आली तेव्हा व्यवस्थापनाचा धोरणात्मक निर्णय व अट समजावून सांगितली. ही अटजर दोघींना मान्य असेल तर आपण हा प्रश्न सोडवू नाही तर त्यांनी कोर्टात जाऊन निर्णय घेऊन यावा. दुसरी यूनियन ह्या गोष्टीला राजी नव्हती. दुसऱ्या बायकोला संपूर्ण रक्कम मिळाली पाहिजे तीच खरी कायदेशीर वारस आहे, तिनेच रोड्रिक्सची काळजी घेतली. तिचे लग्न कायदेशीर झालेले आहे.हे कामगारांचे दडपण.दोघीजणी आपापल्या नात्यातील लोकांना घेऊन आल्यात. पहिल्या बायकोने बरोबर वकिलास आणले. वसंताने कमिटीला,दोघींना आणि त्यांच्या नातेवाईकांना एकत्र बसवले. दोघींकडून रोड्रिक्सचे दोघांशी लग्नाचे संबंध होते हे मान्य करून घेतले. कायदेशीरपणे हा प्रश्न सोडवण्यास किती वेळ लागेल, कंपनी विलींनीकरणांनंतर राहील किंवा नाही, नाही राहिली तर हा प्रश्न कोण सोडवेल इ सर्व समजुतीने सांगितले. पहिल्या बायकोच्या वकिलाने ही गोष्ट मान्य केली. दोघांनाही ही कठीण बाब समजावली. दोघीही ह्या गोष्टीला राजी झाल्यात. दोघींनीही पुन्हा 100 ग्रॅम

चांदीच्या नाण्याबद्दल दोघींना देण्याची विनंती केली. हा कंपनीच्या भावनेचा प्रश्न आहे. हा हक्काचा प्रश्न नाही. ते चिन्ह कोणालाही मिळणार नाही. अखेर हा प्रश्न समजुतीने सुटला. दोघींनाही न्याय मिळाला. कमिटी खुश झाली. वसंताला आयुष्यात एक घर उभे करण्याचे समाधान मिळाले.

शेरिनने वसंताला, “I am proud of you sir! “म्हणून अभिनंदन केले.

*******************************

गृहशोभा सप्टेंबर २०१७

# रिंकू

इंटरनेट, त्यातील गप्पा, मैत्री आणि त्यातून निर्माण होणारी नाती हयातून आजच्या मध्यम वर्गातील कोणीच सुटलेला नाही. रिंकू तर इंग्रजी विषय घेऊन पदवीधर झालेली. रिंकूची मोठी बहीण मालती साहित्य आणि मानसशास्त्र विषयाची व्याख्याता म्हणून नोकरीस लागलेली. या ही दोघी याला अपवाद नव्हत्या. त्या सायबर मध्ये जाऊन आपली हौस भागवून घ्यायच्या. हळू हळू त्यांना ह्यातील नवीन नवीन गोष्टी अवगत होऊ लागल्या. मध्यमवर्गीय कुटुंबातील दोघीही हायफाय मैत्रीत मोठ्या झालेल्या. आई कमलताई, स्वभावाने शांत, सेल्स टॅक्स मध्ये नोकरीला. वडील गणपतराव, बोलके, लोकांच्या सवयी,आवड जाणून घेणारे, सरकारी नोकरीतून वाचनाची भूक भागवण्यासाठी अकाली स्वेच्छा निवृती स्वीकारलेले.असे ते तरी लोकांना सांगायचे.घरातील कुटुंब मध्यमवयीन सुखी समाधानी, नैतिक संस्काराचे अत्यंत काटेकोर अंमलबजावणी करणारे.घर वाचनसंस्कृती जोपासणारे परंतु मुली त्यापासून लांबच राहणे पसंत करत.

रिंकू आणि मालती फिरून घरी आल्यात. वडील सार्वजनिक वाचंनालयातून पुस्तके घेऊन आलेत.

“रिंकू, आई आली का कामावरून? गणपतराव

“नाही अजून. का हो बाबा “रिंकू

“नाही सहज विचारले. 7.30 वाजून गेलेत. तू माझ्यासाठी थोडा चहा करशील? ती येई पर्यन्त मी पुस्तक वाचून काढीन.”गणपतराव

रिंकूने मात्र लगेच होकार दिला. नाहीतर नवीन आणलेल्या पुस्तकात काय आहे, ह्याची ते तिला आवडत नसलेले, वैचारिक सांगू लागले असते. तिला आता इंटरनेट च्याटिंगची सवय लागली होती. घरात सोय नसल्यामुळे ती सायबरमध्ये जाऊन बसे. घरी मात्र ती इंटरनेटचा उपयोग नवीन नवीन गोष्टी समजून घेण्यासाठी करीत आहे असे सांगे. वडिलांकडून हट्ट करून, पैसे घेऊन तिने, नकली हिऱ्यांचे दागिने त्यावर चित्रे किंवा काचेवर चित्रे काढणे ही कला शिकण्यासाठी कोर्स सुरू केला होता. वडिलांनाही ती हया कोर्स मधून काय साध्य करणार हे कळत नव्हते. नेटवर तिच्या कोर्स संदर्भात नवीन नवीन माहिती गोळा करते असे सांगितले. कालांतराने हा कोर्स मध्येच थांबवून तिने ॲमवेची एजेंसी घेतली. सेमिनारला जाऊ लागली.

गणपतरावाना परदेशी लेखकांची पुस्तके वाचणे, चर्चा करणे, आपल्या मुलींविषयी फार कौतुक, अभिमान. ते शेजारी, ओळखीच्या लोकांशी बोलताना ठसवायचे. आपल्या मुली म्हणजे सर्वांपेक्षा वेगळ्या हुशार आहेतच पण त्यांच्या शब्दाबाहेर नाहीत हेच बिंबवायचे. त्यांना लोकांना उपदेश करणे,तुम्ही काय वाचता हे जाणून घेणे आवडायचे.रिंकू ही दिसायला सुंदर, लाडात बोलणारी, आता तर

नेटवर बसायला, हिरेबाजारात असल्यामुळे, अॅमवेची एजेंसी ट्रेनिंग घेतल्यापासून बोलण्याची पद्धत हायफाय लोकांसारखी झाली. बोलताना डोलत बोलणे, डोळे फिरवून बोलणे, खांदे उडवणे ही सवय नकळत लागली. गणपतरावाना फार मोठे कौतुक वाटू लागले. मोठीचे लग्न झाल्यापासून रिंकू बाहेर जास्त राहू लागली. कमलताईनी आता वय वाढीस लागल्यामुळे नोकरी होत नाही,स्वेच्छा निवृतीचा अर्ज मंजूर करून घेतला होता.

"बाबा आज मी या एजेंसी टिम लीडर बरोबर मार्केटिंग ट्रेनिंग करिता फील्डवर गेले होते. काय प्रोडक्टस आहेत वॉवss प्रत्येक प्रोडक्ट लोकांना सांगताना यू नो बाबा एक वेगळे थ्रिल जाणवत होते! "हे वाक्य बोलून तिने एक रिंगण घेत गिरकी मारली. गणपतराव फार प्रभावित झालेत.

"आणि की नाही हे नेटवर्किंग आहे जसे तुमचे गिह्राइक वाढतील तसे तुमचे इंसेंटीव वाढत जातो."रिंकू

"अग तुला फार हिंडावे लागेल नाही? "बाबा उत्सुकतेने

"कशाला मी नेटवर बसून करेन. ओळखीच्या लोकांशी मेलवर ही बोलू शकते. थोडे लोकांनाही भेटावे लागेल नाही असे नाही. बट आय विल डू इट "रिंकू

"घरी कम्प्युटर आणू या का? नेट ही घेऊ "बाबा

"काही नको. मी वेळ काढून सायबर मध्ये बसेन. बाकी काय लोकांना भेटल्याशिवाय होणार नाही."रिंकूनी कुठल्याही परिस्थितीत घरी कम्प्युटर नेट

घेण्याचा प्रस्ताव नाकारला. घरी अनेक बंधन आली असती.बंधनात राहणे हा तिचा स्वभाव नव्हता. घरी असली की सारखी मोबाइल व्हाट्स अपवर काही तरी चॅटिंग करत राहायची. ती नेटवर बसून चॅटिंग करता करता पैसे भरून विवाहाच्या साइट्स बघू लागली होती. त्यातूनही चॅटिंग करीत होती. घरी हे माहीत नव्हते.

गणपतराव आता मुलीला मदत व्हावी म्हणून शेजारी, ओळखीच्या लोकांशी बोलू लागले. तिच्याकडून सेमिनार कुठे होतात ह्याची माहिती घेत असत. त्याकरिता तेही अनेक पुस्तके, पेपर सर्व माध्यमातून हयाविषयी माहिती गोळा करू लागले. आधीच त्यांना जे अमेरिका इंग्लंड युरोप मध्ये घडते त्याविषयी अप्रूप,आकर्षण होते. कुठले ही पुस्तक वाचले की ते लोकांना अशा तऱ्हेने सांगत की त्यांनीच प्रथम वाचले आहे, इतरांना माहिती नाही. ॲमवे विषयी पेपर मध्ये माहिती आली. शेजारीच अशोक रहात होता. त्याच्याजवळ घरी गेलेत.

“अशोक येऊ का? “

“या ना. बसा.”अशोक

“अरे तुला ॲमवेच्या प्रोडक्टस विषयी माहिती आहे का? काय सुंदर hygienic असतात. तसेच guaranteed माल.”हे सांगताना ते असे काही चेहरा, बोटाने दाखवत की त्यांनी अनुभवले आहे. ते पेपर अशोकला दाखवू लागले.”अरे हयाविषयी अधिक माहितीसाठी ठाण्याला सेमिनार आहे. तू जा बघ. आमची रिंकू आहे तिथे. चहापाणी नाश्ता सर्व फुकट”

अशोकला हे माहीत होते की ते आता मुलीच्या प्रॉडक्ट विक्रीसाठी माहिती सांगत आहेत. त्याला ही एका मित्राने आधी नेले होते तेव्हा त्याच्या खिशाला 50 रुपयाची चाट बसली होती. माहिती प्रेझेंटेशन आकर्षक असते. त्यांच्यातील लोक त्यांची विक्री फुगवून कसा फायदा झाला हे सांगतात. तुम्हाला एजेंसीच्या जाळयात ओढतात.

“काही नाही हो हे सर्व भपंक, पैसे काढण्याचा धंदा आहे. त्यांचे प्रोडक्टस ही खूप महागडे असतात. काही नाही तुमच्या खिशाला चाट लावून सेमिनारचे पैसे तिकडे वसूल करतात.”अशोक

“काही तरी काय? तुला काही माहिती आहे का? उगीच काहीतरी बोलू नको.”चेहरा सांगताना बघत राहावा असे वाटे. गणपतराव त्यांच्या माहितीला आव्हान दिले म्हणून चिडले.”मी सर्व गोष्टीची शहानिशा केली आहे. आपल्यापेक्षा स्वस्त आहेत त्यांचे प्रोडक्टस” गणपतरावानी कधी सामान आणले असेल तर शप्पथ. तेही घासागीस करून.

“अहो मी येथे जाऊन आलो आहे हे सर्व बघितले आहे “अशोकने सांगताच गप्प झालेत. नेहमी प्रमाणे “ओ आयसी. बेस्ट ऑफ लक “म्हणून उठून जाऊ लागले. शेवट त्यांच्या मनासारखं होत नाही, हे कळले की ते हे वाक्य बोलून जात असत. बेस्ट ऑफ लक मात्र ते कुठल्या अर्थाने म्हणत हे कळत नसे.

कमलताई आणि गणपतराव रिंकुच्या लग्नाविषयी वर संशोधन करू लागलेत. लोकांना मुलीसाठी स्थळ सुचवा असे म्हणू लागलेत. अशोकला ही त्याने सांगितले.

“बघा हो रिंकुने तिचा वर शोधून ठेवला असेल. तिची अपेक्षा काय आहे हे जाणले का?”अशोकने मिश्किलीने हे बोलताच ते उसळत म्हणालेत “म्हणजे काय? माझी मुलगी तशी नाही ती आमच्या संस्कारात वाढलेली आहे. तसे काही नसेल ”

“अपेक्षा काय? पत्रिका बघायची आहे का? “अशोकने सहज विचारायचे म्हणून विचारले.

“काही नाही. इंजिनियर असावा. जास्त मोठे कुटुंब नसावे. पत्रिका आम्हाला काही बघायची नाही. त्यांना बघायची असेल तर आमची हरकत नाही. “गणपतराव

कमलताईंचे आजारपण वाढत चालले. कॅन्सर निदान झाले होते त्यामुळे केमोथेरपीसाठी सारखी हॉस्पिटल मध्ये धावपळ चालू होती.

“रिंकू, आईचे असे आजारपण.तुझे लग्न तिच्यासमोर झाले म्हणजे बरे. दोन स्थळे आली आहेत.”त्यांनी तिला फोटो आणि माहिती दाखविली. तुझे काय मत आहे सांग? “गणपतराव तिच्याकडे बघू लागले. “मी ही आता थकत चाललेलो आहे.”

रिंकूने फोटो आणि माहिती पाहिली. चेहरा वेडावाकडा करीत नकार दर्शविला.

“अग! तुझी अपेक्षा काय? ते तरी सांग म्हणजे तसे बघता येईल. तुझे काही आहे का? ते तरी कळू दे. “बाबा. कमलताई सर्व ऐकत होत्या.

“बाबा मी की ना नेटवर सर्च करत होते त्यातून एक मुलगा पसंत केला आहे. तो चांगला आहे. तो अमेरिकेत असतो. चांगला सॉफ्टवेयर तज्ञ आहे. त्यांचे वडीलोपार्जित घर नातेवाईक इंदूरला असतात.”

“तू कधी पासून हे पाहायला लागलीस? म्हणून तू घरी नेट नको म्हणत होतीस ना? “बाबा

“तसे नाही. यू नो आय नो माय चॉइस बेटर “नेहमी सारखे हात खांदे उंचावून तोंडाने इंग्रजी स्टाईलने जीभ ओठावर फिरवत बोलत होती.

“त्याने तुला पसंत केले आहे का? वडील आई काय करतात? आपल्या जातीचा तरी आहे का?”कमलताई नाईलाजास्तव ताकद नसताना आणि गणपतराव थोडे तणावाखाली आलेले पाहून म्हणाल्या.

“हो! म्हणजे काय? म्हणून तर चॅटिंग करत माहिती काढली. तो साऊथ अमेरिकेत सॉफ्टवेयर तज्ञ आहे. आईवडील भाऊ उत्तर अमेरिकेत असतात. वडील रीटेलचा बिझनेस बघतात आणि आई आय टी कंपनीत कामाला आहे. गेले 35 वर्षे तेथे राहत आहेत. दोघांनी एकमेकांना पसंती कळवली आहे. आय ॲम चॅटिंग टु अंडरस्टॅंड स्वभाव इ समजण्याचा प्रयत्न करते आहे.”

“मुलाचा फोटो, माहिती देशील का? आम्हाला बघू दे. कुठल्या जातीचा आहे? “गणपतराव चिंतेच्या स्वरात.

“मराठा “!

“काय? तुला काहीच वाटले नाही आपल्या चालीरिती रिवाज किंवा संस्कार “? गणपतराव कपाळावर हात मारून कमलताईंकडे बघत खाली बसले.

“बाबा यू नो आपण कुठल्या जमान्यात आहोत? इट डझ नोट मॅटर मी? मी बाहेर सगळे खाते मैत्रिणी बरोबर. त्यामुळे मला काही वाटत नाही”

“म्हणजे काय? आम्ही कोणीच नाही? तुला गरज वाटली नाही आमची.? ”

“मी कुठे म्हणते तस? तुम्हाला सांगणारच होते सगळं. अहो! मला लग्न करायचे आहे.”

“अग ते खराय! पण तो अमेरिकेत जन्माला आहे. तिथल्या चालीरीती, संस्कार वेगळे आहेत. लग्न कुठे, कसे करायचे हे कसे ठरवायचे? तुला माहीत आहे का तेथे पुढे काही झाले तर कोण, कसे निस्तरणार? मालतीला हे माहीत आहे? “बाबा चिंतेच्या स्वरात

“नाही तिला अजून सांगितले.”

गणपतराव आणि कमलताई काळजीत पडल्या. माहिती कशी काढावी हे कळेना. रिंकुचा बोलण्याचा टोन असा का बदलला हे आता उमगले. दोघांना मुलगी आपल्याला न सांगता असे करेल याचा धक्का बसला. लोकांना काय सांगायचे? गणपतरावानी नातेवाईकांना हे कळवले. त्यांच्या मार्फत कोणी ओळखीचे आहे का ह्याची विचारपूस केली.सुदैवाने नात्यातील लोकाकडुन, मित्रांकडून माहिती मिळवली. मुलगा चांगला आहे पण फार पुढारलेल्या मताचा आहे. घरातील माणसे

ही दूर वेगळी रहातात. तो दक्षिण अमेरिकेच्या टोकाला एका खेड्यात राहतो, तो भाग संरक्षक विभागात येतो. तो संगणक तज्ञ आहे तेथे. ही माहिती मिळाली. बरे नसतानाही गणपतराव आणि कमलताई इंदूरला जाऊन आल्यात. सर्व माणसांची ती भारतात आल्यामुळे भेट झाली. घर आधुनिक वाटत होते. कुटुंब कसे असेल याचा अंदाज येत नव्हता.वेळ थोडा असल्यामुळे लग्न साधेपणाने उरकून घेतले. सोपस्कार म्हणून जावई, सर्व माणसे गणपतरावांच्या घरी आली तरी सर्व हॉटेल मध्ये उतरली होती. तेथूनच मुलीसह अमेरिकेला गेली.

कमलताईंचे दुखणे जास्त झाले. अचानक देवाज्ञा झाली. जवळ मोठी मुलगी होती. रिंकुला हे कळविले. दोघेही भारतात वडिलांना भेटायला आलीत. शेजाऱ्यांनी सर्व गोष्टीत फार मदत केली.

"काही लागले तर मालती, बाबा, सांगा आम्ही आहोत" शेजारच्या इमारतीत राहणाऱ्या रोहिणी म्हणल्यात. तितक्यात रिंकू बाहेर येऊन म्हणाली."रोहिणीकाकू तुम्ही, अशोक, अविनाश सगळ्यांनी अनेक तऱ्हेने मदत केली. थॅंक्स ह सर्वांना. अरे हो किती पैसे झालेत तेव्हढे सांगा. देऊन टाकू"

सगळे शेजारी अवाक झालेत. त्यांना हे असे होईल अशी कल्पना नव्हती. रिंकू आणि तिची बहीण एव्हढी बदलली? हे शिक्षण, पैसा म्हणावे का संस्कार? रोहिणी तर रागाने लालेलाल झाल्यात. अशोकने सर्वांना बाजूला घेऊन समजूत घातली आणि शांत केले.

"ही काय बोलायची पद्धत, वेळ आहे? आपण सर्व मुंबईकर दूर अंबरनाथला आलो. जुने चाळीतले नातेसंबंध वाढावेत म्हणून एकत्र जमू लागलो. हे असे बोलायचे?"रोहिणी. सर्व गपचूप निघून गेलीत.

गणपतराव सर्व झाल्यावर मोठ्या मुलीकडे राहण्यास गेले. रिंकू आणि जावई अमेरिकेला गेलीत. ते रिंकुच्या प्रकरणाने खचल्यासारखे झालेत.सहा महिन्याने पुन्हा रिंकू भारतात आली दोन महीने राहिली. जावई बरोबर येत, सोडून जात. जावई नेहमी हॉटेल मध्ये उतरत. रिंकू घरी राही. जेव्हा गणपतराव अंबरनाथला येत तेव्हा स्वैपाकाला बाई असे. सर्व तीच करीत असे. ते लोकांना सांगत जावई यांना लहान घरात राहण्यास आवडत नाही, तेथे म्हणजे मोठी घरे असतात,स्वच्छता चांगली असते. रिंकू आणि ते फिरायला दूर जात. त्यामुळे गणपतराव यांना मुलीचे कसे चालले आहे हे कळेच ना. फक्त त्यांचे घर फार खेड्यात आहे, कुणीच भारतीय बाजूला नाही. मोठ्या घरात दोघेच असतात. शेजारी सर्व अमेरिकन, कुणी कुणाशी बोलत नाही, जात नाही. रिंकुने डायमंड धंदा तेथे सुरू केला असे म्हणाली. वर्ष होऊन गेले. रिंकुला मुलगी झाली. सासुबाईंनी तिकडे सर्व केले. आपापला व्यवसाय असल्यामुळे सर्व झाल्यावर दोघे पुन्हा आपल्या घरी गेलेत. नात झाल्याचे कळले त्यामुळे गणपतरावांना आनंद झाला. त्यांनी शेजारी मिठाई वाटली. रिंकूने वडिलांना बोलावून घेतले. गणपतराव मुलीकडे राहिले. नातीला सांभाळताना वेळ जात होता. सुट्टीच्या दिवशी जावई गाडीतून फिरायला घेऊन जाई. त्यामुळे गणपतरावानी आसपासचा परिसर बराच बघून घेतला. घरी जावई आणि मुलगी फार कमी बोलत, शेजारी कुणी बोलायला येत नसे, हे मात्र त्यांनी ताडले. तेथे कुणी कुणाशी

कामाशिवाय बोलेच ना. जेवण सुद्धा पॅक करून आणलेले, फ्रीज मध्ये ठेवलेले, गरम करून खाणे ही पद्धत. रिंकुलाही स्वैपाक येत नव्हता. शेजारी कुणी भारतातल्यासारखे येत नसे. दिवसभर बोलायला कुणी नाही, पुस्तके वाचायला नाही त्यांनाही कंटाळा आला. त्यांना भारतात परतण्याचे वेध लागलेत. रिंकूने लग्नाआधी हे विचारले होते की नाही हे माहीत नव्हते. रिंकू बरोबर पुन्हा ते भारतात आलेत. नात ही आली होती. येथे आल्यावर तिने पुन्हा डायमंड ज्वेलरीचा कोर्स सुरू केला. अंबरनाथला घरी मात्र सर्व आधुनिक पद्धतीची व्यवस्था केली, घर पुर्णपणे चकाचक केले. लोक ही डॉलरने किमया केली असे गणपतरावांना मजेने म्हणू लागले. गणपतराव ही “अहो कसले काय? तिला आता आधुनिक स्वच्छतेची सवय झाली, येथे जमत नाही. म्हणून केले. ती गेल्यावर मी काय बघणार एकटा” काही तरी बोलायचे म्हणून बोलायचे. रिंकूने त्यांच्यासाठी गाडी घेतली.गाडीतून सर्वांना फिरायला घेऊन गेली. तिने गाडी का घेतली हे मात्र गणपतरावांना कळले नाही.

“हे काय रिंकू! काय तू हे खर्च करीत आहेस. तू पुन्हा गेल्यावर कोण गाडी चालवणार? “

“पुढचे पुढे बघू. तुम्हाला हे सुख घ्यावेसे वाटले म्हणून “ह्या बोलण्यावर ती सर्व टाळे. त्यांना ह्या सर्व गोष्टीची गरज एकट्याला वाटत नव्हती. तिला काही बोलायची सोय नव्हती.”दिवस सरकत होते. नात मोठी झाली. शाळेत जाऊ लागली. रिंकू पुन्हा भारतात आली. पूर्वी तिने अंबरनाथच्या नर्सरीत घातले होते. आता मात्र तिने मुंबईत भाड्याने जागा हायफाय वस्तीत मोठी घेतली. मुलीलाही तिने शाळा

बदलून तिथेच जवळच घातले. मुलीला शाळेत नेण्याआणण्यासाठी बाई ठेवली. गणपतरावानी न राहवून विचारलेच,"रिंकू हे काय चालले आहे? तू सारखी भारतात येतेस, वर्ष वर्ष रहातेस? तिकडे तो एकटा आहे? लोक इथे मला विचारत आहेत."

"नाही तरी तिथे एकटेच वाटते. तो असला तरी नसला तरी" रिंकू

"म्हणजे काय? कळले नाही? तो काही दिवसांनी येथे येतो. तुम्ही फिरायला परदेशात जातात. पुन्हा तू त्याच्याबरोबर जातेस काय, तीन महिन्यांनी येतेस काय? समजायचे काय? "

"काही नाही हो. चिंता करू नका" तिने विषय टाळला.

"मुलीच्या शाळेचे काय? धड ना येथे धड तिथे" गणपतराव

"ऑन लाइन ती शिकू शकते"

"शिकल्यासारखे वाटते का? तुझे चुकत आहे असे वाटत नाही? तो पुढारलेला आहे, तिथे त्याने काय दुसरे केले म्हणजे? तू मालतीशी कधी बोलली आहेस का?

"तिच्याशी काय बोलायचे? ती काय करणार. नुसते बोलून प्रश्न सुटणारा नाही "रिंकू

"अग मला बाप म्हणून काळजी वाटते. माझे वय काय आता. माझ्या वयात गेले म्हणजे कळेल. पुन्हा अशी सोयरीक जमवून निर्णय तूच घेतलास"

रिंकू मात्र विचारात पडली. काय सांगू ह्यांना. खरे सांगू तर त्यांना धक्का बसेल. तो अमेरिकन बाई मुले यांच्यात राहतो, काम करतो. त्याची आधुनिक जगाची माणूस म्हणून टेस्ट वेगळी आहे. नाही सांगितले तर मी नेहमी येणार तेव्हा छळतील.

"कसला विचार करतेस? काय झालं?"गणपतराव "सारखी तू व्हाट्स अपवर बोलतेस. कोणाशी बोलतेस ह्यावेळी? त्याच्याशी तर नक्कीच नाही. तिकडे रात्र आहे तो झोपला असेल."

"काय सांगू? मैत्रिणीशी बोलते. माझेच दात माझेच ओठ. मलाच निस्तरायचे आहे. इलाज नाही. म्हणून तर येथे कोर्स करून मन गुंतवून ठेवते."

"म्हणजे काय? तू कोड्यात बोलू नकोस. तुला हवे नको ते त्याच्याकडून मिळते का?"

बाबांचे बोलणे ऐकून रिंकुचा बांध फुटला. खरे ते सांगून टाकू हा निश्चय केला. आल्या प्रसंगाला तर सामोरे गेले पाहिजे.

"बाबा सर्व सुख आहे. तो पैसे हवे तेव्हढे देतो. आला की आम्ही बाहेर ट्रीपला जातो. मुलीवर त्याचे प्रेम आहे. तिला तो सर्व देतो. "

"मग आणखी काय? "

"पण काय करणार? हे म्हणजे सर्व सुख का? तिकडे तो सारखा कामावर असतो, उशिरा येतो. तो शास्त्रज्ञ, त्याच्या विश्वात असतो. उघड बोलत नाही. शेजारी कुणी बोलायला नाही. कुणी कुणाकडे जात नाही. ना भारतीय लोक त्या गावात. मी

काय करू एकटी घरात? त्याचा जीवनातला आनंद वेगळा आहे, खरी ओळख वेगळी आहे. साथीदाराची टेस्ट जगावेगळी आहे. आमची फक्त चालती बोलती शरीरे एकत्र आहेत. बस! इथे भारतात तो आला तरी काही बदल होत नाही. आहे तसे चालायचे दुसरे काय?"

"म्हणजे? "

"पेटलेल्या यज्ञकुंडात फक्त फुंकर घालायची" रिंकू

गणपतराव ऐकून स्तब्ध झालेत. डोळयासमोर मायावी जग आपले खेळ कसे दाखवते त्यापेक्षा आपले भारतात बरे ओलावा नात्यात तरी आहे. कालाय तस्मै नम:

*******************************************

गृहशोभा जुलै २०१७

# आव्हान

राधिकेचा कामावर जाण्याच्या आधी रिंकू आणि मनोज यांच्याशी स्काईपवर बोलायचे हा अलिखित रोजचा ठरलेला कार्यक्रम होता. ती न्यूझीलंड मध्ये असल्यामुळे बोलण्याची वेळ ठरवावी लागत होती. न्यूझीलंड आणि भारत यांच्यामध्ये 4 ते 4.5 तासाचे अंतर होते तेथील वेळ ही भारताच्या वेळेपेक्षा पुढे होती. रिंकू तशी आता 3.5 वर्षे वयाची त्यामुळे तिच्या झोपेचे तंत्र सांभाळावे लागे. मनोज कामावरून आल्यावर हे बोलणे होई कारण तोच स्काइप ऑन करून बोलणे सुरू करी तर कधी त्याला उशीर झाला तर तिची नणंद ऑन करीत असे. तिला तेथून मध्यरात्रीच फोन करावयास जमत असे कारण भारतात त्यावेळी रात्री 8-9 वेळ होते.तो पर्यन्त मनोज कामावरून घरी आलेला असायचा.राधिकेच्या मनाची घालमेल ही घरच्या लोकांना काय कळणार? ओली हळद आणि मातृत्व याची पहाट स्वप्न घेऊन जागली होती. त्यातच राधिकेची बदली न्यूझीलंडमध्ये झाली. तिला नवीन घरातील माणसांना समजून घ्यायला वेळ सुद्धा मिळाला नाही.राधिका आणि मनोज ह्यांचा प्रेमविवाह झाला होता. राधिका मराठी तर मनोज मारवाडी. दोघे ही एकाच बहुराष्ट्रिय आय टी कंपनीत 2 वर्षे नोकरीला. मनोज दिसायला चांगला.

त्याला मराठी अस्खलित बोलता यायचे. राधिका सॉफ्टवेअर व्यतिरिक्त जर्मन आणि चायनीज भाषा शिकली होती. मनोज बोलण्यात,त्याच्या क्षेत्रात आणि इम्प्रेशन पाडण्यात निपुण होता. या गोष्टीवर राधिका भाळली होती. त्यानेही ही राधिका इतरांपेक्षा वेगळी चुनचुणीत,घरची सुस्थिर असल्यामुळे तिच्याशी मैत्री वाढविली होती. मनोजने त्याच्या घरच्यांविषयी परंपरावादी एकत्र, कपडा हिरे व्यापार करणारे कुटुंब. घरात 3 भाऊ आणि दोन बहिणी अशी ओझरती कल्पना दिली होती.काका हे सर्व शेजारीच रहात. त्यांचेच वाडीवजा घर घाटकोपर येथे होते. मनोजला काही दिवसांनंतर वेगळे रहायचे आहे असे त्याने राधिकेला सांगितले होते. त्याकरिता मेहंनत करून स्वत:च्या पायावर पैसे उभे करायचे होते. राधिकेला मनोजविषयी ऑफिसच्च्या व्यतिरिक्त काहीही माहिती नव्हती.प्रेमामुळे तिने त्यासंदर्भात कुणाकडे चौकशीही केली नाही. ती सामान्य कुटुंबातील व इतर समाजातील होती.वेष आणि शुद्ध बोलीमुळे तिचे सर्व झाकले जात होते. वडील कंपनी बंद झाल्यामुळे हॉटेलमध्ये अकाउंट्सचे काम करीत होते. तिच्या घरच्यांना हे लग्न मान्य नव्हते. त्याच्या घरातील लोकांना ही मान्य नव्हते म्हणून ह्या दोघांनी मित्रांच्या सहाय्याने रजिस्टर लग्न केले होते. लग्नानंतर एकत्र कुटुंबात जेमतेम वर्ष कसे तरी काढले. घरामध्ये भाषा, परंपरा अडचण होतीच. हिन्दी भाषेतून घरात संभाषण चाले.बाळंतपणासाठी आईकडे विरोध मावळल्यानंतर आली. रिंकू दिड वर्षाची ही नसेल तेव्हा हिची बदली झाली. राधिकेने घड्याळाकडे पाहिले, वेळ झाली होती. तिने स्काईप सुरू केला. पलीकडे रिंकू आणि मनोज होता.

"हाय रिंकू! बेटा कशी आहेस? "रिंकुचे वय बघता तिला काय कळणार. पण सुरुवात काही तरी करायची म्हणून सुरू केली."जेवली का तू सोन्या? काय जेवलीस? "

रिंकुने रडत रडत "दू दू भात. आई तू कधी येणार? "

राधिकेला गहिवरल्यासारखे झाले. तिने आवंढा गिळून, डोळ्यात टचकन आलेले अश्रु पुसत "लवकरच येईन बेटा. मग मज्जा करू."रिंकूला आजीने हाक मारली असे मनोज म्हणाला म्हणून बहिणीच्या हाती रिंकुला देऊन बाजूला केले. लहान मुलांशी बोलावे वाटले तरी काय बोलावे हा प्रश्न पडतो. मनोजने राधिकेचे डोळ्यातील अश्रु पाहिले. ती मनोजशी बोलू लागली,

"अरे बघ माझे आणि मुलीचे काय हाल होत असतील? तू पाहिलेस ना आता?"

"अग हो मला कळत नाही का? पण मी काय करू? मजबूरी आहे."आपल्या दोघांची नोकरीच तशी आहे. दोघेही सॉफ्टवेअर क्षेत्रात असल्यामुळे कंपनी पाठवेल तिथे जायला हवे."

"आपले काय ठरले होते? मला परदेशी नोकरी करायची नाही? मी नोकरी सोडणार होते. तूही त्याला राजी झाला होतास. घरचे सर्व सुस्थिर आहे. मग असे का?"

“खरे आहे तू म्हणतेस ते. पण आपले लग्न होऊन मुलगी लहान असताना तुला जावे लागेल असे वाटले नव्हते. आपण एकत्र आहोत म्हणून तुला तसे वाटते. तसे नाही आहे. परिस्थिती अवघड आहे फार कर्ज आहे. आपली नोकरी चांगली आहे म्हणून... ”

“अरे काय उपयोग आहे त्या पैशाचा? आपण दोघे एकमेकांसाठी वेळ देऊन एकत्र राहू शकत नसू तर ह्या जीवनाचा काय उपयोग.? मला इथे येऊन दोन वर्ष होत आली. तुझ्या घराची, रीतीरिवाजाची माहिती नाही.”

इतक्यात घरातून त्याच्या आईने ओरडून सांगितले,”अरे मनोज! ऑफिस कोनी जाओ के. केटला टाइम होयो देख” मनोजने नेहमी प्रमाणे कामावर जायची घाई आहे हे कारण सांगून फोन बंद केला. अनेकवेळा तो बोलताना तुटक बोलत असे. त्यामुळे राधिकेला त्याचा अर्थ कळत नसे. राधिका स्वत:ची समजूत काढत रिंकुचा फोटो पहात झोपी जाई. ती होस्टेलमध्ये एकटीच राही. दिवसभर कामात असल्यामुळे वेळ निघून जाई परंतु रूमवर आल्यानंतर एकटेपणा जाणवायला लागे. सुट्टीच्या दिवशी ती ऑफिस मधील मित्र मैत्रिणीबरोबर फिरायला जात असे. राधिकेने बहुतेक न्यूझीलंडचा भाग शनिवार/रविवार साधून पाहून घेतला. एकदा असेच होम सिकनेसने डिप्रेशन आले तेव्हा वेळ जावा म्हणून ऑफिस मधील अतुलने साथ दिली. शेजारच्या अपार्टमेंटमध्ये राहत होता.अविवाहित आईला घेऊन राहत होता. वडील नव्हते. परदेशात गेल्यावर नाती म्हणजे काय असतात ह्याची जाणीव झाली. त्याच्याच मदतीने ओळखीने तेथील लोकांना जर्मन किंवा चायनीज भाषा शिकवता

येतील काय हे शाळा कॉलेज मध्ये जाऊन अंदाज घेऊ लागली. मनोज आणि राधिका एकाच ऑफिस मध्ये असले तरी दोघांना मेसेंजरवर जास्त वेळ बोलता येत नसे. त्याचप्रमाणे वेळेचे ही बंधन असे. बोलताना त्याच्यात ओढ जाणवत नसे.मनोजच्या बहिणीचे लग्न ठरले. तिने ही संधी साधून आठवड्याची सुट्टी घेऊन भारतात आली. तिचा पेहराव हा आधुनिक असल्यामुळे घरातील लोकांनी नाके मुरडली.घरात कुणीही जीन घालत नसे. जास्तीतजास्त पंजाबी ड्रेस अविवाहित मुली घालत असत. पण सुनेने किंवा इतर मोठ्या महिलाना साडी परिधान करावी लागे. मोठ्यांसमोर घुंगट ठेवावे लागे. हे सर्व राधिकेच्या अंगवळणी पडण्यास कठीण जात होते. थोडेच दिवस भारतात आल्यामुळे राधिकेने त्याकडे दुर्लक्ष केले. ती रिंकू आणि मनोजसाठी आपला वेळ खर्च करू लागली. मनोज कामावर जात होता. त्यामुळे तो गेल्यानंतर घरात ती लोकांना समजून घेत होती. घरातील कामासाठी पुढाकार घेत होती.परंतु तिला घरात काम करू देत नव्हते. सासू किंवा इतर लोकांसमोर बोलता येत नव्हते.अशावेळी ती शिकलेल्या नणदेबरोबर बाहेर रिंकुबरोबर बसून वेळ घालवत होती. संध्याकाळी मनोज घरी आला. त्यावेळी तिने त्याच्याबरोबर वेळ खर्च करावा या हेतूने बाहेर जाण्यासाठी सुचवले पण त्याने याकडे दुर्लक्ष केले. म्हणून रात्री बेडरूम मध्ये झोपताना विषय काढला,"अरे तू काहीच वेळ माझ्यासाठी देत नाहीस? हे काय? मी सुट्टी घेऊन लग्नासाठी जरी आले तरी मूळ हेतु तुला आणि रिंकुला वेळ द्यावा, समजून घ्यावे हा हेतु आहे. लग्न झाल्यास आपण काही महिनेच एकत्र राहिलो आहोत."

“काय करणार? आमच्या घरात ती परंपरा रीतिरिवाज नाही. लोकांना आवडत नाही. घरात मी कुणाला दुखवू शकत नाही.”मनोज

“म्हणजे काय? तू माझ्याशी लग्न केले आहेस? वेळ तरी केव्हा देणार? ते काही नाही तू मला समजून घेतले पाहिजे.”राधिका

“हो ग! थोडे दिवस जाऊ दे “

“म्हणजे किती? मी नोकरी सोडून भारतात येऊ का? मला ही तुझा सहवास हवा आहे. मला मन आहे किंवा नाही? मी तुझ्याशी लग्न केले आहे. दोन वर्षे आपण दूर आहोत “

“काय करू? आता लग्न घरात आहे नाहीतर आपण बाहेर गेलो असतो.”मनोज

“तू माझ्याशी बोलू शकत नाहीस घरात? तिथे असताना स्काईपवर ही तू बोलत नव्हतास. कामावर जायचे म्हणून बोलायचे टाळायचास. मी तुझ्यासाठी आणि रिंकूसाठी रात्री उशिरा जागून फोन करायची. का? आपण चांगले शिकलेले आहोत. आपण यांना मान देतो तसे त्यांनी ही बदल स्विकारायला नको का? “

“हा बदल लगेच होत नाही. त्यानाही वेळ द्यावा लागतो “मनोज

“मान्य आहे. आपल्या मुलीवर काय परिणाम होईल तिला समजायला लागल्यावर? मला ते घरात स्विकारतात का? मला समजून का घेत नाहीत? मला का नाही सुनेचा दर्जा देऊन रीतिरिवाज शिकवत? “

मनोज तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून झोपला. राधिकेला त्याचे वागणे गोंधळात टाकणारे होते. सकाळी ऑफिसला जाताना तिने सांगितले आज ती ऑफिसला येणार आहे. हे वाक्य न ऐकताच तो बाहेर पडला. राधिका ऑफिस मध्ये गेली. साहेबांशी बोलून तिला पुन्हा भारतात बदली होऊन मिळेल का हे अजमावायचे होते? तिला कौटुंबिक सुख हरवून बसत आहे असे वाटू लागले.

“हाय एव्हरीबडी! कसे आहात? “

“आज तू इथे कशी? केव्हा आलीस भारतात? काय विशेष? “मोनिका तिची मैत्रीण म्हणाली

“आम्ही तुला मिस करत आहोत.”लता

“अग माझ्या नणदेचे लग्न आहे म्हणून आठ दिवस सुटी घेऊन आले आहे. म्हटले भेटू सगळ्यांना आणि साहेबांना.”राधिका

“अग राधिका जरा आपण cafeteria जाऊ.मला तुला काही गोष्टी शेअर करायच्या आहेत. मी तुला कसे कळवू असा प्रश्न माझ्यापुढे होता. पत्र पाठवू शकत नाही ना फोनवर ऑफिस मधून बोलू शकत” लता

“काय आहे एव्हढे? “

“मन खंबीर कर. योग्य तो निर्णय घे. अग मनोज इथे त्याच्याच जातीच्या मुलीत गुंतत चाललेला आहे. दोघे फिरतात. ती आपल्याच हब मध्ये दुसऱ्या कंपनीत बॅक ऑफिस मध्ये काम करते. आपल्या इथे बऱ्याच लोकांनी पाहिले आहे. “लता

“हे कशावरून? काय पुरावा हे.”लताने त्या मुलीचा मनोजचा गळ्यात हात घातलेला ऑफिस सुटून एकत्र चाललेला फोटो काढलेला दाखविला आणि व्हाट्सअप वर शेअर केला.

इतक्यात ऑफिस मधील दुसरी मैत्रीण साहेबांनी बोलावले असा निरोप घेऊन आली म्हणून ती जायला निघाली. लताच्या बातमीने ती हादरली होती. आपण प्रेम केले हे चूक केली का? त्यांनीही लग्नाचा निर्णय घेतला तो कुठल्या आधारावर? घरी गेल्यावर त्याला ह्याचा जाब विचारायचाच हा निश्चय केला.

“Yes Radhika come in. How are you in Newziland?” सुब्रमणीना मराठी चांगले समजत होते पण नेहमी भेटीची सुरवात इंग्रजीनेच करतात. त्यांना अनेक भाषांची जाण आहे.

“I am all right.सर मला काही बोलायचे आहे. “राधिका

“मला माहीत आहे. तू अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहेस.”राधिकेला कळेना त्यांना काय म्हणायचे आहे. त्यांनाही मनोजची भानगड कळली की काय असे मनात आले.

“अग आता जग झपाट्याने बदलत जात आहे? या बदलाबरोबर आपल्याला ही बदलायला हवे आहे. आता नवीन नवीन आव्हान स्वीकारली पाहिजेत.”

“सर मला पुन्हा मुंबईत बदली मिळेल का? मी माझे सर्वस्व हरवून बसणार आहे असे वाटते. मला कुटुंबाबरोबर रहायचे आहे.”राधिका “जर असे झाले नाही तर मी ना घर का ना घाट का रहाणार आहे.”राधिका

“ह्या जमान्यात आपले अस्तित्व प्रथम तरच कुटुंब जगू शकेल”

“साहेब मला लग्न झाल्यास खरे कौटुंबिक सुख मिळाले नाही. शरीराने आम्ही काही काळ, नव्हे फक्त महिनेच एकत्र राहिलो. मुलगी झाली ती वर्षाचीच होते ना होते माझी बदली झाली. त्यातून माझे inter-cast लग्न.”

“नाही तुमच्या बद्दल सहानुभूती आहे. तुम्हाला माहीत आहे आज आय टी इंडस्ट्रीज फार धोकादायक परिस्थितीतून जात आहेत. इंग्लंड यूरोपियन संघातून बाहेर पडल्यामुळे आपल्या कंपनीवर फार विपरीत परिणाम झाला आहे. आपल्या कंपनीतील बऱ्याच लोकांना नोकरी सोडून जाण्यास सांगत आहोत आणि पुढेही काहींना जावे लागणार आहे.”

"सर मी कुठलीही कमी levelची नोकरी करण्यास तयार आहे पण मला इथे राहू द्या"

"तसे होऊ शकत नाही. आपल्याकडे हेड काऊंट ठरविताना बोर्ड level पर्यन्त जावे लागते. तुम्ही खाली का येत आहात? तुम्ही जर्मन आणि चायनीज शिकला आहात म्हणूच तुमचा विचार केला. You are doing Well. म्हणून अविचार सोडून द्या. आव्हानाला सामोरे जा, परिस्थितीवर मात करा. मी ही असाच आता विचार करू लागलो आहे. भावना कमी आणि वास्तव जगणे हाच मंत्र. "

राधिकेला कळून चुकले आपल्यापुढे काही पर्याय नाही. ती आई बाबांना भेटायला घरी गेली. तिने मनोजची सर्व हकीकत, घरातील परिस्थिती, कंपनीची परिस्थिती समजावून सांगितली. मनोजचे प्रताप कळल्यावर रिंकुला आईकडे ठेवण्याचा निर्णय घेतला. तिने रजा वाढवून घेतली. मनोज पासून वेगळे व्हायचा निर्णय घेतला. वकिलाशी चर्चा करून वडिलांना अधिकार पत्र देऊन परत न्यूझीलंडला जायचे असे ठरविले. ती सासरी आली. दारातच सासूने विचारले,"कहा गई थी? बच्ची रो रही है! घरका ख्याल भी रखना चाहीए!"सासूचे हे वाक्य ऐकताच बोलावे की न बोलावे विचार न करता, बोलून गेली."और मरदने कया करना चाहीये? "असे म्हणत तिने लताने दिलेला मनोजचा फोटो दाखविला, "मरदने क्या ये करना है?"सर्वच अवाक झालेत. मनोजचा चेहरा पडला.

"अग माझी चूक झाली. माझी नोकरी जाणार आहे हे सांगितले गेले.तू इथे नाहीस मानसिक आधार शोधत असता तिच्याकडे नकळत ओढलो गेलो."मनोज.

"मी तिकडे एकटीच होते. मी केले असते तर? असा विचार तुला पसंत आला असता? तुझे प्रकरण फार पुढे गेले आहे. मी नाही राहू शकत. आपण वेगळे होऊ या."तिने आपली बॅग भरून रिंकुला घेऊन आईकडे आली. जाताना मनोजला "तुला घटस्फोटाची नोटिस येईल. तू संमती दे. मला तुझ्याकडून काही नको."बोलून बाहेर पडली. घटस्फोटाचा निकाल तातडीने लावून घेतला. ती रिंकु आणि आईला घेऊन न्यूझीलंडला आली. कामावर रुजू झाली. कालांतराने लहान बहिणीचे लग्न झाले. आईला अतुलने केलेल्या मदतीविषयी सांगितले होते.आईवडील कधी भारतात तर कधी न्यूझीलंडला राहू लागले.तिने अतुला जवळचा मित्र म्हणून सारी हकीकत संध्याकाळी cafeteria मध्ये कोणी नसताना सांगितली. भावनेचा बांध फुटून तिच्या डोळयात अश्रु उभे राहिले. नकळत अतुलने राधिकेच्या खांद्यावर आश्वासक हात ठेवून जवळ घेतले. जवळ घेऊन तिच्या पाठीवर आणि डोक्यावर हात फिरवत,"काळजी करू नकोस. मी आहे.आपल्याला उभे रहायचे आहे.माझी साथ आहे."राधिकाही त्याच्या मिठीत मोकळी झाली.

*************

गृहशोभा, अहेर दिवाळी अंक २०१७

# उतराई

उन्ह वर चढत होते. घरामध्ये मांजर जशी कुणाच्याही पायाजवळ पहुडते तसे खिडकीतून उन्ह ओट्यावर पहुडले होते. काम करताना अंग भाजून निघे. घड्याळाचे काटे 12 वर सरकत होते. यशवंतरावानी सुटी घेतल्यामुळे घरी होते. अभय शाळेतून येणार होता. विजय पहिल्या डिप्लोमाच्या वर्षाला, तो ही कॉलेजला गेला होता. घरात पाळणाघरातील मुले खेळत होती. त्यांचाही भुकेसाठी किलकिलाट चालला होता. अनुराधेची धावपळ चाललेली होती. कुणाजवळ काही बोलता येत नव्हते. आपलेच ओठ आपलेच दात. मुलांना शिकवून मोठे करायचे तिचे एक स्वप्न होते.

"अरे हो रे बाळांनो! देते हं तुम्हाला! किलकिलाट करू नका "एका दोघांना डबा उघडून तिने तेव्हढ्यात भरवले. तव्यावरची चपाती परतवायला पळत आत गेली. अनुराधा वयाने 45 मध्यमवयीन, काळीसावळी, बांधेसुद, हसतमुख असलेली, बडबडी, हळवी, डोंगर दु:खाचा असला तरी चेहऱ्यावर कुणालाही कळणार नाही. स्वत:हून मैत्री, आपुलकीने माणसे जोडणारी, लोकांच्या मदतीला धावून जाणारी. यशवंतराव आणि तिच्यात 13 वर्षाचे अंतर होते. अनुराधेची घरची

परिस्थिती अत्यंत बिकट होती. यशवंतराव हे कामगार त्यातून युंनियनचे पुढारी होते. ती तशी आस्तिक, त्यामुळे किर्तन, प्रवर्चन आदि कार्यक्रमात आपला संध्याकाळचा वेळ कधीमधी देत असे. परिस्थिती नसली तरी आहे त्या वेशात चांगली वेणी फुले घालणे,आनंदीत राहणे हा तिचा स्वभाव.घरामध्ये मन मोकळे करण्यासाठी जागा नव्हती. वयाचे अंतर असल्यामुळे विचारामध्ये, समजून घेण्यात अडचण होती. पाळणाघर जरी असले तरी काही ओळखीच्या घरांची उन्हाळी किंवा सणवार दिनाची कामे ही घर बसल्या करून देत असे.तिचे लग्न तिच्या काकुने ठरविले होते. तीन बहिणी आणि 2 भाऊ आईवडील असे कुटुंब गावाकडे कराडला खेडेगावात रहात होते.भावंडांमध्ये तीच मोठी होती. तिच्या घरावर काका काकूंचे जास्त वर्चस्व होते कारण ते पैसे पाठवत होते. वडील फक्त थोडी एकत्रित कुटुंबाची शेती, दुकानात बसत होते. त्यामुळे ते म्हणतील ती पूर्व दिशा. काका पोलिस इंस्पेक्टर होते त्यांनाही 3 मुली व एक मुलगा होता. त्यांचे सुखवस्तू कुटुंब होते.अनुराधा मुंबईत त्यांच्याच घरी वाढली. घरात, काकुने घरकाम करण्यासाठी ठेवलेली मुलगी अशीच वागणूक होती. काकांची मुले चांगले कपडे वापरुन शानशौक करीत. हिला मात्र त्यांचे वापरलेले कपडे मिळत असत.

काकांनीच ओळखीने लग्न ठरविले. तिचा सर्व बाजूंनी विचार केलाच नाही. तिलाही परिस्थितीने,वडिल आणि इतर भावंडांकडे बघून, काहीच खर्च नाही म्हणून "हो" म्हणावे लागले.

यशवंतराव दिसायला गोरे, पिळदार शरीर कमावलेले,कामगार होते पण ते कामगार चळवळ, त्यांच्या समस्या हल करण्यात जास्त वेळ बाहेरच असत. त्यांच्या

मन मिळावू, प्रामाणिक,कामगार निष्ठेमुळे ते कामगार वर्गात प्रिय होते. मनाने ते दिलदार होते. परिस्थिती जरी चांगली नव्हती तरी ते लोकांना मदत करीत असत. त्यांनी आईवडील आणि भावंडांना आर्थिक मदत करून उभे केले. भावासाठी प्रेस शॉप टाकून त्याने नीट उद्योग करावा म्हणून पैसे ओतले. भावाने काहीच न करता शॉप नुकसानीत काढला. कर्जाचे पैसे मात्र यशवंतराव यांना फेडावे लागले. घरी कारखान्यातले सारखे कुणी ना कुणीतरी कामगार येत असत. त्यांना चहा करणे, पाणी देणे आलेच त्यामुळे घरामध्ये ही दोन खोल्यात क्वचित एकांत मिळे. मुलांचा अभ्यास ही त्याच खोलीत किंवा मुले कधी गच्चीत तर कधी बाहेर मित्राच्या घरी अभ्यास करीत बसत. मुलांची परीक्षा जवळ आली होती.

“आज तुम्ही सुटी काढली. तरी कामगारांना घरी का बोलवता.? मुलांना काही अभ्यासासाठी शांतता हवी की नको? सारखे आपले कंपनीत तेच घरात तेच ” . अनुराधा

“तुला मी आधीच सांगितले घर माझे आहे, कामगार येणार. ते काय मोठ्यांनी बोलत नाहीत.”यशवंतराव

“अहो पण मुलांची परीक्षा. घरात पाळणा घर, मुलांचा अभ्यास, माझा काही विचार करता की नाही. मला नीट निवांत मोकळेपणाने बसता, आडवे होता येत नाही.आले की चहा कर. पाणी दे. मला काही जीव आहे की नाही? “

"तुला कोणी नको म्हटले? हो आडवी एका बाजूला. ते काय सारखे थोडीच घरात राहणार किंवा पाहत बसणार? वाटल्यास मी चहा देईन मला सांगत जा "यशवंतराव

यशवंतराव यांच्या पुढे बोलण्याची सोय नव्हती. प्रथम पासून त्यांचा स्वभाव लोकांसाठी चांगला असला तरी घरातील लोकांसाठी विशेषत: बायकोसाठी तुसडा, विक्षिप्त, संशयी होता. बायकोसाठी त्यांनी गरजेपुरते सोडून बाकी काही केले नाही. लंकेची पार्वती बिचारी राहिली. लग्न झाल्यास एकांत नाही. सासरचे सुद्धा येऊन रहात. सर्वांच्या समोर घरात झोपावे लागे. पगार बँकेत जमा होत होता परंतु साधी तिची सही एकत्रित खाते काढून ठेवली नव्हती. पैशासाठी त्यांच्याकडे हात पसरावे लागत. यशवंतराव मुलांसाठी मात्र हळवे होते तरी जास्त बोलत नसत. काही हवे नको ते जेव्हा मुले मागतील तेव्हा पैसे असले तर देत, नाहीत तर काही न बोलता बायकोकडे नजरेने "घे" म्हणून सांगत. पगार जरी चांगला चौघांना पुरेसा असला तरी कर्ज, इतर देणी ह्यामुळे जेमतेम 1500 ते 2000 हातात येई. त्यात सर्व भागायचे नाही म्हणून अनुराधेला कष्ट करावे लागत. ती अदमासे 6-7 हजार रुपये मिळवत होती.

अभय विजय दोघेही तितक्यात उतरले ", आई भूक लागली, जेवण झाले का? "

"आई मी जेवून मित्राकडे अभ्यासाला जाणार आहे" विजय "लवकर काही तरी दे, प्रोजेक्ट बनवायचे आहे. अरे हो, टर्मची फी भरायची आहे. "

अभय ही म्हणाला “माझी ही दोन महिन्याची फी सरांनी मागितली आहे. सगळ्यांसमोर म्हणाले, “नेहमी काय तुला सांगावे लागते.?”

अनुराधा आधीच ग्यासजवळ गरमीने हैराण झाली होती. दोघांचे पैशासंबंधी मागणी ऐकताच भडकली,”अरे मी कुठले देऊ. माझ्याकडील सर्व पैसे संपले, सामान आणले, लाइट बिल भरले.”सर्व जंत्री मोठयाने यशवंतरावाना ऐकू जाईल असे म्हणाली.

यशवंतराव कंपनीतील कामगार गेल्यावर पेपर मध्ये डोके घालून बसले होते. ते पेपर मध्ये वाचता वाचता म्हणाले, “विजय माझ्याकडे आता नाही. मला कंपनीत गेल्यावर विचारावे लागेल.”

“अहो बाबा, दोन दिवसाची मुदत दिली आहे नाहीतर परीक्षेला बसू देणार नाहीत. “विजय

“आम्ही काय शाळेत गेलो नाही काय? काही तरी बोलायचे. असे असेल तर आईला सांग शेजारी काही सोय झाली तर, नंतर देऊन टाकू.”

“शेजारी कोण देणार? आधीच डॉक्टरांनी सांगितलेल्या तुमच्या चाचण्यासाठी पैसे उसने आणले होते. ते द्यायचे आहेत.”अनुराधा

यशवंतराव नुकतेच जीवघेण्या दुखण्यातून उठले होते. त्यांच्या किडनीचे दुखणे उद्भवले होते. अंगा पायावर सूज येत होती म्हणून दाखवले होते. हिमक्लोबिन कमी होते. नीट अंदाज येत नव्हता. यशवंतराव अजून निवृत होण्यास 1.5 वर्ष होते. आधी हार्टची एंजोप्लास्टी झाली होती. मुलांचे कसे होणार ह्याची चिंता होती. उभे आयुष्य

साऱ्याकरीता जाळले. स्वत: कफल्लक राहिले.हे मनात कुठेतरी बोचत होते. कोण कुठला सुरेश त्यालाही स्वत: आजारी असताना मदतीचा हात पुढे केला.

सुरेश तसा अनुराधेचा कुणीच नाही पण आत्याकडे ठाण्याला जाणे येणे होते म्हणून ओळख. अनुराधाही सुरेशच्या आईवडिलांच्या घरी यायची म्हणून ओळख. सुरेश पूर्वी डोंबिविली पूर्व येथे घर भाड्याने घेऊन राहत होता. तेही घर भावाचे लग्न झाले म्हणून घेऊन ठेवले. ते घर म्हणण्यासारखे नव्हते. पैसे नव्हते म्हणून आहे त्या बजेट मध्ये घेतलेले घर.घरामध्ये सर्व ऋतु सुखाने अनुभवता येत होते. घरातून समोरच्या घरातील दिसत होते. शनिवारी रविवारी सुट्टी असली की दोघेही नवरा बायको येऊन रहात. तेव्हा तो यशवंतरावांच्या घरी येऊन जाई. तसे त्याचे ही जवळचे नातेवाईक डोंबिविलीत खूप होते ते मात्र नावापुरते. पूर्वीच्या घरच्या हलाख्याच्या परिस्थितीत सर्वांनी टोचून टोचून घायाळ केलेले म्हणून सुरेशला कुणाच्या घरी जावेसे वाटत नसे. तरी कधी मधी भेट झाली तर जाई. त्याचे वडील ही भावंडा मध्ये मोठे ते ही सर्वांचे केल्यामुळे कर्जात बुडाले, मिल संपानंतर घरीच बसले. सुरेशने सर्व घर सावरून धरले होते म्हणून अब्रू उंबरठ्यात राहिली. सुरेशचे आयुष्य मात्र करता करता करपत चालले. नोकरीला तो मुंबईला असल्यामुळे चेंबुरहून जाणे सोपे होते तसेच बायकोला ही मुंबईला कॉलेजला जाण्यास जवळ पडे.

सुरेश राहत असलेली इमारत पावसाळ्यात कोसळून पडली. त्याचे घर मात्र एकाबाजुने लोंबकळत होते. सामान शाबूत होते. शेजारी इतरांचे बरेच नुकसान झाले. सुरेशपुढे दुसरी पर्यायी व्यवस्था करणे, ती होईस्तोपर्यंत सामान कुठे ठेवायचे हा प्रश्नच होता. सुरेशची बायको बाळंतपणासाठी माहेरी होती. त्यातून आता डोंबिविलीस

येऊन राहवेच लागणार होते. मुंबईच्या घरात अडचण होतीच. त्यांनी जवळच असलेल्या सर्व नातेवाईकांच्या घरात सामान ठेवण्यासाठी सोय होईल का म्हणून विचारणा केली. कोणी ही मदतीचा हात पुढे केला नाही. यशवंतरावाच्या घरी कुठे ओळखीने घर भाड्याने मिळेल का हे पाहाण्यासाठी गेला.

यशवंतराव म्हणाले, ‘‘तुम्ही दोघे दुसरी सोय होई पर्यन्त माझ्या घरी येऊन रहा. काळजी करू नका. सामान ही कसे तरी ठेवू. ‘‘सुरेशला काय बोलावे हे कळेच ना.घरात आजारपण, अडचण तरी त्यांचा मोठेपणा पाहून गहिवरून गेला. त्यांनी अनुराधेला काहीच विचारले नाही.

“अरे मला माहीत आहे तू कुणासाठी काय केलेस. काळजी नको. वेळ मारून ने. होईल व्यवस्थित.’’यशवंतरावांचे म्हणणे खरे होते. सुरेशपुढे पैसे उभे करणे, घरातील अडचण, पुन्हा घरामध्ये डिपॉजिट म्हणून दिलेले पैसे अडकलेले केव्हा मिळणार ह्याचा काहीच अंदाज नव्हता.

सुरेशने यशवंतरावांचे म्हणणे ऐकले. काही जुजबी सामान आणि कपाट, टीव्ही त्यांच्या घरी ठेवून दिला. त्यांचे आभार कसे मानावेत हे कळत नव्हते. सख्या नात्यातील माणसांनी आधार दिला नाही तो कोण यशवंतराव लांबचे त्यांनी दिला. सुरेशने अनुराधाला नको म्हणत असताना तिच्या डोळयातील अश्रु पाहून हकीकत कळल्यानंतर पैसे हातावर ठेवले. सुरेश आईकडे राहण्यास गेला बायको माहेरी बाळंतपणसाठी गेली. दिवस निघून जात होते. सुरेशने त्यांच्या जवळच भाड्याने घर घेतले. बायकोलाही कॉलेज मध्ये नोकरी मिळाली. मुलगी मोठी होत होती. तिला

कुठे ठेवायचा हा प्रश्न होताच. दोघांनी मुलीला अनुराधाकडे घरचीच आहे, चांगली लक्ष ठेवेल या हेतूने ठेवली.

अनुराधेचा मोठा मुलगा परीक्षा पास होऊन कंपनीत शिकाऊ उमेदवार म्हणून लागला. धाकटा चांगल्या मार्कांने पास होऊन कॉलेजला जाऊ लागला. शिकवणी तो घेऊ लागला. यशवंतरावांची तब्येत बिघडू लागली. सुरेश जवळच राहत असल्यामुळे घरी जाणे येणे होतच असे. कधी वाटेवर तर कधी मुलीला आणण्यासाठी. अनुराधा आणि यशवंतराव यांच्यातील दरी वाढत होती. त्यांच्या संशयी मनाने अनुराधाच्या सारखे काही कारण काढून संध्याकाळी मंदिरात जाणे, किंवा भाजी आणण्यास जाणे, तेही डोक्यात फूल घालून हे पटत नव्हते. कधी ती शेजारी जाई. तिचा उद्देश त्याच त्याच वातावरणात राहून सडण्यापेक्षा वेगळ्या वातावरणात जाऊन मनाला उभारी मिळावी, ऊर्जा मिळावी हा होता. यशवंतराव यांना डॉक्टरकडे जाऊन चेकिंग करून आणले. ती सहजच त्यांना म्हणाली

"अहो मी जरा वसुधाकडे जाऊन येते तिने बोलावले आहे."

"आता काय कारण आहे. सारखी आपली बाहेर असतेच. कधी जवळ बसून बोललीस? तुला काहीच वाटत नाही" यशवंतराव

"काय म्हणालात? मी विचारात नाही, बोलत नाही? काय बोलायचे, कधी तुमच्याकडे कामगार व्यतिरिक्त दुसरे विषय असतात? नाही तर बसून दुसरे काही सुचत नाही............."

“मी नवरा आहे. तुला कळले पाहिजे.”

“मग तुमचे करते कोण? मीच ना? माझ्या मनाचा कधी विचार केलात? जे सुख हवे असते ते कधी दिले नाही आता तर काय? नाहीच..... कधी तुमच्या बँकेच्या रेकोर्डवर माझी पत्नी म्हणून Joint खाते उघडले? तरी मी काही बोलले नाही. माझे हवे नको ते कधी विचारता? “अनुराधेचा एकदम बांध फुटला, इतक्या दिवसाची वाफ बाहेर पडून गेली. तरी घरात कुणी नव्हते म्हणून बरे.

विजय तेव्हढ्यात घरी आला. अनुराधेने झटकन विषय बदलून, बेसिनमध्ये जाऊन तोंड धूत म्हणाली “अहो तुम्ही चहा घेणार का? विजय तू?”

आजारपण काही कमी होत नव्हते. सुरेश सुटीवर गोव्याला गेला होता. तो गोव्यात असताना यशवंतराव गेल्याचे त्याला फोनवर कळले. घरी आल्यावर तो भेटायला गेला. गेल्यानंतर परिस्थिती आणखी बिकट झाली. शेजारीच कंपनीतील त्यांच्या मित्राने सर्व फॉर्म भरून कंपनीत दिलेत.कंपनी कायदेशीर देणी ही बँकेत जमा करणार, ती कशी काढायची हा प्रश्न निर्माण झाला. अनुराधाने ही गोष्ट सुरेशला सांगितली. त्यांच्या दोन बँकेतील दोन्ही खात्यावर joint खाते नव्हते. बँकेतील अधिकारी कायदेशीर वारस कोण म्हणून कोर्टाचे वारसाहक्क सर्टिफिकेट (Succession Certificate) मागू लागले. ते कसे मिळवायचे हा प्रश्न होता कारण ते मिळण्यास दोन तीन वर्षे जातात. तो पर्यन्त घर कसे चालवायचे हा गंभीर प्रश्न होता. सुरेशने एका बँकेच्या संचालक मंडळाशी बोलून पाहिले पण त्यांनी कायद्यावर बोट ठेवले. त्यांचे काहीच चूक नव्हते. अशा अनेक केसेस निर्माण होतात आणि

नियमच्याबाहेर जाता येत नाही. आयुष्यात जर चांगले काम केले असेल तर परमेश्वर कुठल्या रूपात उभा राहून मदत करतो. जर पैसे नाही मिळाले तर घरी फार बिकट परिस्थिती निर्माण होईल. काही ही करून काम कायदेशीर प्रक्रिया टाळून केले पाहिजे.सुरेशने एका अधिकारी कर्मचाऱ्याला विश्वासात घेऊन ही अडचण सांगितली. त्या अधिकाऱ्याचे नाव एका मोठ्या व्यक्तीने सुचवले होते आणि तीही बँक अधिकारी यांच्याशी बोलली होती. अनुराधा ही सुरेश बरोबर होती. अधिकारी याला खरोखर दया आली. त्याने कुणाला कळणार नाही ह्या वचनावर कुठलीही अपेक्षा न करता मदत करायचे मान्य केले.

“वडिलांची सही कुणाला करता येते का?”

सुरेश अनुराधेकडे बघत बसला. तिला त्याने विचारले. विजयला वडिलांची सही हुबेहूब करता येते असे सांगितले. तिने अधिकारी याला सांगितले.

“एक काम करा. मरणाच्या अगोदरच्या तारखेचे त्यांच्या नावाचे पत्र बनवा,त्यात तुमचे नाव joint खातेदार करायचे आहे असे म्हणा,तुमची specimen सही करा आणि त्याची सही वडिलांच्या नावे घेऊन बँकेत आणून द्या. मग खात्यावर तुमचे नाव चढवता येईल. तुम्हाला पैसे काढून खाते सुरू करता येईल. आधी तुमचे यजमान गेले आहेत हे बँकेत बोलू नका.”सुरेशने त्या व्यक्तीचे खरच मनोमन आभार मानले. बँकेत असल्यामुळे त्याचे चरण धरता येत नव्हते पण खरेच जी परिस्थिती निर्माण झाली होती त्यातून मार्ग निघाला हेच मोठे काम त्याने केले होते. परमेश्वरच साक्षात त्याच्या रूपात अवतरला.

सुरेशने ताबडतोब तसे पत्र बनविले. अनुराधाला बरोबर घेऊन सर्व कागद पत्रे बँकेत आणून दिली. एकदाचे काम झाले हा आनंद गगनात मावेना.घराची तातडीची निकड भागली होती.

अनुराधाची मुले कर्ती सवरती झालीत लग्न होऊन सुख घरात बरसू लागले. अनुराधाही नातवंडांमध्ये रमली. मुले तिला हवे नको ते विचारात होती. सुनाही चांगल्या होत्या. तरी त्या कामपुरत्या बोलत असत. मुले कुठेही जायची झालीत तर आईला फक्त सांगत. एकदा दोघा भावंडांनी 15 दिवस महाबळेश्वर येथे जायचे ठरविले.सुनंदाने विजयला आई बाबतीत विचारले

"अरे त्या कुठे राहणार? "

"अरे हो तिला काय वाटेल. आपण जात आहोत. तिला कोठेच जायला मिळाले नाही."विजय,"मी असे करतो अभयशी बोलतो. तो अभयशी बोलला. अभय म्हणाला मी मीराबरोबर बोलतो. अभयला मीरेचा स्वभाव माहीत होता. तिला नेहमी वेगळेपण हवे असते. नवराबायकोच्या बाबतीत आईवडील,सासू सासरे ह्यांना स्पेस द्यावी पण आपल्या सर्वस्वात त्यांनी सारखे येऊ नये ह्या विचाराची.

अभयने मीरेला विचारले, "मीरे हे बघ आपण फिरायला जातो आहोत. त्यावेळी आपल्या मुलांना आजी लागते म्हणून आपण आईला नेले तर?"

"अभय! तुला कळते का काय बोलतोस? अरे आपल्याला काही एकांत हवा की नको.? आपले घर म्हणजे दोन बेडरूम हॉल किचन. एका खोलीत भाऊजी एकात आपण आणि आई मुले सारखी येऊन जाऊन फिरत असतात. हॉल मध्ये

कधी आपण बसलो आहोत? आपण वेगळा ब्लॉक घेऊ शकत नाही कारण तुम्ही दोघांनी ह्या घरासाठी कर्ज काढले आहे. दोघेही कामावर जातो. आपल्या बरोबर नको. हवे तर त्यांना आपण ट्रॅवल कंपनीबरोबर पाठवू."

अभयने विजयला सर्व सांगितले. त्यांच्यासमोर आईला कसे सांगू असा प्रश्न पडला. दोघांनी आईला सांगायचे ठरविले. आई टीव्ही बघत बसली होती.

"आई अग आम्ही सर्व महाबळेश्वरला जाऊ म्हणतो. बरेच दिवसात गेलो नाही बाबा गेल्यापासून" विजय

"मग मी काय सांगू? मुलांना माझ्याकडे ठेवून जाणार आहेस का?"अनुराधा

"नाही आई. मुलांना आम्ही घेऊन जाऊ" अभय

"जा ना. मी राहीन घरी एकटी"

"आई मी सुरेश मामाला सांगून जातो म्हणजे तो येऊन जाऊन राहील" विजय

"काही नको मी समर्थ आहे. मी सांगितले तरी तो येईल त्याची काळजी नको. अरे पण मला काही पैसे देऊन जा. म्हणजे घर खर्चाला होतील."अनुराधा

"अग मी मीरेकडुन घेऊन देतो."अभय

"का रे सर्व तुला बायकोला विचारायला लागते. आईसाठी तू निर्णय घेऊ शकत नाहीस का? "अनुराधा. विजयने आईला पैसे दिले. अभयचा चेहरा गोरामोरा

झाला. अनुराधेचे बँक अकाऊंट जरी असले त्यात अगदीच थोडे पैसे होते. तिने मुलांसाठी ब्लॉक घेण्यासाठी पैसे दिले होते. पहिले घर विकून हेही पैसे दिले. दोघांनी लोन घेऊन मोठा ब्लॉक घेतला. दोघांनीही आपआपल्या बायकांची नावे जाइंट अकाऊंटला ठेवली होती. तिचे नाव कुठेच नव्हते. अभय विजय सर्व महाबळेश्वरला गेलेत. अनुराधा एकटीच घरी राहिली. तिने फोन करून सुरेशला सांगितले.

सुरेश घरी आला. अनुराधा घरात चहा करण्यासाठी गेली. हॉल मध्ये दोघे चहा घेत बसले.

“काय रे मूल मोठी झाली की आपल्याला स्थान नसते. सर्व आपआपल्या विश्वात मग्न. आधी हे असे तऱ्हेवाईक होते म्हणून एकटी आता मुलांचे विश्व वेगळे म्हणून एकटी. नातवंडांची सोय म्हणून घरी राहायचे. बाहेर जाण्यावर बंधने येतात.”अनुराधा

“काय करणार? जीवन हे असेच असते. दोन पिढ्यांमद्धे अंतर राहणार. पण तू तुला काय हवे नको हे स्पष्ट सांग. “

“काय सांगणार. दोघे जवळ तर हवेत बसायला. “अनुराधा

“हे बघ मला एक सुचवावेसे वाटते. तुला काय वाटेल हे माहीत नाही. तुझे वय आताशी 55 आहे. तू आता वेगळा बदलत्या जगाबरोबर विचार करावा असे वाटते.”सुरेश

“म्हणजे? तुला काय म्हणायचे आहे? ”

“तू आता कुणाची सोबत, आधार म्हणून साथीदार शोधायला हवा.”सुरेश

“मुले काय म्हणतील “

“त्याची तू का चिंता करतेस?”सुरेश “हे बघ तुला एक काही तरी पर्याय निवडला पाहिजे.”

“तू म्हणतोस ते बरोबर आहे. ह्या वयात हा विचार करताना व्यक्ति कशी असेल. पूर्वीसारख झाले तर? “अनुराधा

“तुझी तयारी असेल तर माझ्या पाहण्यात एक व्यक्ति आहे. गजानन कुलकर्णी 50 वर्षाचे, राहायला ठाणे येथे आहेत. चांगली आहे. मुले परदेशात स्थिरावली आहेत आणि त्यांना इथे यायचे नाही. श्री गजाननरावाना भारत सोडायचा नाही. जबाबदारी नाही. घर मोठे आहे. रसिक आहेत.”सुरेश

“तुला काय वाटते? मुलांना कसे सांगायचे.”

“ते नंतर बघू. आधी भेटून,पाहून सारे समजून घे.

सुरेश आणि अनुराधा मुले महाबळेश्वरला असताना श्री गजानन कुलकर्णी यांना भेटली. अनुराधा आणि श्री गजाननरावांचे मनमोकळे बोलणे झाले.

“माझे घर, काय थोडे पैसे असतील त्यावर मुलांचे काहीही हक्क नाही. मुलांना सांगितले आहे त्यांनी ही तसे लिहून दिले आहे. त्यांची माझ्या लग्नाच्या निर्णयाला संमती आहे. नात्यात काही ही बिघाड होणार नाही.”गजाननराव

“माझ्याकडे काही नाही. एक लाख ठेव आहे घर मुलांच्या नावावर आहे. “

“मला काहीही नको तुमचे. हो! एक गोष्ट सांगतो हे सर्व मी आहे तोपर्यंत माझ्या नावावर. गेल्यावर तुमच्या नावे होईल. एकगोष्ट आपण पक्की लक्षात ठेवली पाहिजे हे सर्व आपण एकमेकांमध्ये किती एकरूप होतो ह्यावर तीन एक वर्षांनी निर्णय घेऊ. दोघेही गेल्यानंतर हे सर्व चांगल्या संस्थेला दान देऊ. तसे आपण दोन्ही मुलांना लिखित स्वरुपात देऊ आणि कुठल्या संस्थेला द्यायचे हे आगाऊ कळवू. आपण एकमेकांच्या मुलांकडे जाऊ-येऊ शकतो.”

अनुराधेला हे पसंत पडले. तिने सुरेश समोर मान्यता दिली. आता मुलांना कसे कळवायचे हे सुरेश अनुराधाने ठरविले. मुले आल्यावर सर्वांना एकत्रित सांगू. नंतर श्री गजाननराव आणि मुलांची भेट घडवू. श्री गजननरावाना हे मान्य पडले त्यांनी ही त्यांच्या मुलांना कळविले.

महाबळेश्वरला मीरेनेच जेवताना विषय काढला.

“आपण आईंचे दुसरे लग्न करून दिले तर त्यांना ही जोडीदार लाभेल.”

“असे का? राहतील की आपल्या घरी आपल्या मुलांना आजी लागतेच ना? त्यांना काय वाटेल “? सुनंदा

“आपण आपल्या मुलांची काळजी घेतली पाहिजे. त्यांना कशाला त्रास?”मीरा

“अरे तुम्ही काय बोलता? तिला काय वाटेल “विजय “तिने हालात दिवस काढलेत. तिला सुख मिळाले पाहिजे” . विजय

“खरे सुख त्यांना चांगला हक्काचा माणूस मिळाला की मिळेल. आपण काही त्यांना अंतर द्यायचे नाही. आपण भेटायचे. संबंध ठेवायचे.”मीरा

सर्वांचे एकमत झाले. दोघींनी योग्यवेळी निर्णय घेऊन आईशी बोलायचे ठरविले. सर्व घरी आली. दिवस सरत होते. सुरेश आणि गजाननराव ठरल्याप्रमाणे अनुराधेच्या घरी आलेत. मुले घरीच होती. सर्व गप्पा झाल्यावर अनुराधेने सुनाना आणि मुलांना सर्व गोष्ट सांगितली. आधीच हे ठरविले होते. कुणी काही खर्च करायचं नाही. सर्व वारसा हक्क इ. ठरविलेले आहे. ते सगळयांना दाखविण्यात येईल. तिची तयारी आहे हे कळविले. चांगला मुहूर्त बघून श्री गजाननराव, त्यांचा जवळचा मित्र, सुरेश आणि अनुराधाकडील मुले आणि तिच्या बहिणी यांच्या समक्ष विवाह नोंदणी पद्दतीने झाला. अनुराधेच्या पूर्वीचा शेजारी आणि मैत्रिणीला अनुराधेला आता खरे सुख मिळाले हे पाहून समाधान वाटले. घरचा उंबरठा ओलांडताना अनुराधेला गहिवरून आले. यशवंतरावांच्या फोटोकडे जाऊन, “क्षमा करा. मला पर्याय नव्हता. साथी शिवाय राहू शकत नाही. मायेचा हात कोण फिरवणार?

अनुराधा नातवांजवळ जाऊन त्यांचे पापे घेतले. त्यांना जवळ घेत “येते मी बाळांनो. आईला त्रास नाही द्यायचा. हे पहा पोरांनो, मुलांना पाठवा ठाण्याला. तुम्ही येत जा.”मुलांनी सुनानी आणि नातवानी आजी आजोबांच्या पाया पडले.

"मुलांनो तुम्ही या. घर तुमचेच आहे."गजनांरावानी अनुराधेच्या पाठीवर हात ठेवून, मुलांना टाटा करत दोघे चालू लागले. शेजारी सुद्धा गहिवरले. अनुराधेला खरा जोडीदार मिळाला.

सुरेशही दोघांना हात हलवत निरोप देऊ लागला. डोळ्यात उतराई झाल्याचे आनंदाश्रू होते.

***********************************

रणांगण, लव अंकुश दिवाळी अंक २०१६

# कोंडी

योगेश कामावरून घरी आला नाही म्हणून चंद्रकला खिडकीतून वाटेकडे डोळे लावून बसली होती. बाहेर थंडी होतीच, त्यातून पौर्णिमा असल्यामुळे लक्ख चांदणेही पडले होते. कॉम्प्लेक्सच्या कंपाऊंड मध्ये रातराणी फुलली होती. पहिल्या माळयावर असल्यामुळे त्याचा वास दरवळत होता. योगेश हा बिल्डर कडे नोकरीला होता. तो अक्कौंट्स मार्केटिंग ही बघायचा त्यामुळे नेहमी उशिरा येणे हा प्रकार नित्याचा होता. चंद्रकलाचे लग्न होऊन दोन आठवडेच झाले होते. प्रेम विवाह नोंदणी पद्धतीने झाला होता. दोघेही कॉलेज मध्ये एका वर्गात होते. साधी, सावळी, घर कामात चांगली आईची ही अपेक्षा योगेशने जपली होती. परंतु घरात काही कळवले नव्हतं. वडील मात्र स्वतं:हून कळल्यानंतर रजिस्ट्रारच्या ऑफिस मध्ये आले होते हे ही योगेशने चंद्रकलेला सांगितले नव्हते. आई बाबतीत तो काही बोलला नाही. लग्नानंतर तो मित्राने बुक केलेल्या हॉटेल मध्ये दिवसासाठी उतरला आणि तेथूनच दोघे 8 दिवसासाठी उटीला गेले. घराविषयी काहीच तो बोलला नव्हता. तेव्हढ्यात योगेश येताना दिसला. अधीरपणे ती दरवाजा उघडण्यासाठी धावली

“किती उशीर? आपले लग्न झाले आहे हे विसरून गेले वाटते रावसाहेब” ? त्याची बॅग घेऊन घरात गेली.

“अग नाही ग! कसा विसरेन? पण काय करू मालक, गिर्हाइक फ्लॅट बघण्यासाठी आले होते. त्यांना पटवण्यात वेळ गेला. 10 दिवस रजेवर होतो. निघता येत नाही त्यातून त्याचे उपकार...”बूट काढून तो कपडे काढू लागला. काढता काढता “अग विनोद कुठे गेला? घरात दिसत नाही?”

“भाऊजी मित्राकडे झोपायला जातो असे म्हणालेत.”

“तू अडवले नाहीस? गॅलरीत झोपला असता एव्हढी मोठी आहे. हॉल ही आहे. बाबा ही नाहीत इथे” योगेशला बाबांविषयी बोलून गेलो ही चूक झाली असे वाटू लागले. त्याला काही लपवायचे नव्हते पण योग्य वेळ आल्यावर सांगायचे होते.

“अग मी आंघोळ करून घेतो. तू जेवलीस का? ”

“कशी मी जेवेन? एकट्याला जेवावेसे वाटेल का?”

योगेश आंघोळ करून आला. जेवण झाली. योगेशने बेडरूम मध्ये गेल्यावर हळूच बॅगेतून आणलेला गजरा काढून उशी खाली लपविला.त्याला चंद्रकलेला आश्चर्याचा धक्का द्यायचा होता. सगळे आवरून ती बेडरूम मध्ये आली.

“आज रातराणी काय मस्त फुललेली आहे. सुवास आपल्या घरात येतो. पौर्णिमेचे चांदणेही. घरातून चांगले दिसते. बघा ना आपल्या घरात ही पहुडले आहे.”चंद्रकला

“घरात चंद्रकला म्हणजे चांदणे येणारच. “त्याने तिला जवळ घेत हातातील गजरा वेणीत माळू लागला.

चंद्रकलेला नवल वाटले हे अनपेक्षित गजरा माळणे. योगेश रसिक आहे हे तिला आजच कळले.

“हे करण्यासाठी तुम्ही भाऊजींना मित्राकडे पाठवले वाटते.”ती योगेशच्या मिठीत विसावली.

“नाही ग! तोच म्हणाला मला फोनवर. मी नाही का म्हणू? मला खरा एकांत हवा होता मोकळेपणासाठी” चंद्रकलेच्या चांदण्यात तो आकंठ तृप्त होत होता. मोगऱ्याची फूल सर्वांगावरून फिरत होती ती सुखावत होती. तिचे मन मात्र घरावर आईवडिलांची पाटी असूनही ते लग्नाला का आले नाहीत ह्याचा विचार करत होते.तिला ते विचारवासे वाटत होते. तिच्या आईवडिलांनाही हे कोड होते. प्रेम वर्षभर चालले होते. एकुलत्या एक मुलीच्या” करीन तर ह्याच्याशी” हट्टामुळे त्यांनी योगेश विषयी जास्त माहिती काढली नव्हती. योगेश तसे दिसायला चांगला कष्टाळू धडपडया होता.

चंद्रकलेचे आईवडील चिंतेमुळे लग्नाबद्धल योगेशच्या मागे लागले होते. योगेशने फक्त वडील पोलिस खात्यात असून ते 1.5 वर्षात निवृत होतील, घर घेतले आहे. नाशिकला आजी असते तिथे लहान घर आहे. एव्हढेच सांगितले. त्याने चांगला मुहूर्त पाहून एके दिवशी अचानक लग्न रजिस्टर पद्धतीने करायचे असा निर्णय चंद्रकलेच्या घरी येऊन सांगितला.ठराविक माणसेच सह्या करण्यासाठी येतील. गर्दी नको. नंतर सोईस्करपणे पूजेचे बघू. चंद्रकलेच्या आईवडिलांनी लग्न लवकर होत आहे म्हणून जास्त खोलात गेले नाहीत. त्याच्या आईवडिलांची समंती असेलच असे गृहीत धरले.

“योगेश बाबा कुठे आहेत. ते येणार की नाही.”योगेशच्या सासऱ्यांनी तेव्हाढ्यात विचारले. हा प्रश्न त्यांनी ते अधिक तपासासाठी बाहेरगावी आहेत केव्हा येतील हे सांगता येत नाही. आईबद्धल त्याने टाळले. मी सांगेन बाबांना नंतर. हयावरच संभाषण अर्धवट सोडून दिले होते हे चंद्रकलेला ठाऊक होते.

“अरे आपण तुझ्या आईबाबांना कधी भेटायचे? त्यांच्या पाया पडायला हवे ” चंद्रकला हळू कानाला ओठ घासत म्हणून गेली

“जाऊ ग. ठरवू. बघू. “तो तिला अधिक जवळ ओढू लागला. तिच्या मिठीत हळू निद्राधीन झाला. उन्ह अंगावर आली तरी योगेश हांतरूणावर होता हे पाहून चंद्रकला त्याला उठवायला आली तसे त्याने तिला जवळ ओढले.

“ए पुरे ह! कामावर जायचे आहे ना तुला. मला डबा करायचा आहे. विनोद भाऊजी आंघोळ करत आहेत.”विनोद घरी आहे हे ऐकून तो झटकन उठला. दोघेही एकदम नेहमी प्रमाणे बाहेर पडले.

“अरे विनोद! अरे आईबाबांना ही भेटायचे म्हणते. तू काही बोलला काय हिला? योगेशने विषय काढला.

“नाही मी कसं बोलेन? घेऊन जा, काय करणार? केव्हा ना केव्हा तरी कळणारच. खरे सांगून टाक” विनोद

दोघेही आपापल्या रस्त्याला लागले. योगेशचे मन थाऱ्यावर नव्हते. चंद्रकलेला काय आणि कसे सांगायचे हा प्रश्न होता. वर्षभरात घटनाच तशा घडून गेल्या होत्या. पावसाची मुसळधार सर कोसळून सर्व चिखल व्हावा तसे साचलेले योगेशच्या मनात येऊ लागले. योगेश, विनोद लहानपणापासून आईबाबा मधील भांडण पहात आलेली होती. विनोदचा जीव आईवर जास्त होता. आई त्याच्याशी जास्त बोलायची. तो वडिलांचा तिरस्कार करीत होता. योगेश समजूतदार सर्वांना समजावून घेत भांडणे मिटवायचा. ह्या वातावरणामुळे दोघांच्या शिक्षणावर परिणाम होत असे. तरी ते दोघे शिकत होते. भांडणाचा परिणाम आईवर जास्त होत होता. आजी आल्यावर दोघींमध्ये जास्तच भांडणे होत. भांडणे का होत आहेत ह्याचे खरे कारण काय हे मुलांना कळत नव्हते. एक दिवस विनोद घरीच होता. त्याला आईचे शब्द कानावर पडले

“त्यांना मी पसंत नव्हते तर का तुम्ही लग्न लावले? “आई

“अग तू काय बोलतेस? मी कधी असे म्हटले का? तुला मी एव्हढेच म्हणते सगळ्यांना समजून घे. तो माझें, बहिणेचे करतो त्यात काय झाले? “आजी

“माझ्या कडे कुठे लक्ष असते? मला कधी साधी वेणी आणत नाहीत. ताई आल्याकी सारखे त्यांच्यामध्ये, त्यांना वेणी आण, त्यांना घेऊन जा. त्यांच्या घरी जाऊन बस. मुलांसाठी काही कर “आई

“अग तो त्याचा स्वभाव आहे.”आजी

“तुम्ही त्यांचीच बाजू घ्या. परवा अपघाताच्या तपासाचे निमित्त करून बाईला सिनेमा पाहायला घेऊन गेलेत. हे शोभते का?”

“कुणी सांगितले तुला “आजी

“कुणी काय? त्यांनीच. अंगाला परफ्यूमचा वास येत होता. मी त्यांना उशीर का झाला? खोदून विचारले तेव्हा सांगितले. आई ह्याला तपासाचे काम म्हणतात? “

“अग त्याने मजा केली असेल! जो करतो तो बोलेल का? “आजी

“तुम्ही मुलाचीच बाजू घेणार “आई

आजीला काहीच समजेना. ती जुन्या वळणाची 70 ची अशिक्षित बाई. विनोद मात्र चपापला. वडील पोलिस जरी होते तरी त्यांना कविता करण्याचा नाद होता.

मुलांमध्ये मिसळत असत, मित्र मंडळीत कविता म्हणत असत, घरी कार्यक्रम होत असे. बाहेर ते मोकळे होते. त्यांच्या कविता प्रेम भरल्या रोमॅंटिक होत्या. कार्यक्रम असला की आईला घरी मदत करीत असत. खाकी वर्दीतही हिरवेपण जपले होते. विनोद त्यांच्या मागावर राहिला. विश्वासू मित्रांनाही सांगून ठेवले होते. त्यांनी छडा लावण्याचा निश्चय केला. वडील आजी होती तो पर्यन्त घरी जेवत. दोघांमधील अंतर वाढत गेले. ते बाहेर परस्पर जेवून येऊ लागले. एकदा सकाळी रात्रपाळी करून घरी आले. आईला बरे नव्हते. योगेशने चहा करून दिला. योगेशला ते दादा म्हणत

"दादा काय झाले आईला? डॉक्टर कडे घेऊन जा. पैसे काढून ठेवतो."

"जाऊन आलो. डॉक्टरनी टेस्ट करायला सांगितल्या आहेत. पाच हजार लागतील असे म्हणाले" योगेश

"पैसे बँकेतून काढ. मी चेकवर सही करून ठेवतो. पण घेऊन जा तिला. हयगय करू नको. मला बंदोबस्त आहे. मला लगेच दुपारी जेवून जायचे आहे."

"बाबा मी डाळभात करेन. बाकी कसे...करायचे "योगेश कचरतच बोलला

"अरे आपल्या छोटू विनोदला सांग पोळीभाजी केंद्रातून आणायला. कसे तरी चालवू. मी जेवेन बाहेर हवे तर."योगेश विनोदकडे बघत राहिला.

लक्ष्मणराव बायको जवळ जाऊन बसले. ताप आहे का गळ्याला हात लावून बघितला. मुले हे पाहतच होती.

“काळजी करू नको. पैशाची चिंता करू नको. मी जरी भांडलो तरी टोकाचा गैरसमज करू नको. मी गजरा जरी नाही आणला तरी तुला हवे नको ते बघतो ना?.”

“दादा अरे आपण नवीन घर बघू. तू बघ ना तुझ्या मालकाला विचारून काही भाव कमी होईल का? हे घर विकू आणि नवीन घेऊ. मी कर्ज काढीन. अजून 1.5 वर्षे आहेत थोडे पेंशन मोडेन. पण घर मोठे घेऊ म्हणजे वेगळी रूम विश्रांतीसाठी मिळेल.”

“आता काय उपयोग शेवटची वेळ...?”अनुसूया हळूच तोंड फिरवून बोलून गेल्या. कुणाला ऐकू गेले नाही पण लक्ष्मणरावानी ऐकले.

विनोद आणि योगेशला वडिलांच्या बोलण्याचे आश्चर्य वाटले. जे आईला शिव्या घालणारे, कधी कधी आपली सर्विस बंदूक काढून स्वत:वर रोखून धरणारे हेच का? काही कळत नव्हते. लक्ष्मणराव आणि अनुसूया दोघेही कधी बोलत तर कधी भांडत. कधी कधी दोघेही बाहेर स्कूटरवर जात असत. दोघांनाही आईवडिलांमध्ये असे का हे कळत नव्हते. लक्ष्मणराव त्यांच्या ग्रुप मधे आई विषयी गा-हाणी सांगत तर आई ही तिच्या मैत्रिणीमध्ये बाबांविषयी सांगे. लक्ष्मणरावानी आई फार संशयी आहे, प्रत्येक ठिकाणी सारखा संशय घेते. तिला आई बहीण कोणी नको. असे काही बाई सांगितले. आईने तर मैत्रिणींना हे बाहेर मीच कशी वाईट, समजून घेत नाही. हिला कोणी नको असते असे भावनावश होऊन सांगत फिरतात आणि ते लोकांना खरे वाटते. शेजारीही “यांच्यात काय खरे आहे, कोण खरे कोण खोटे” गोंधळून गेलेत. लक्ष्मणरावानी ग्रुप मधल्या जवळच्या मित्राकडे बाईला

सिनेमाला घेऊन गेलेत याची कबुली दिली. त्यांच्या दृष्टीने ती एका आरोपित व्यक्तीची बायको होती, तिला मदत हवी होती. ती ही गळयात पडली होती. जवळच्या शेजाऱ्यांनी त्यांची खाजगी बाब म्हणून जास्त लक्ष दिले नाही. एकदा कहर झाला. विनोद, लक्ष्मणराव आणि अंनुसूयाबाई अगदी जवळ असलेल्या शेजाऱ्यांच्या घरी गेले. मध्यरात्री पर्यन्त दोघांमध्ये समेट करण्याचा प्रयत्न केला. कशीबशी समजूत काढली. लक्ष्मणराव बायकोकडील भाऊ ही त्यांच्या स्वभावा विषयी संशयी असेच म्हणत हे वारंवार शेजाऱ्यांना सांगत असत. लक्ष्मणरावांनी पडते घेऊन जास्त ताणले जाऊ नये म्हणून चांगले राहण्याची हमी दिली. अनुसूयाबाईंची तब्येत जास्तच बिघडली. कॅन्सरमुळे हॉस्पिटल मध्ये दाखल करावे लागले. लक्ष्मणराव फार टेंशनमध्ये आलेत. नोकरीवर सुट्टी घेऊन ते हॉस्पिटलमध्ये अंनुसुयांबरोबर राहू लागलेत. मुलेही फार हबकली होती. ती आईची चिंता करू लागलीत. त्यांनी नवीन मोठा ब्लॉक घेऊन, राहायला गुढीपाडव्याला गेलेत आणि अनुसूयाबाई आजारी जास्त झाल्यात. नवीन घर लाभदायी झाले नाही असे नातेवाईक म्हणू लागले. त्याकडे कुणी लक्ष दिले नाही.

“दादा, छोटू आता आपल्याला तिघांना सांभाळून घेतले पाहिजे. तुम्ही घराकडे बघा, कामावर जा मी हॉस्पिटल मध्ये बसेन. मी आहे काळजी करू नका. होईल बरी ती.”हे वाक्य म्हणून लक्ष्मणरावानी तोंड फिरून आवंढा गिळून अश्रु पुसले.

“बाबा खरच आई बरी होईल? डॉक्टर काय म्हणाले? लपवू नका “योगेश

"काय सांगू बाळांनो. कस सांगू"

"नाही खर सांगा. आम्हाला तिची अवस्था बघवत नाही."विनोदच्या डोळयात अश्रु उभे राहिले.

लक्ष्मणरावानी दोघांना जवळ घेतले. "डॉक्टरनी ही शेवटची स्टेज आहे. जास्तीतजास्त दोन –तीन महीने."हे सांगताना हुंदका फुटला. स्वत:ला सावरत दोघांच्या डोक्यावर थोपटत त्यांना धीर दिला.

"दादा तुझ्यासाठी मुलगी पाहिली होती. माझी इच्छा होती आईच्या हातून अक्षता पडाव्यात. तिच्यासमोर सून यावी. दैवाने सर्व फासे फिरवले."मुलांजवळ आजी आणि मामी येऊन राहिली होती. मुलांचे मामा येऊन जाऊन असत. अनुसूयाबाई महिनाभरात स्वर्गवासी झाल्यात. घरात कसे करायचे हा प्रश्न पडला.सर्वजण आपआपल्या घरी गेलेत. योगेश विनोद कामावर जात होते. लक्ष्मणरावाची नोकरी शिफ्ट मध्ये होती. घरी स्वैपाकाला बाई ठेवली. ती दोन्ही वेळा ती येऊन करून जाई.

लक्ष्मणरावाना एकटेपणाचा वैशाख भाजून काढत होता. सहा महिन्यांनंतरचे निवृतीचे मळभ आताच दिसू लागले. मुलेही वातावरणामुळे दुरावली होती. आई होती म्हणून मोट बांधलेली होती. घर मात्र त्यांच्या आणि बायकोच्या नावावर होते. विनोद बाबांशी फटकून वागत होता. योगेश कामापुरते बोलत होता. लक्ष्मणराव तरी दोघांना काय हवे नको बघत होते. पैसे काढून देत होते.त्यांचा पोलिसी खाक्या काही बदलत नव्हता. विनोद कंपनीच्या कामासाठी काही महिन्यासाठी परदेशी गेला.

लक्ष्मणराव निवृती नंतर काय याचा विचार करू लागले. त्यांनी आई आणि मुलाच्या नावे ठेवलेली ठेव मोडून पैसे लोन फेडण्यासाठी देण्याचे सूचना योगेशला केली. तो काही तयार होईना.

"अरे दादा हे पैसे मी लोनमध्ये भरले तर मला पेन्शन जास्त येईल. नाहीतर ते वळते होतील पेन्शन कमी येईल "

"अहो पण विनोदची सही लागेल त्याचे ही नाव आहे, तो आता कुठे आहे? "योगेश चिडून म्हणाला. लक्ष्मणरावाना हे लक्षात नव्हते. त्यांनी मनातून तो विचार काढून टाकला.

लक्ष्मणराव आपल्या मित्र मंडळीत दिलखुलास गप्पा मारत. असेच एकदा मंडळातील हितचिंतकांनी त्यांनी एकटेपणाची खंत बोलवून दाखवताच त्यांना दुसरे लग्न करण्याचे सुचवले. अशोकने सुचवले,"हे बघा हा विचार करण्यास काहीच हरकत नाही. अहो मुलांचे विश्व वेगळे आणि या वयातील एकटेपणाचे वेगळे."

"तुम्ही म्हणता ते खरे आहे. हिच्या भावानेही असेच सुचवले "लक्ष्मणराव "बघू आता पुढे काय होते ते. घरात वाद चालू आहेत अजून. धाकटा परदेशात गेला आहे. तो नेहमी माझा द्वेष करतो. दादा तरी बरा आहे माझी बाजू तरी ऐकून घेतो."

"मुलांना विश्वासात घ्या अगोदर. त्यांचे विचार समजून घ्या "अशोक

"मी माझ्या पोलिस स्टाइलने सांगेन. आताच सांगितले तर ते ऐकणार नाहीत. "

“हा विषय नाजुक आहे. त्यात मुलांच्या भावना आहेत. त्यांनी नवीन आईला या वयात स्वीकारले पाहिजे. नाहीतर घोटाळा होईल. कोणी पाहण्यात आहे का? “अशोक

“गावाकडे एक आहे. अजून काहीच नाही. आई काय म्हणते बघू. अजून नाही विचार केला. कधी कधी वाटते हिची इच्छा आई म्हणून मुलाच्या डोक्यावर अक्षता पडल्या पाहिजेत असे तिला वाटायचे म्हणून लग्न करावे का? विचार मनात येतो. ही असताना दादाचे लग्न करावे म्हणत होतो. पण तो दुसरी नोकरी शोधत होता.”लक्ष्मणराव.

काही दिवस निघून गेले. योगेश एकदा अशोकला भेटला. “काका बोलायचे आहे. घरी येऊ का? ”

“ये ना. काही काळजी करण्यासारखे नाही ना? बाबांची तब्येत ठीक आहे ना? “अशोकने विचारायचे म्हणून विचारले. दोघे घरी आले.

“काका तुम्हाला बाबा दुसऱ्या लग्न करण्याविषयी बोलले का? ते तुमच्याशी सर्व बोलतात म्हणून विचारतो “योगेश

“नाही रे का काय झाले? “अशोक

“बाबा म्हणत होते मला. माझे मत जाणून घेत होते. विनोद परदेशात आहे. “

“तू त्याच्याशी बोलला का? “अशोक

“नाही मी बाबांना सांगितले तो येऊ दे. आल्यानंतर त्याच्याशी बोलू. मग ठरवू. आजीशी बोलू. जर आधी यांचे लग्न झाले तर माझ्या लग्नात मी काय सांगू? कस सांगू? .”योगेश

“तू म्हणतोस ते खरे आहे. तू त्यांच्या बाजूने विचार कर. त्यांना एकटे वाटते ना? तुमचे लग्न झाल्यावर त्यांचे काय? “अशोकने त्याचे मन जाणण्याचा प्रयत्न केला.

“काका मी समजू शकतो पण विनोदला कोण सांगेल.? त्याला हे पटणार नाही. या विषयावरून घरात आमच्या दोघांचे बाबाबरोबर मतभेद चालू आहेत. बाबा समजण्यापलीकडे आहेत.आईला त्यांनी कधी समजून घेतले नाही.”

योगेश एव्हढे वाक्य बोलतो न बोलतो तोच लक्ष्मणराव उघड्या दरवाजातून अशोकच्या घरात आलेत. त्यांना कसे समजले कोण जाणे. अशोकच्या घरी त्यांचे दुसरे हितचिंतकही आले होते. त्यांच्या कुटुंबानेही अनुसूया आणि लक्ष्मणराव यांच्यात मध्यस्थी करण्याचा बराच प्रयत्न केला होता.

“अरे वा! बरे झाले तुम्ही आलात. तुम्हाला कसे कळले हा इथे आहे.”अशोक

“नाही सोसायटीतं आलो होतो तेव्हा याची गाडी खाली बघितली म्हणून आलो “लक्ष्मणराव

"बसा आपण सगळे एकत्र बसून मार्ग काढू."अशोक

बराच वेळ चर्चा झाली. दोघा बापलेकांमध्ये सुसंवाद एकवाक्यता होईना. योगेश शेवटी "बाबांनी सहा महीने थांबा. आईची घटना आताच घडली आहे. थोडे शांत होऊ ध्या मग पाहू."

"अरे दादा तुझ्या आईची इच्छा होती आईला वाटत होते अक्षता सुनेच्या डोक्यावर टाकाव्यात. म्हणून मी हा निर्णय घेतला आणि लग्न केले"

लक्ष्मणराव त्यांना बोलायचे नसताना अनावधानाने बोलून गेले, आणि योगेशचा हे ऐकताच स्फोट झाला.

"बघा हे काय म्हणालेत. ते लग्न करून बसलेत. ह्यांनी आमचा विश्वातघात केला.आम्ही यांची मुले. आई आताच 8 महीने झाले जाऊन ह्यांचा विचार केला नाही."योगेश "कसे यांच्यावर विश्वास ठेवायचा? उद्या हे काही करतील "

"अरे तुम्ही माझा विचार करता का? माझे मन कुणाकडे उघडे करू? घरात कोणी बघायला नको का? "लक्ष्मणराव

"म्हणून तुम्ही आम्हाला न सांगता हा निर्णय घेतला? लग्न करून बसलात. आमची आई कशी आहे आम्हाला ती कशी वागवेल हे समजायला नको.? हे काही नाही तुम्ही वडील हि म्हणवून घ्यायला लाज वाटते. काही नाही आम्ही तिला घरात येऊ देणार नाही. तुम्ही कुठ हि जा. आम्ही तिला घरात घेणार नाही "योगेश भावनावश झाला. ओठ थरथरत होते.

अशोक, सगळे घरातील शेजारी, लक्ष्मणराव जे करून बसलेत त्यावर आवाक झालेत. अशोकला आश्चर्य वाटले जो माणूस अजून विचार केला नाही, बघू असे जो म्हणत होता, तो हे कसे करून बसला.

“अहो लक्ष्मणराव! काय हे! तुम्हाला आधी सांगितले होते तुम्ही मुलांना विश्वासात घ्या. हा त्यांचा विश्वासघात आहे. तुमची बाजू कितीही समर्थनीय असली तरी हा निवडलेला मार्ग योग्य नाही.”अशोकने योगेशसमोर त्यांना सांगितले.

“बघा काका हे कसे आहेत. आई म्हणत होती तेच बरोबर होते.”योगेश.

सर्व आता काय बोलायचे. घडायचे ते घडून गेले. त्यांचा अंतर्गत मामला आहे. उठून जाऊ लागले. तरी दोघांना समजून घ्या.शांत रहा. अशा चार हिताच्या गोष्टी सांगून निघून गेलेत. काही दिवसांनी लक्ष्मणरावानी कबुल केले, लग्न त्यांनी गावी देवळात केले. ती गावाकडची आहे. आईकडे राहते ते जाऊन येऊन असतात.

सर्व आठविल्यामुळे योगेशचे कामात लक्ष लागत नव्हते. हे कसे चंद्रकलेला सांगायचे. तिला काय वाटेल ती काय भूमिका घेईल याचा विचार करू लागला. तो लवकर घरी जाण्यासाठी साहेबांची अनुमती घेऊन निघाला. चंद्रकलेने आज सर्व कपाट साफसुफ करून लावले. लावताना तिला योगेशच्या कपड्याखाली बाईचा फोटो दिसला. तिने आईचा फोटो असेल असे ताडले, संध्याकाळी योगेशला विचारू. तेव्हढ्यात बेल वाजली म्हणून दार उघडले. योगेश लवकर घरी आलेला पाहून अवाक झाली.

“काय आज लवकर स्वारी घरी आली.?”

“तुझी आठवण झाली, तब्येत बरी नाही सांगून निघालो “

चहा पिऊन झाल्यावर चंद्रकलेने आईचा फोटो काढला. दाखवत विचारले, “ह्या आई ना? फोटो का आत ठेवला होता? ””योगेशला काय बोलावे हे कळे ना. त्याने सर्व मोकळेपणाने सांगायचे ठरविले.

“हो आई आहे. ती 8 महिन्यापूर्वी गेली”

“अरे मग हा फोटो कपाटात का? मला तुला सांगावेसे वाटले नाही लग्नाआधी? माझ्या आईबाबांना माहिती नाही त्यांना काय वाटेल?”चंद्रकला

“चूक झाली माझी. माझी गेले 8 महीने मनाची घालमेल चाललेली आहे. तुला कसे आणि काय सांगावे? ह्यावरून विनोद आणि मी बाबांशी भांडलो आहोत त्यांनी दूसरा धक्कादायक निर्णय घेतला म्हणून. म्हणून लग्न रजिस्टर पद्धतीने केले. मला दोघा आईवडिलांना बोलवायचे नव्हते. “

“होय मला माहीत आहे. त्यांनी तुम्हाला न सांगता दुसरे लग्न केले. ते घरी आजच येऊन कपडे घेऊन गेलेत तेव्हा कळले.”बाबा येऊन गेलेत हे ऐकून तो चाट पडला. घर त्यांचेच होते. असे येणे अनपेक्षित होते.

“तुला काय वाटते त्यांनी बरोबर केले? “

“अरे तू त्यांच्याही बाजूने विचार कर. घर बघायला कोण आहे. अजून ते काही जख्खड म्हातारे झाले नाहीत. त्यांना ही आधार हवा ना? अरे जग बदलत

चालले आहे. उद्या आपणही कदाचित त्या वयात जाऊ. आपणा बाबतीत असे घडले तर?"

योगेशला चंद्रकेलेला काय बोलावे हे कळेना. एव्हढी ही समजूतदार! मी काय कल्पना करीत होतो. माझी कोंडी तर फुटली आहे पण विनोद काय म्हणेल?

"तुला काय वाटते? त्यांनी बरोबर केले? "

"म्हणजे काय? अरे ते तुझे किती झाले तरी बाबा आहेत. घर त्यांचे आहे. त्या दोघांनाही घरी येऊ दे. मला आईवडील हवे आहेत."

"तुझे आईबाबा काय म्हणतील? त्यांना मी काहीच सांगितले नाही."?

"काही नाही. त्यांना उलट आनंद वाटेल. मी बाबा गेल्या नंतर फोन करून सर्व हकिगत सांगितली आहे. त्यांचे ही तेच मत आहे. वास्तव आपण स्वीकारले पाहिजे. तुझ्या बाबांनी काही दिवस आईकडे राहतील आपल्याला त्रास नको असे म्हणून गेलेत. आता निवृत होणार म्हणून रजा संपवत आहेत "

योगेशला सुखद धक्केच बसत होते. आपण काय विचार करीत होतो आणि काय घडत आहे.

"विनोदला सांगावे लागेल. त्याचाही विचार घ्यावा लागेल. नाहीतर गोंधळ होईल. त्याचेही आयुष्य आहे. हे घर अपुरे पडेल "

“अरे त्यालाही समजावू. बघू. घराचे काय. माझ्या आईवडिलांचे घर जवळच आहे. ते ही माझेच आहे ना. वेळ पडली तर तेथे राहू. नाती जपू.”योगेश आनंदाने उडालाच. एव्हढे मन चांगले, मोठे आणि मी किती खुजा. त्याने तिला जवळ घेत “आय लव यू “मी भाग्यवान आहे अशी जोडीदारीन मिळायला” म्हणत प्रेमाचा वर्षाव केला.

संध्याकाळी दोघांनी विनोदला घडलेली सर्व हकीकत सांगितली. विनोद त्याच्या निर्णयावर ठाम होता. त्याने दुसरे घर बघितले होते.

“दादा, वहिनी हे पहा मी काही त्यांच्याजवळ राहणार नाही. त्यांना माझ्याकडे ठेवणार नाही. माझा निर्णय पक्का आहे. मी ही घर बुक केले आहे. लवकरच ताबा मिळेल. मी तिकडे रहायला जाईन.”विनोद एव्हढे म्हणून बाहेर मित्रांकडे गेला.

******************

लव अंकुश दिवाळी अंक २०१७

# गरुडझेप

"हाय काका कसे आहात? "गोपाळने विजयला साद घातली. गोपाळ आणि त्याची आई गेले 8 वर्षे विजयच्या समोरच्या फ्लॅट मध्ये कल्याणला राहतात. गोपाळने साधी पदवी घेऊन इम्पोर्ट एक्सपोर्टचा कोर्स केला होता. तो एका मोठ्या कंपनीत ऑफिसरच्या हुद्द्यावर काम करतो. वडील लहान असताना वारले. त्याचे सर्व नातेवाईक कोकणात असतात. आई 60 कडे झुकलेली. गोपाळचा प्रेम विवाह झालेला. केरळी मित्राचीच बहीण. गोपाळचे मित्र परिवार म्हणजे सर्व इतर धर्मीय पण हाय फाय जीवन जगणारे. ठाणे मुलुंड येथे राहणारे, आय टी कंपनीत काम करणारे. सर्वांची ओळख कॉलेज मधील. मित्राच्या घरी जाऊन जाऊन ओळखीचे रूपांतर प्रेमविवाहात झालेले. लता चांगली सॉफ्टवेअर तंत्रज्ञ, आय. टी० कंपनीत कामाला. मुलुंडला भावाबरोबर भाड्याच्या घरात रहाते.तिचा जॉब हा फिरतीचा असतो. तिला मराठी येत नाही पण शिकण्याचा प्रयत्न करते. संवादाचे माध्यम घरात "हिन्दी" . ती घरात नाही हे पाहून सहज विजयने विचारले "काय रे तुझी बायको दिसत नाही?"

“नाही काका घरी. ती चेन्नईला ऑफिसच्या कामाकरिता गेली आहे.”

“कधी येणार परत?”विजय

“काही निश्चित नाही. बघू. “गोपाळ

“कसे रे तुला राहवते. आताच तुझे लग्न झालेले. काही मौज मजा आहे की नाही? आईला काही सुनेकडून......”वाक्य अर्धवट सोडून विजयने त्याच्याकडे रोखून पाहत म्हटले.

“काका या जगात रहायचे तर एक स्टेटस आणि दूसरा पैसा हवा. त्या शिवाय किंमत नाही.”गोपाळ.विजयला वयाची 40 शी ओलांडली तरी हे कधी उमजले नाही. त्याच्या रक्तात हे बसत नव्हते.

“अरे पण आताच सुरवात झाली आहे. कुठेतरी फिरून यायचे. आहेच जीवन पुढे पडलेले....”

“काका हेच आपल्या मराठी लोकांचे जुनाट विचार. माझे धोरण स्वच्छ आहे. जर मी पैसा कमावला नाही, गाडी घेतली नाही आणि मुलुंड ठाणे येथे राहायला गेलो नाही तर माझ्या मित्रात राहू शकणार नाही.”

“म्हणजे काय मैत्री ह्यावर आधारित असते काय? अरे तुझ्या बायकोला तुझे नातेवाईक, घरातील गोष्टी कळायला नको का? “

“त्यात काय? कळतील हळूहळू. आता जग बदलत चालले आहे. त्या बरोबर राहायचे असेल तर हे बघून चालणार नाही.”गोपाळची आई हॉल मधेच होती. तिने तोंड वेंगाडत मान डोलावली. ती ही शिकलेली होती. पण काय करणार एकटाच मुलगा. इतक्यात बायकोने “अहो तुम्ही बाजारात जाताय ना? “साद घातली त्यामुळे बोलणे अर्धवट सोडून विजय भाजी आणायला गेला.

दिवस चालले होते. लता आणि कुमुद माझी बायको वयाचे अंतर असले तरी मैत्री जमली होती. लता कधी बंगलोर तर कधी कोलकता अशी फिरतीवर असायची. शनिवार रविवार दोघे घरी असली तर कधी सिनेमा तर कधी मित्राबरोबर सहल. कधीमधी जर लता फिरतीवर असली तर गोपाळ विमानाने जाऊन तिच्या बरोबर हॉटेल मध्ये राहायचा. आई मात्र घरात एकटीच राही. एकदा घरात जोरात किंचाळण्याचा आवाज आला. विजय आणि त्याची बायको काय झाले हे बघण्यासाठी धावले. गोपाळची आई पाय घसरून पडली होती. घरात कोणीच नव्हते. गोपाळ कामावर होता. त्याला बोलावून घेतले. तो पर्यन्त विजय आईला डॉक्टरकडे घेऊन गेला होता. घरी आल्यावर गोपाळ स्वत: घरात स्वयंपाकाचे बघू लागला. विजयला राहवले नाही त्याने गोपाळला विचारले “अरे तू लताला फोन करून सांगितलेस का?”

“नाही.कशाला? मी आहे ना. तिच्या कामात आणि करियरमध्ये हे यायला नको. मी दोन दिवस सुटी घेईन. पुढे बघू. घरात बाई ठेवीन कामाला. इतर वेळी संध्याकाळी मी आहेच.”

गोपाळची मानसिकता बघून खरेच कौतुक करावे की त्याला पैसा,करियर,स्टेटसने झपाटल्याने मानवी नाते संबंध, जीवनातले सुख म्हणजे काय हे कळले की नाही असा प्रश्न पडतो. लताला दिवस गेले. त्याने तिला केरळाला आईकडे ठेवले. तो मध्येच जाऊन येऊ लागला. तिने लहान मुलासाठी sabbatical रजा वर्षाची घेतली. कंपनीने ही तिला घरून काम करण्याची अनुमती दिली. मुलगी वर्षाची होऊन तिला आई बाबा ओळखू येऊ लागले. गोपाळचे घर आनंदात न्हाऊन निघत होते. गोपाळची आईला सुद्धा एक नातवंड घरात आले याचा आनंद झाला. लताची आई आणि गोपाळची आई एकमेकाला समजून राहू लागल्या. नातीमध्ये जीव गुंतवून ठेवू लागल्या. गोपाळच्या आई गावी थोडे दिवस हवा पालट करण्याच्या हेतूने दिरांकडे राहण्यास गेल्यात. लताची आई कल्याणमध्ये नवीनच, काहीच माहिती नाही. लता ही आता कामावर रुजू झाली.

एक दिवस सहज लता विजयच्या घरी गोडेतेल मागण्याच्या हेतूने आली. तिला दुकानात जाण्यास वेळ नव्हता. संध्याकाळी बाहेर गेल्यावर आणू असा विचार केला.

“भाभी क्या कर रही हो.? जरा थोडा मीठा तेल दिजिये. शामको लौटा देउंगी.”

“आज कामपे जाने वाली थी ना? “कुमुद

“कलसे जाऊंगी. शामको जरा बेटी के लिये babysitting”को देखनेको जाना है. नजीक होगा तो बहुत अच्छा होगा. कोई आपके पहचानके है क्या? एक

दिन गोपाळ छुटी लेकर बेटी अकेली रह सकती है या नही यह अंदाजा लेगा. मा तो जादा दिन नही रह सकती “लता

कुमुदने तिला कॉम्प्लेक्समधील पत्ता दिला. लताच्या मुलीची सोय झाली. लताची पुन्हा बदली कॅनडाला झाली, तिचे 8 महिन्याचे प्रोजेक्ट होते. विजय आणि कुमुदला ह्यांचे कसे होणार? मुलगी आता नर्सरीला जाणार ती कशी आईविना राहणार ह्याची काळजी लागली.

“अग मुलीचे कसे होणार? नोकरी करणे आवश्यक आहे का? कुमुद

“हा! इतनी अच्छी नोकरी कहा मिलेगी? हमे ठाणे शिफ्ट होना है दो सालमे. इसलिये पैसा जमाना है! बेटी हो जायेगी ॲडजस्ट. इतना एमोशनल नही रहना चाइए.”

कुमुदला काय बोलावे हे कळले नाही. खरच मानले पोरीला. नाही तर आमची पिढी आणि मुले.जास्त काम नको की मेहनत नको ना बाहेरगावी नोकरीला जायची रिस्क घेण. गोपाळ एकदा विजयकडे आला. त्याने तो कामावर जात आहे आणि मुलगी babysitting मध्ये राहणार आहे. लताच्या आईकडे लक्ष ठेवा. तिला हिन्दी भाषा समजत नाही असे सांगितले. लता कॅनडाला गेली. घरी गोपाळने ल्यापटोंप आणला. दररोज दिवसातून एकवेळा आई,तो आणि मुलगी लताबरोबर स्काइपवर बोलू लागले. मुलगी ही पाळणाघरात रमली. गोपाळने घरात स्वैपाकाला, साफसफाईला बाई ठेवली. इतर कामे तो करून कामावर जाऊ लागला. एक दिवस

सहज तो मुलीला पाळणाघरात घेऊन जात असताना शेजारी असलेल्या काकूंनी मुलीला विचारले,''कुठे चालली? तुझी आई कुठेय? ''

बोबडे बोल बोलत ती म्हणाली, ''काकूंच्या घली जाते खेळायला. आई ना गेल्ली ssss कानडाला. मी बोलते टीव्हीवर रोज'' सगळ्यांना हसू फुटले.कौतुक वाटले मुलीचे. लहान मुलेही लगेच परिस्थितीशी जुळवून घेतात. गोपाळ ही तिचे सर्व करू लागला, कामावरुन आल्यावर तिला फिरायला घेऊन जाऊ लागला. गोपाळची सासू ही केरळाला निघून गेली. गोपाळ सर्व एकटा घरात बघू लागला. संध्याकाळी आल्यावर स्वैपाकही थोडा घरी करू लागला. सुट्टीच्या दिवशी इतर साफसफाई पाहू लागला. अचानक एक दिवस तो विजयच्या घरी आला.

''काका मीही कॅनडाला शिफ्ट होत आहे. तिला तिथे कायमची नोकरी मिळाली. चांगले घर मिळाले. आमच्या घराला कोणी गिर्हाईक असेल तर सांगा. तीन महिन्याचा अवधी आहे. ''

''काय! अभिनंदन. तुला मानले गोपाळ. तू मराठी ती केरळी. हे कसे जमले? ''विजय आश्चर्याने म्हणाला.

नेहमी प्रमाणे ''त्यात काय? करायचे म्हटले की सर्व होते. अहो मी केरळी, ख्रिश्चन आणि तामिळी लोकांमध्ये जास्त राहिलो. त्यांच्यासारखा विचार करू लागलो. ते जर कुठेही जातात तर मी का नाही. त्यांच्यातील धडाडी, नाते संबंधातील लवचिकता आणि वेळ प्रसंगी सर्व काम करण्याची तयारी ठेवली की सर्व काही होऊ शकते. केरळी मुलमुली कोठेही जातात. नशिबाने बायको केरळी मिळून गेली.''

“तू तिथे काय नोकरी करणार? आई कुठे राहणार? “विजयने टिपिकल मध्यमवर्गीय” प्रश्न विचारला.

“आई गावी जाईल. तिथे घर आहेच. ह्या घराचे अर्धे पैसे तिला देईन. अर्धे बँकेत ठेवीन. मी तिकडे गेलो की काही तरी बघीन हिच्या ओळखीने. लता तिथे माझ्याकरिता धंदा किंवा नोकरी काय करता येईल याचा अंदाज घेत आहे. मी काही ही करीन पण आता आम्ही तिघे एकत्र राहून मुलीला आधुनिक युगात मोठे करणार “गोपाळ

खरेच गोपाळ तीन महिन्यात कॅनडाला गेला. तिथे त्याने consumer dealership घेऊन दुकान टाकले.

विजय आणि कुमुदने आपल्या मुलांवर हेच संस्कार करायचे त्यांना ही घडवायचे असा निश्चय केला. इच्छाशक्ती असेल तर पंखात बळ येऊन भरारी मारता येते हेच खरे.

********************

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष
# श्री अरविंद बुधकर यांचे हे तिसरे पुस्तक.

श्री अरविंद बुधकर हे ह्युमन रिसोअर्स्सेस मॅनेजमेंट (HR) चे तज्ञ. त्यांना व्यवसायामुळे आणि मुळातच माणसांच्या स्वभाव वैशिष्ट्यांच्या निरिक्षणाची आवड. माणसे मोठी कशी होतात याचे कुतुहल. आणि बोलण्याचे कौशल्य. या सर्व गुणांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात उमटते.

श्री. अरविंद बुधकर यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३),

अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(९), किशोर कुलकर्णी(2), रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ‘‘इ’’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।